खरे शोधिता शोधिता शोधताहे।
मना बोधिता बोधिता बोधताहे।
परी सर्व ही सज्जनाचेनि योगे।
बरा निश्चयो पाविजे सानुरागे ॥१५१॥ श्रीराम॥

<u>अर्थ</u> - सत्याचा चिकाटीने शोध घेतला तर शोध लागतो. मनाला पुन्हा पुन्हा समजावले तर त्याच्या ठिकाणी ज्ञान स्थिर होते. पण हे सारे संतांच्या सहवासाने घडून येते. सत्संगाने सद्वस्तूचे निश्चित ज्ञान होते व तिच्यावर प्रेम बसते.

<u>स्पष्टीकरण</u> - प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात ज्ञानस्वरूप आत्मा वास करतो. पण तो वासनांनी भावनांनी कल्पनांनी झाकून गेला आहे. तरीदेखील त्याची ज्ञानस्फूर्ति जाणवतेच. सत्याचा शोध घेतल्यावाचून माणूस जगूच शकत नाही. पण शोध घेता घेता स्वस्वरूपापर्यंत पोहोचण्यासाठी मोठी चिकाटी लागते. सत्याचा शोध घेण्याचे दोन मार्ग आहेत. इंद्रियांच्या अनुभवास येणारे जे दृश्य विश्व त्याचे निरीक्षण करून त्यातील सत्य शोधणे हा <u>विज्ञानाचा</u> मार्ग! तर आपल्या अंतःकरणात उतरून व वासना बाजूला सारून पिंडातील सत्य शोधणे हा <u>अध्यात्माचा</u> मार्ग! या दुसऱ्या अध्यात्माच्या मार्गास उपाधि कमी व निश्चितपणा अधिक असल्याने समर्थ त्या मार्गाने जाण्याचा आग्रह धरतात. अध्यात्मामध्ये मन हे प्रमुख साधन असते. परंतु ते सारखे बाहेर धावत असते. ते आतमध्ये खोल उतरू देत नाही. ∴ त्याला पुन्हा पुन्हा बोध करावा लागतो. त्या प्रयत्नात लवकर यश मिळत नाही. त्यामुळे माणूस निराश होतो. त्याचा नाद सोडून देतो. अशा प्रसंगी संतांचा सहवास फार उपयोगी पडतो. त्यांच्या स्वानुभवसंपन्न शब्दांनी साधकाची निराशा जाते व तो अधिक उत्साहाने मार्गक्रमणा करतो.

सत्संगाने मनात परिवर्तन होते व संशयवृत्ति नाहिशी होते. साधकाच्या मनात विकल्प येत नाही. उलट तो सद्वस्तुवर मनापासून प्रेम करतो.

सारखे सारखे शोधत गेले म्हणजे शोध लागतो. पुन्हा पुन्हा बोधाचे ग्रहण केले म्हणजेच बोध होतो. एकदा ऐकून किंवा रोज नवनवे ऐकून नीट आकळत नाही. जे ऐकले वाचले

© www.madhaveeraghuveer.com

त्यावर चिंतन - मनन - निदिध्यासन सातत्याने घडले पाहिजे.
शोध लागणे किंवा बोध होणे या सहजासहजी होणाऱ्या गोष्टी नव्हेत. त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. त्याचा पाठपुरावा करावा लागतो. सर्व शक्तीनिशी प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी अनुभवी जाणत्याचे मार्गदर्शन वरचेवर मिळायला हवे. सत्पुरुषांच्या संगतीचा महिमा यापूर्वी अनेकदा गायला गेला आहे.

धुंडिता धुंडिता देवो सत्संगे सापडे जनी।

सत्संगतीचा लाभ होण्यासाठी केवळ यांत्रिक साहचर्य उपयोगी पडत नाही. साधकाच्या अंतःकरणात, साधनेविषयी, सत्याच्या ज्ञानाविषयी, सद्गुरुविषयी अनुराग, प्रेम, भक्ती असायला पाहिजे. तरच सत्याचा निश्चय करता येईल किंवा बोध स्थिरावेल. अन्यथा अखंड पाण्यात राहूनही आतून कठीण व वरून कोरडा असलेल्या नर्मदेतल्या गोट्याप्रमाणे स्थिती होईल.

© www.madhaveeraghuveer.com

बहुतां परी कूसरी तत्वझाडा ।
परी पाहिजे अंतरी तो निवाडा ।
मना सार साचार ते वेगळे रे
समस्तामध्ये येक ते आगळे रे ॥ १५२ ॥ श्रीराम ॥

**अर्थ** - मोठे चातुर्य वापरून नाना प्रकाराने तत्वाचे विवरण केले तरी आपण आपल्या बुद्धीने निश्चित निर्णय केला पाहिजे. अरे मना! सर्वांचे सार असणारे सत्य काही वेगळेच आहे. सर्वांमध्ये ती सद्वस्तु एकपणाने राहते व ती सर्वश्रेष्ठ आहे.

**स्पष्टीकरण** - जुन्या वेदांत ग्रंथामधून पंचीकरण नावाचा एक किचकट विषय आढळतो. भारतीय पदार्थविज्ञानाचा सारा भर पंचमहाभूतांवर आहे. निरनिराळ्या प्रकारे त्यांचे परस्पर मिश्रण होऊन पिंड व ब्रह्मांड तयार होतात असे त्या विज्ञानाचे म्हणणे आहे. या परस्पर मिश्रणास पंचीकरण असे नाव आहे. दासबोधामध्ये श्रीसमर्थांनी पंचीकरणाचा विचार केला आहे. पण या पंचीकरणाचा दोष असा की निरनिराळे वेदांती निरनिराळा मिश्रण क्रम देतात. त्यामुळे सामान्य माणूस गोंधळून जातो. इंद्रियांना आकलन होणारे दृश्य विश्व हे पंचमहाभूतांचे बनले आहे. पण साऱ्या विश्वाला धारण करणारे, नव्हे जन्मास घालणारे परमात्मतत्व काही निराळेच आहे. आकाशाहून सूक्ष्म असणारे ते तत्व सर्वांहून श्रेष्ठ तर आहेच पण सर्वांमध्ये ते एकपणाने व्यापून आहे.

Permutation Combination

कूसरी म्हणजे चातुर्य. काही लोकांना नाना प्रकारचे शब्दचातुर्य अवगत असते. आपल्या प्रतिभेच्या बळावर ते एखाद्याला तत्वझाडा किंवा तत्वांचा निरास चांगल्या पद्धतीने समजावून सांगतात. याचा अर्थ त्याला अंतर्यामी अनुभूती आली आहे असा होत नाही.

अद्वैत निरूपणी अगाध वक्ता । आणि विषयी लोलंगता ।
ऐसिये गुरुचेनि सार्थकता । होणार नाही ॥ दासबोध.

असे अद्वैत सिद्धांताचे प्रतिपादन आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर करणारे पण अंतरी विषयोपभोगाचे आकर्षण असणारे बोलबच्चन पुष्कळ असतात. पण ते वरवरचे ज्ञान आहे. अनुभूती नव्हे. म्हणून

उदंडाचे उदंड ऐकावे । परी अंतरी प्रत्यये पहावे ।
खरे खोटे निवडावे । अंतर्यामी ॥

©www.madhaveeraghuveer.com

बुद्धिविलास आणि शब्दचमत्कृती यात अडकलेला शब्दज्ञानी मनुष्य 'मला आपल्याला ज्ञान झाले आहे' असा भ्रम करून घेऊ शकतो. आणि म्हणूनच विद्वानांची भांडणे चव्हाट्यावर आलेली दिसतात. सत्याचा निवाडा म्हणजेच अनुभूति ज्याने त्याने अंतर्यामी धारण करायला हवी. त्यासाठी दाहक आणि दिव्य जीवनातून जावे लागते. केवळ शास्त्राभ्यास पुरेसा नाही. शास्त्राध्ययन हाही एक व्यवसाय झाला आहे.

मैं कहता आँखन देखी। ये बात न पढी लिखी॥ कबीर

परमात्माच सार आहे आणि तो आचरणात आणता येण्यासारखा आहे. परमात्मा साचार म्हणजे जगण्याचा विषय आहे. आपल्याला इंद्रियांद्वारे वस्तूचे ज्ञान करून घेण्याचा अभ्यास आहे, त्याला भेदबुद्धी लागते. परमात्मा अभेद आहे. सर्व वेगवेगळ्या वस्तूंमध्ये तो आहेच पण तरीसुद्धा तो सर्वांपेक्षा निराळा आहे.

पंचभूती असे मिश्रित परंतु ते पंचभूतातीत।
पंकी आकाश अलिप्त। असोनि जैसे॥ ५.४.२०.

[illegible]

माळेतील सर्व मण्यांमध्ये एकच धागा असावा किंवा सर्व उपकरणांमध्ये एकच वीज असावी तसा सारभूत परमात्मा अधिष्ठान चैतन्य असून त्याच्याच सत्तेवर सारे दृश्यजगत् काम करत आहे. याची ध्यानात प्रचीति यायला हवी. त्रिविधतेतील कोणत्याही गुणाचा स्पर्श त्याला होत नाही. त्याचे स्वरूप वर्णनातीत असे आगळेच आहे. म्हणून तर अनुभवासाठी फार परिश्रम करावे लागतात. वरवरच्या शाब्दिक ज्ञानाने ते शक्य नाही.

© www.madhaveeraguruveer.com

नव्हे पिंडज्ञाने नव्हे तत्त्वज्ञाने
समाधान काही नव्हे तानमाने।
नव्हे योगयागे नव्हे भोगत्यागे।
समाधान ते सज्जनाचेनि योगे ॥१५३॥ श्रीराम ॥

अर्थ- पिंडज्ञान, तत्त्वज्ञान, संगितादि ललितकला, योगाभ्यास, यज्ञ आणि भोगांचा त्याग यांच्यापासून जे समाधान मिळत नाही ते समाधान संतांची संगत केल्याने प्राप्त होते.

स्पष्टीकरण- मानवीजीवनात ज्ञान आणि कला यांचे फार महत्त्व आहे. ज्ञानोपासनेमध्ये आणि कलोपासनेमध्ये माणूस काही काळ तरी चिदानंदाचे सान्निध्य उपभोगतो. त्या सान्निध्याने त्याला थोडे तरी समाधान लाभते पण अज्ञानाची, दुःखाची ओढ त्याला खाली खेचते. योगाच्या अभ्यासाने साधक समाधीपर्यंत मजल मारु शकतो जोपर्यंत मन समाधी अवस्थेमध्ये राहते तोपर्यंत देहाचे व जगाचे भान नसते त्यामुळे समाधानाचा अनुभव येतो. परंतु समाधी उतरली की ते समाधान तितक्या प्रमाणात टिकत नाही. यज्ञयागामध्ये व्रतस्थ रहावे लागते. व उत्कट प्रार्थनेने यज्ञ-देवतेशी संपर्क साधावा लागतो. जोपर्यंत मन शुद्ध व सूक्ष्म असते तोपर्यंत देवता संपर्क टिकतो. त्याने समाधान मिळते पण मन खाली आले की देवता संपर्क तुटतो व समाधान भंगते. काही लोक सार्‍या देहसुखांचा त्याग करतात समाधान देहाच्या पलीकडे रहात असल्याने सर्व भोगांच्या त्याग केल्याने देहाच्या पलीकडे जाता येईल ही कल्पना भोगत्यागाच्या मुळाशी असते पण भोगत्यागाला देहाच्या, परिस्थितीच्या समाजाच्या मर्यादा पडतात म्हणून त्यातील समाधान हरपते.

संतांच्या संगतीतील समाधान मात्र काही औरच आहे. संत स्वतः स्वानंदाने भरलेला असल्याने केवळ त्याच्या सान्निध्याने आपल्या अंतःकरणातील आनंद उफाळून बाहेर येतो. शिवाय त्यांचा आनंद इतका शक्तिमान असतो की त्याच्या सहवासाला राहणाऱ्या व्यक्तीला त्याची लागण लागते. देहबुद्धीच्या भूमिकेवर राहून देखील आनंद भोगण्याची इच्छा असेल तर संतसमागम करावा.

सत्पुरुषांच्या सहवासात राहण्याचा सोपा मार्ग सोडून माणसे साधनेच्या नावाखाली कोणकोणत्या कवायती करतात

© www.madhaveeraghuveer.com

याची एक यादीच समर्थ या श्लोकात देतात.
१. पिंडज्ञान २. तत्त्वज्ञान ३. तानमान ४. योगयाग ५. भोग-त्याग. हे पाचही मार्ग चुकीचे आहेत असे समर्थांना म्हणायचे नाही, तर या पाच गोष्टी पुरेशा नाहीत. एवढेच नव्हे तर सत्संगाशिवाय त्या व्यर्थ आहेत. पिंडज्ञान म्हणजे शरीररचनेचे सर्व ज्ञान! डॉक्टरांना ते व्यवस्थित ठाऊक असते तरी त्यामुळे त्यांना शरीरातील चैतन्याचा लाभ होत नाही. आणि आत्मज्ञानाशिवाय खरे समाधान लाभत नाही. परीक्षेपुरते आरोग्यशास्त्राचे नियम पाठ करून आरोग्यसंपन्नता येत नाही. तेच तत्त्वज्ञानाचे! नित्य अनित्य, हिताचे-अहिताचे कळण्यासाठी तत्त्वज्ञान उपयोगी पडते. परंतु तत्त्वज्ञानीचा विद्वान जर निरिच्छ, संयमी, सदाचरणी नसेल तर तोही शोकमोहग्रस्त होऊन दुःखाने तळमळणारच.

काही लोक चित्ताच्या समाधानासाठी नृत्य, गायन, वादनादि किंवा काव्य कथा नाटकादि ललितकलांचा आश्रय घेतात. या कलांमुळे तात्पुरते समाधान होईल पण खऱ्या मनःस्वास्थ्याच्या दृष्टीने या ललितकला परिणामकारक नाहीत. योगयागादि साधनांचा अवलंबही बऱ्याच प्रमाणावर होतो. तसेच यज्ञयागाचाही उपयोग वासना नियंत्रित करून चित्ताच्या शुद्धीसाठी होतो. योगातून प्राप्त होणाऱ्या सिद्धी साधकाला विघ्नभूत ठरतात. साधकाने या बाबतीत फार सावध राहिले पाहिजे. अविवेकाने जाणाऱ्याची स्थिती "हुरळली मेंढी लागली लांडग्यापाठी" अशी कधी कधी होते.

काही लोक संसारातील त्रासाला वैतागून त्यागाचा आश्रय घेतात. पण वासनाबीज तसेच राहिल्याने अशी त्यागी माणसे, हेकट घायकुती संतापी किंवा दंभाने स्वतःची महती वाढवणारी होतात. ते अस्वस्थ व भयग्रस्त असतात.

मनाच्या समाधानासाठी लौकिकात मान्यता पावलेले बहुतेक सर्व उपाय फलप्राप्तीच्या दृष्टीने निरुपयोगी ठरतात. परंतु अंतःकरणाच्या समाधानासाठी सत्संगती हा भरवशाचा व प्रभावी उपाय समर्थांनी सांगितला आहे.

महावाक्य तत्त्वादिके पंचिकर्णे ।
खुणे पाविजे संतसंगे विकर्णे ।
द्वितीयेसी संकेत जो दाविजेतो ।
तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो ॥१५४॥ श्रीराम ॥

<u>अर्थ</u> - वेदातील महावाक्ये, विश्वरचनेतील मूलतत्त्वे, पंचीकरण-पसारा यांचे विवरण संतांच्या तोंडून ऐकावे. मग ते खुणेने परमात्मवस्तु दाखवतात. कशी? तर द्वितीयेची कोर दाखवण्यास एखाद्या फांदीची खूण दाखवतात त्या खुणेवरून चंद्र दिसला की खूण बाजूला सारतात.

<u>स्पष्टीकरण</u>. अध्यात्मशास्त्राच्या तात्त्विक अंगामध्ये वेदांमधील महावाक्यांचे विवरण, विश्वरचनेतील मूलतत्त्वांची मीमांसा आणि पंचीकरणाचे प्रकार हे विषय येतात. यालाच वेदांत म्हणतात. वेदांत सोपा नाही. त्याच्यासाठी पूर्वतयारी लागते. वेदांतातील विषयांचे विवरण करणारा पुरुष स्वतः अनुभवी व आत्मज्ञान-संपन्न असावा आणि वेदांत श्रवण करणाऱ्याला ब्रह्माविषयी जिज्ञासा असावी. संतांच्या सहवास केल्याने आपोआप पहिली अट पाळली जाते. अडचण येते ती दुसरी अट पाळण्याची. ज्याला परमात्मदर्शनाची ओढ लागली आहे, तळमळ आहे असा श्रोता मिळणे सोपे नाही. मग त्यातून पर्याय असा काढायचा की माणसाने संतांचा सहवास मनापासून केला तरी संतांच्या मनोबलामुळे त्यांच्या सहवासात राहणाऱ्यांच्या अंतर्यामी परिवर्तन घडते व ब्रह्मदर्शन व्हावे म्हणून तो तळमळतो.

संतांच्या मुखाने आत्मविवरण ऐकल्याने माणसाला शास्त्रप्रचीती, पुढे गुरुप्रचीती येते कारण बोलण्याच्या ओघात संत स्वतःच्या अनुभवांचे दिग्दर्शन करतो. पुढची आत्मप्रचीति मात्र ज्याची त्याने घ्यायची असते. द्वितीयेची चंद्रकोर अगदी लहानशी असते. ती चटकन दिसत नाही. ज्याने ती आधी पाहिलेली असेल तोच दुसऱ्याला ती दाखवू शकतो. ती चंद्रकोर दाखवताना एखाद्या झाडाच्या फांदीची खूण तो घेतो. फांदीवरून पाहताना ती चंद्रकोर दिसते. एकदा ती दिसली की खुणेची फांदी सोडून द्यायची. परमात्मवस्तु अनुभवण्याची तऱ्हा अशीच आहे. स्वानुभवसंपन्न संत-महात्मे खुणांचा उपयोग करून (महावाक्ये) सद्वस्तु अनुभवाच्या

© www.madhaveeraghuveer.com

कक्षेत आणण्याची युक्ती शिकवतात. एकदा अनुभव प्राप्त झाला की मग सारा शाब्दिक वेदांत मागे पडतो.

सद्गुरु शिष्याला अनुग्रह देताना वेदांमधील महावाक्यांचा उपदेश करतात. १. तत्वमसि २. अहं ब्रह्मास्मि ३. प्रज्ञानं ब्रह्म ४. अयमात्मा ब्रह्म !

त्याचवेळी ते शिष्याला ज्या २२ तत्वांची गाठोडी बांधून शरीराला जीवदशा प्राप्त झाली ती २२ तत्वे व त्यांच्या निराकरणाची पंचीकरण प्रक्रिया समजावून सांगतात. संतांच्या संगतीत तत्वज्ञानाचा अभ्यास करताना गौण काय आणि महत्वाचे काय हे ध्यानात घ्यावे. खुणेपुरती फांदी महत्वाची आहे. पुढे फांदी सोडून देऊन चंद्र पहावा. खुणा कालबाह्य ठरू शकतात अथवा बदलू शकतात पण आपले ध्येय चंद्र पाहणे हे आहे.

ज्ञानी सत्पुरुषांच्या सहवासात ही महावाक्ये, तत्वसंख्या, पंचीकरणाची प्रक्रिया यांचे सांगोपांग विवरण होत जाते. सुदैवाने शाब्दे परे च निष्णातं अशा सत्पुरुषाशी गाठ पडल्यास ब्रह्मज्ञानापर्यंत जाऊन पोहोचण्याच्या दृष्टीने या ज्ञानाचा सविस्तर उहापोह केला जातो. त्यातील मर्म लक्षात येते, रूप पटते. मात्र हे सर्व ज्ञान परोक्ष ज्ञान आहे. प्रत्यक्ष ब्रह्मसाक्षात्काराशी तसा त्याचा काही संबंध नाही. याला 'शाखाचंद्रन्याय' असे म्हणतात. ओळख पटवून घ्यायची असते ती चंद्राची. या ठिकाणी महत्व आहे ते चंद्रविषयक ज्ञानाला. ते झाल्यावर तटस्थ लक्षण म्हणून उपयोगी पडणाऱ्या शिखर, फांदी, खांब, कोपरा यांची आवश्यकता लागेलच असे नाही. ब्रह्मज्ञान आणि प्रक्रियेचे पांडित्य यांचे असेच आहे.

चिन्हे वा शब्द हे अर्थाचे वाहन आहे. प्रत्यक्ष अर्थ नव्हे. हे जर नीट समजून घेतले तर मतभिन्नता रखेळ व आपसातील वैषम्य मत्सरांना स्थान राहणार नाही. सर्वत्र एकोपा व सामंजस्य वाढेल.

© www.madhaveeraghuveer.com

दिसेना जनीं ते चि शोधूनि पाहे।
बरे पाहता गूज तेथेचि आहे।
करी घेउ जाता कदा आडळेना।
जनी सर्व कोंदाटले ते कळेना॥१५५॥ श्रीराम॥

अर्थ - जगामध्ये इंद्रियांना जे दिसत नाही ते नीट शोधावे. नीट पाहिले तर तिथेच खरे रहस्य आहे. हातात घ्यावी म्हटली तर गूढ सद्वस्तु हातात येत नाही. जगात सर्व ठिकाणी ती भरून उरली आहे हे लक्षात येत नाही.

स्पष्टीकरण - इंद्रियांना जे दिसते तेच खरे मानण्याची सवय आपल्या मनाला लागली आहे ती मोडायला हवी. इंद्रियांना आकलन न होणारी आत्मवस्तु आपण शोधून काढावी. जीवनाचे रहस्य त्या शोधात साठवलेले आहे. दृश्य वस्तूंच्या बाजारात राहून अदृश्य वस्तूचा (आत्मवस्तूचा) शोध घेणे याला परमार्थ म्हणतात हे संशोधन करण्याची विद्या संत-समागमात प्राप्त होते.

कोणतीही वस्तु म्हटली की ती देहाने हाताळण्याची सवय आपल्याला झाली आहे. स्थलकालाने मर्यादित वस्तु हातात घेता येते पण स्थलकालातीत सूक्ष्म आत्मवस्तु हातात कशी घेणार? ज्याने त्याने तिचा अनुभव घ्यायचा असतो. ती सर्व ठिकाणी समव्याप्त आहे. ती होऊनच तिचे ज्ञान होते.

या जगात एक मोठी विसंगती आहे. जे डोळ्यांनी दिसते ते गौण असते आणि जे प्रधान आहे ते डोळ्यांनी दिसत नाही. जे दिसते त्याला, जे दिसत नाही त्याचाच आधार असतो. झाड दिसते पण त्याची मुळे दिसत नाहि. इमारत दिसते पण तिचा पाया दिसत नाहि. उपकरणे दिसतात पण वीज दिसत नाही शरीर दिसते पण आत्मा दिसत नाहि. जे मौलिक आहे ते सहजासहजी दिसत नाहि. त्याचा शोध घेण्यासाठी अंतर्दृष्टी विकसित करावी लागते. तो परमात्मा सर्वत्र कोंदाटला आहे पण त्याला पाहण्याची दृष्टी माणसाजवळ नाही.

करी घेता न ये। राखिता न जाये।
ऐसे रूप आहे। राघवाचे॥

न मन हूँ न बुद्धि न चित्त अहंकार
न जिव्हा नयन नासिका कर्ण द्वार
न चलता न रुकता न कहता न सुनता
जगत् चेतना हूँ अनादि अनन्ता।

डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा या ज्ञानेंद्रियांशिवाय एखादी गोष्ट जाणता येईल याची आपण कल्पनाच करू शकत नाही. पण दुर्लभ अशा सत्याच्या शोधात खरा पुरुषार्थ सामावला आहे. वरवर विचार केला तर व्यवहाराच्या दृष्टीने त्या शोधाचा प्रत्यक्ष काही लाभ आहे असे नाही. पण मानवमात्राच्या हिताच्या, उन्नतीच्या दृष्टीने, विकास साधण्यासाठी जे प्रयत्न येत त्याच्या मुळाशी शोध घेत जाणे हेच उपयोगाचे आहे. इतकेच नाही तर ते आवश्यकही आहे. त्यामुळे मानवजात उंचावेल.

ब्रह्मज्ञान ही सहजासहजी उचलून घेण्यासारखी गोष्ट नव्हे. ती स्थूल वस्तु नाही. त्याचा शोध घ्यावा लागतो, साधना करावी लागते. प्रयत्नांची अखंड कास धरावी लागते. शोध घेणारा हा, ज्याचा शोध घ्यायचा त्यापेक्षा वेगळा नसल्याने, शोध घेणे वा त्यासाठी प्रयत्न करणे याचे व्यावहारिक अर्थ साधनेत गळून पडतात

प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, अर्थापत्ती, अनुपलब्धि या पाचही प्रमाणांनी ते सिद्ध करता येत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

नाहं मन्ये सुवेदेति नो न वेदेति वेद च।
यो नस्तद्वेद तद् वेद नो न वेदेति वेद च

म्हणे जाणता तो जनी मूर्ख आहे।
अतर्कासी तर्की असा कोण आहे।
जनी मीपणे पाहता पाहवेना।
तया लक्षिता वेगळे राहवेना॥१५६॥ श्रीराम॥

अर्थ- मी परमात्मा जाणला असे जो म्हणतो, तो नक्की अज्ञानी असतो. सद्वस्तु तर्काच्या पलीकडे आहे म्हणून ती तर्काने कोणालाही जाणता येत नाही. मीपणे पाहू जाता परमात्मा पाहता येत नाही. जो त्याला खरोखर पाहतो त्या पाहणाऱ्याला त्याच्यापासून वेगळे राहता येत नाही.

स्पष्टीकरण- माणूस जे ज्ञान मिळवतो त्यामध्ये दोन प्रकार आढळतात. एक म्हणजे द्रष्टेपणाने वेगळे राहून दृश्याचे ज्ञान करून घेणे आणि दुसरे म्हणजे द्रष्ट्याने दृश्याशी तदाकार होऊन त्याचे ज्ञान करून घेणे. स्थलकालांनी बंदिस्त असणारी वस्तु वेगळेपणाने पाहता येते. पण स्थळकाळांना ओलांडून राहणारी सर्वव्यापी वस्तु वेगळेपणाने पाहता येत नाही. तिचे ज्ञान होण्यासाठी तिच्याशी समरस व्हावे लागते.

आपले मन शरीर व बुद्धी स्थलकालांच्या चौकटीत कार्य करतात पण सद्वस्तु या चौकटीबाहेर असते. म्हणून आपल्या बुद्धीने सद्वस्तुचे ज्ञान होऊ शकत नाही. त्या ज्ञानाचा साक्षात्कार होण्यासाठी ज्ञातेपणाचा भाव सोडून त्या ज्ञानामध्ये विलीन व्हावे लागते. मला ते कळले असे जो म्हणतो तो नकळत त्याच्याहून वेगळा राहतो. वेगळेपणा म्हणजे अहंता. अहंता भ्रमाचे लक्षण असल्याने तिथे शुद्धज्ञान शक्य नाही.

मानवी जीवनात मोठी विसंगती आढळून येते. अज्ञानी मनुष्य स्वतःला ज्ञानी समजतो. इतकेच नाही तर स्वतःला ज्ञानी म्हणून प्रक्षेपित करण्याचा प्रयत्न करतो. याउलट ज्ञानी मनुष्य स्वतःला अज्ञानी समजतो. लहान संतांनी स्वतःला अज्ञानी, मूर्ख असे म्हणवून घेतले आहे. जाणती माणसे नेहमी स्वतःकडे नेणतेपणा घेतात. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात.

जेथ जाणीव करी तोचि नेणे। आथिलेपण मिरवी तोचि उणे।
आम्ही जाहलो ऐसे जो म्हणे। तो कहीच नोहे॥

केनोपनिषदात एक मंत्र आहे. त्याचा अर्थ असाच आहे.

© www.madhaveeraghuveer.com

यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः।
अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम्॥

महाराज जनकांनी राज्यातील ज्ञानी लोकांना आवाहन केले की आपण ज्ञानी आहोत हे सिद्ध करावे आणि सुवर्णमंडित १००८ गायी घेऊन जाव्यात. सर्व ज्ञानी ऋषी एकत्र जमले पण मी ज्ञानी आहे असे म्हटले की तो अज्ञानी ठरणार. शेवटी याज्ञवल्क्य ऋषी उठले व आपल्या शिष्यांना त्या १००८ गायी आश्रमामध्ये घेऊन जायला सांगितले. बाकीच्या ऋषींमध्ये चुळबूळ सुरु झाली. तेव्हा याज्ञवल्क्य ऋषींनी 'मी अज्ञानी आहे असे सिद्ध करा' असे उलट आवाहन केले. कारण ज्ञानी आहे असे सिद्ध करता येत नाही. जोपर्यंत 'मी' ची जाणीव आहे तोपर्यंत अज्ञानच असते. झाड उगवले की बी नष्ट झालेले असते तसेच ज्ञान झाले की मी नष्ट झालेला असतो. ज्ञाना ज्यामध्ये विलीन झालेला असतो. समर्थ म्हणतात -

वस्तु येक आपण येक। ऐसी आहाती वेगळीक
तरि अनुभवाचा विवेक। बोलो येतो सुखे॥ ६.१०.३८.

किंवा तुकाराम महाराज म्हणतात.

देव पहावया गेलो। तो देवचि होवोनि ठेलो।

मिठाची पुतळी समुद्राच्या तळाचा शोध घ्यायला गेली तर तिचे वेगळे अस्तित्वच उरत नाही. आणि वेगळेपण उरले तर समुद्राचे विशालत्व कळत नाही. तसे ब्रह्माचा शोध घेताना जिवाचे होते.

मी पहात आहे, मला पहावयाचे आहे ही जाणीवच एखाद्या दाट धुक्यासारखी साक्षात्काराच्या मार्गातील अडथळा ठरते ही जाणीव सुटली की ब्रह्माचा अनुभव येतो.

अन्न वेगळे आणि खाणारा वेगळा असतो पण ते पोटात जाऊन पचू लागते तेव्हा त्याचे शरीरभावात रुपांतर होते. तिथे अन्नाचे द्वैत अद्वैतात परावर्तित होते.

© www.madhaveeraghuveer.com

बहु शास्त्र धुंडाळिता वाड आहे।
जया निश्चयो येक तो ही न साहे।
मती भांडती शास्त्रबोधे विरोधे।
गती खुंटती ज्ञानबोधे प्रबोधे॥१२७॥ श्रीराम॥

अर्थ - मानवी ज्ञानशाखांचा विस्तार फार मोठा आहे. शिवाय त्यांच्यामध्ये एकमत नाही. शास्त्रज्ञानी लोक परस्परांतील विरोधामुळे मतांतराच्या आग्रहाने भांडतात. अशा अनेक शास्त्रज्ञानी लोकांमध्ये क्वचित एखाद्याला परमात्मज्ञानाचा प्रकाश लाभतो. त्याने जागा होऊन तो आपली बुध्दी बाजूला ठेवतो.

स्पष्टीकरण - कोणत्याही सुसंस्कृत मानवसमाजात अनेक ज्ञान-शाखांचा विस्तार चालू असतो. भिन्न ज्ञानशाखांची भिन्न मते असतात. तत्त्वज्ञानामध्ये सर्वात जास्त मत मतांतरे आढळतात. प्रत्येक ग्रंथकार आपल्या मताचा खरेपणा सिध्द करण्यासाठी विरोधी मतांचे खंडन करतो. मतांचे खंडनमंडन म्हणजे बुध्दीच्या पातळीवरील शास्त्रीय शब्द वापरून भांडणे होय.

पण या कारणाने शास्त्रीपंडितांपैकी कोणी एखादाच साधु बनतो. बुध्दीने सद्वस्तुचे खंडनमंडन करत बसण्यापेक्षा तो बुध्दी बाजूला ठेवून खरा जिज्ञासु सद्वस्तुचे निदिध्यासन, मनन करतो. बुध्दीने मिळवलेले आपले ज्ञान तो विसरतो. पार्श्वभूमी तयार असल्याने त्याच्या अंतःकरणात ज्ञानाचा उदय लवकर होतो.

अलीकडे आध्यात्मिक ग्रंथांचे अपचन होईल एवढे पीक आले आहे. शास्त्रवचनांचा मनाला येईल तो अर्थ लावणार अनेक विद्वान आहेत. स्वामी विवेकानंदांनी महाविद्यालयीन जीवनात हर्बर्ट स्पेन्सरचा अज्ञेयवाद, डेकार्टचा अहंवाद, डेविड ह्यूमचा नास्तिकवाद, शंकराचार्यांचा मायावाद असे अनेक ग्रंथ वाचले. त्यामुळे त्यांचा वैचारिक गोंधळ झाला. स्वतः स्वामीजी म्हणत

अफाट वाचनाचा मला एक मोठा फायदा झाला. आणि तो म्हणजे एवढे वाचन करण्याची आवश्यकता नसते हे लक्षात आले. आणि ज्यांनी त्यांचा हा वैचारिक गोंधळ दूर केला त्या रामकृष्णांनी एकही ग्रंथ वाचला नव्हता.

शास्त्रात मतामतांचा गलबला आढळतो. प्रत्येक मताचे कडवे समर्थक अन्य मतप्रवाहांवर तुटून पडतात. त्यातील

समर्थ' मती भांडती शास्त्रबोधे विरोधें' असे म्हणतात. त्याने अध्यात्मात पडलेला साधक यामुळे गोंधळून जातो.

आजदेखील विपश्यना, सुदर्शन क्रिया, कुंडलिनी ध्यान, पूर्णवाद, प्रजापिता ब्रह्माकुमारी, अग्निहोत्र, वास्तुशास्त्र, सिद्ध समाधी योग - S.S.Y. यज्ञ-याग असे साधनप्रकार आढळतात. प्रत्येकाला आपापला मार्ग श्रेष्ठ वाटतो. एकाच गुरुचे दोन चेले आपापसात भांडत असतात. मंत्रोच्चाराबाबत दोन वैदिकांचे एकमत नसते. या सर्व गोष्टी ऐकण्याची वा वाचण्याची खरोखर आवश्यकता आहे काय?

खरे ज्ञान झाले म्हणजे मनाची गती थांबते. खरे ज्ञान वाचनाने नाही तर साधनेने होते. साधना करीत राहिल्यास सर्व तर्क मावळतात. कारण माणूस अनुभवाच्या प्रांतात विहार करू लागतो. अनुभवाच्या स्तरावर सारे सोपे आहे. मात्र शब्दज्ञानाच्या स्तरावर सारा गोंधळ आहे.

म्हणून तर संतमहात्म्यांचा भर भाराभर पाठांतरावर नसतो तर अनुभूतीवर असतो. ज्ञानेश्वरीचे पारायण, प्रवचन करणारे, मुखोद्गत असणारे पुष्कळजण आहेत. पण अनुभवाचा संबंध आला की त्या कसोटीवर उतरणारे फारच थोडे असतात. प्रसादाचा नारळ आधी कोणाला किंवा कोणाची दिंडी पुढे चालावी यावरून भांडणारे महंत पाहिले की मन विषण्ण होते.

नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी।।
असे नामदेव महाराज का म्हणतात ते लक्षात येते.

समर्थांना प्रबोध या शब्दातून अनुभवात्मक यथार्थ ज्ञान अपेक्षित आहे. अनुभवाच्या पातळीवर एकदा मनुष्य जाऊन पोहोचला, प्रत्यक्ष वस्तूचा साक्षात्कार झाला की मग शब्दांचे ध्वनिभेद वा प्रक्रियांचे मार्गभेद त्याला विचलित करत नाहीत.

चार प्रांतातील चार प्रवासी - भूक लागली - उपाहारगृह काश्मिरी - तोमूल, महाराष्ट्रीय - भात, पंजाबी - चावल तामिळी - सोरू, कर्नाटक - अन्नम. कोणाला काही समजेना शेवटी स्थानकाधिपाने तो गोंधळ संपवला.

प्रबोधनाने मतभेदाची गति खुंटते ती अशी।

श्रुती न्याय मीमांसके तर्कशास्त्रें।
स्मृती वेद वेदांतवाक्यें विचित्रें।
स्वये शेष मौनावला स्थीर पाहे।
मना सर्व जाणीव सांडून राहे॥१५१॥ श्रीराम॥

अर्थ - चार वेद, न्यायदर्शन, निरनिराळ्या मीमांसा, तर्कशास्त्र अथवा प्रमाणशास्त्र, अनेक स्मृती, नाना प्रकारचे वेदांतग्रंथ असे शास्त्रग्रंथ अपार आहेत. स्वतः शेषाने बोलणे टाकून मौन धारण केले, तो स्वस्थ बसला म्हणून अरे मना, स्वतःच्या जाणतेपणाचा अभिमान बाजूला सारून सद्वस्तु पहाण्याचा प्रयत्न कर

स्पष्टीकरण - सतराव्या शतकात शास्त्रपंडितांमध्ये जे लोकप्रिय संस्कृत वाङ्मय होते त्याचा सहज उल्लेख समर्थांनी येथे केला आहे. न्यायशास्त्रावरील व वेदांतशास्त्रावरील निरनिराळे कठीण ग्रंथ अभ्यासून वादपटुत्व मिळवायचे आणि वादविवाद करीत देशसंचार करायचा हा त्या काळच्या पंडितांचा आवडता जीवनक्रम झाला होता. शास्त्र पढलेले हे महापंडित वेदांतशास्त्रात काही नवीन भर घालत होते असेही नाही. केवळ शुष्क वाद आणि पांडित्य प्रदर्शन यापलीकडे दुसरे ध्येय त्यांना नसे. त्या काळात विद्वत्ता तुंबलेल्या पाण्यासारखी होती. तिच्यातील सृजनशक्ती लोपली होती. अशा कुजत जाणाऱ्या विद्वत्तेबद्दल संतांना नावड असते.

एखाद्याने जर वेदांतवाङ्मयाचे अभ्यासाने ग्रहण केले तर त्याला सद्वस्तुचे उत्तम शब्दज्ञान होईल. त्याच्या जोरावर तो तिचे उत्तम वर्णन करेल पण सर्वात अधिक बोलका शेष जिथे पराभूत होऊन स्वस्थ बसतो तिथे माणूस पराभूत होईल यात नवल नाही. सद्वस्तुचे ज्ञान होण्यासाठी आत्मबुद्धी पाहिजे. देहबुद्धीचे ज्ञान तिथे लटके पडते. ते बाजूला ठेवूनच सद्वस्तुची ओळखण करून घ्यायला हवी.

उपनिषदे, न्यायशास्त्र, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा, तर्कसंग्रह, विविध स्मृती (मनु, याज्ञवल्क्य, पराशर) चार वेद, ब्राह्मणग्रंथ, वेदांतामधील सिद्धांत या सगळ्यांमध्ये एक सुसंवाद आहे. पण ते लक्षात येण्यासाठी साधनेच्या दिव्यातून जावे लागते किंवा सद्गुरूंच्या मुखातून त्याचा समन्वय साधावा

© www.madhavseragjuveer.com

लागतो. सगळे मतभेद आहेत ते शब्दज्ञानाच्या स्तरावर.
अनुभव माणसाला मौनात नेतो. भरलेली घागर मौनावते
या निरनिराळ्या शास्त्रातील वचनं व त्यांची गृहीत-कृत्ये परस्परांशी ताडून पाहताना फार विचित्र वाटतात. त्यात केवळ विविधताच नव्हे तर विसंगती किंवा विरोधही जाणवतो. त्यामुळे जसा व्हायला पाहिजे तसा खऱ्या तत्त्वाचा बोध होत नाही. या शास्त्रांच्या अभ्यासाने विद्वत्ता वाढते, वक्तृत्व फुलते, प्रतिपादनाला गंभीरता येते. या सर्वांमुळे लौकिकात प्रतिष्ठा लाभेल पण आत्मज्ञान होणार नाही.
ज्ञानेश्वर माऊलीने या सर्व शास्त्रांना मोरपिसाची उपमा दिली आहे. ते म्हणतात.

मोराच्या आंगि असोसे। पिसे आहाति डोळसे।
परी एकली दिठी नसे। तैसे ॥।। १३.८३५॥

मोराची पिसे सुंदर दिसतात. शोभा आणण्यासाठी उपयोगी पडतात. त्या पिसांवर डोळेही असतात. पण त्यांना दृष्टी नसते सर्व शास्त्रांचे असेच होते. ब्रह्मस्वरूपाचे वर्णन करण्याच्या दृष्टीने ती शास्त्रे जणू आंधळी ठरतात.
तेव्हा साधकाने शब्दज्ञानाच्या वा पुस्तकी पांडित्याच्या नादी न लागता ध्यान आणि भक्ती यांचा अवलंब करून सर्व प्रकारची जाणीव, अहंकार, मीपणा यांचा त्याग करायचा आहे. सर्व जाणिव सांडून राहणे हेच खरे सर्वसमर्पण आहे. अनन्यभावाने शरणागती म्हणतात ती हीच!

© www.madhaveeraghuveer.com

जेणे मक्षिका भक्षिली जाणिवेची।
तया भोजनाची रुची प्राप्त कैची।
अहंभाव ज्या मानसीचा विरेना।
तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना॥१५८॥

अर्थ- माणसाचा अहंकार जोपर्यंत जात नाही, तोपर्यंत त्याला आत्मज्ञान आत्मसात करता येत नाही, हे समजावून सांगताना समर्थ एक दृष्टांत देतात. एक माणूस सुग्रास अन्न जोरभर जेवला पण जेवताना चुकून घासामध्ये एक माशी त्याच्या पोटात गेली. माशी एवढीशी असते पण खाल्लेले अन्न ती काही खाणाऱ्याच्या पोटात ठरू देत नाही. सर्व अन्न ओकायला लावते. ते अन्न अंगी लागत नाही. त्याचप्रमाणे सद्वस्तूचे ज्ञान हे सुग्रास अन्न समजावे आणि जाणतेपणाचा अभिमान ही माशी समजावी. अभिमानरूपी माशी आत्मज्ञानरूपी अन्न मनात ठरू देत नाही. त्या अहंकाराच्या पायी आत्मज्ञान जिरत नाही; आत्मसात होत नाही. आणि असे आत्मसात न झालेले अन्न दुसऱ्याला उपदेश करण्याच्या निमित्ताने ओकारीसारखे बाहेर पडते. अहंकार हे अज्ञानाचे मुख्य लक्षण असल्याने असे घडते.

इतर सर्व ज्ञाने आणि आत्मज्ञान यात फरक असा की इतर ज्ञानामध्ये ज्ञाता हा ज्ञेयापासून भिन्न असतो आणि आत्मज्ञानामध्ये ज्ञाता व ज्ञेय एकरूप होऊन जाते. पण या प्रक्रियेमध्ये अडथळा येतो तो अहंकाराचा! आत्मज्ञानाच्या मार्गातील अहंकार ही मोठी धोंड आहे. आणि वेगळेपणा कायम ठेवणे हेच तर मुळी अहंकाराचा कार्यभाग आहे.

एका साधकाने दीर्घकाळ तपश्चर्या केली तेव्हा त्याच्यावर भगवंतांनी प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितले. तो साधक आतून इतका तृप्त आणि शांत होता की त्याला काहीच नको होते. शेवटी भगवंताने आपणहून त्याला एक वर दिला की तुझी सावली ज्याच्या अंगावर पडेल त्याचा कसलाही आजार बरा होईल. साधकाने हा वर सशर्त स्वीकारला. तो भगवंताला म्हणाला- "माझ्या सावलीने एखाद्याचा आजार बरा झाला आहे हे मला कळता कामा नये."

माणसाला ज्ञान व्हावे, पण आपल्याला ज्ञान झाले आहे

याची जाणिव असता कामा नये. जोपर्यंत जाणीव आहे तोपर्यंत मन आहे. आणि मन मोठे गुंतागुंतीचे आहे. ते उपायाचे रुपांतर अपायात करते. ज्ञानाची जाणिवच अहंकार निर्माण करते. त्यामुळे ज्ञानाचे अपचन होते.

गाढ झोपलेल्या माणसाला गाढ झोपेची जाणिव नसते. तद्वत शुद्ध ज्ञानामध्ये मन परब्रह्मात विलीन झाल्यामुळे ज्ञानाची जाणीव शिल्लक रहात नाही. मग ज्ञानाचे प्रदर्शन कोण करेल? अहंकार समूळ नाहीसा झाला तरच आत्मज्ञान पचेल, जिरेल.

पण अंतःकरणात अहंकार असताना शास्त्रे उपयोगी पडत नाहीत हेच खरे!

© www.madhaveeraghuveer.com

नको रे मना वाद हा खेदकारी।
नको रे मना भेद नाना विकारी।
नको रे मना सीकवू पुढिलांसी।
अहंभाव जो राहिला तूजपाशी ॥२६॥ श्रीराम॥

अर्थ - वास्तविक वाद हा बुद्धीचा खेळ आहे. सत्यशोधन हा त्याचा मुख्य हेतू आहे. पण दोन अहंकारी माणसे जेव्हा वाद करतात तेव्हा सत्यशोधनाचा हेतू बाजूला राहून एकमेकांवर केवळ कुरघोडीच करण्याचा प्रयत्न करतात. त्यातून अप्रियता निर्माण होते. आपण कोणीतरी विशेष आहोत ही भावना अहंकारापोटी असते. त्यामुळे तो कोणाशीच समरस होऊ शकत नाही. त्याच्या सभोवार वावरणाऱ्या माणसांपासून तो वेगळाच राहतो. मनाने दूर जातो. त्याच्या जीवनात कोणाविषयी सद्भाव आढळत नाही. म्हणून समर्थ मनाला विनवतात की ज्या अहंभावाने स्वतःला समाधान मिळाले नाही तो अहंभाव आजूबाजूच्या व्यक्तींना न शिकवणे बरे!

स्पष्टीकरण - शब्दज्ञानी माणूस आपल्या बोलण्यावरून अहंकाराचे प्रदर्शन करतो. अपरिपक्व माणसे त्याचे अनुकरण करतात. म्हणजे फक्त फक्त अहंकारी बनायलाच शिकवले जाते. यातूनच नाना प्रकारचे दुःखदायक वाद आणि भेद निर्माण होतात. इतरांना शिकवण्यापेक्षा माणसाने स्वतःला शिकवावे. आपण सुधारलो की जग आपण सुधारले. अज्ञानी माणूस मेहनत करायला लागला की त्याच्यामागे जाणारा समाज मेंढ्यांप्रमाणे खड्ड्यात कोसळतो.

सांगणाऱ्याला जसा अहंकार असतो तसा ऐकणाऱ्याकडेही असतो. आपले मत कोणी सोडत नाही. अशा स्थितीत निष्कारण वाद करून कटशोषाचे धनी का व्हावे? सुधारण्याची, चांगले होण्याची शक्यता असते ती स्वतःच्या संबंधात. पण माणूस स्वतःला चांगला समजून जग सुधारले पाहिजे असे म्हणत राहतो. अहंकाराने असे मानणे म्हणजे आत्मनाश करून घेणेच आहे.

कासया गुणदोष वानू आणिकांचे।
मज काय त्यांचे उणे आहे॥

हे संतवचन ध्यानात घेऊनच माणसाने वागावे हे बरे!

© www.madhavveeraguveer.com

classmate
Date ________
Page ________

अहंतागुणे सर्व ही दुःख होते।
मुखे बोलिले ज्ञान ते व्यर्थ जाते॥
सुखी राहता सर्व ही सूख आहे।
अहंता तुझी तू चि शोधूनि पाहे॥६५॥ श्रीराम॥

<u>अर्थ</u> - अहंभाव हा सर्व दुःखांच्या मुळाशी असतो. अहंभावसंपन्न माणसाने केलेला ज्ञानाचा उपदेश वाया जातो. अहंभाव बाजूला सारून जो सुखी होतो त्याला जीवनात सुखच अनुभवास येते. मना तुझा अहंभाव तूच शोधून काढ.

स्पष्टीकरण अहंभाव भेद जन्मास घालतो. भेदामुळे भय निर्माण होते. भय काळजीला प्रसवते. काळजीतून सर्व दुःखे प्रसरतात म्हणून अहंभाव हे सर्व दुःखांचे मूळ आहे.

ज्ञान अनंत असल्यामुळे खरा ज्ञानी माणूस ज्ञानाने भारावून जातो नम्र होतो. त्या नम्रतेमुळे त्याचे बोलणे ऐकणाऱ्याच्या मनावर उत्तम परिणाम करते. परंतु अंगी अहंभाव असेल तर माणसाला ज्ञानाचे अनंतपण आणि अंतरंग कळणार नाही असा माणूस मोठा पंडित, वक्ता असेल पण त्याने सांगितलेले ज्ञान हृदयाला जाऊन भिडत नाही.

(शंकराचार्य)

अहंभाव विलीन करणे हाच सुखी होण्याचा मुख्य मार्ग आहे. अहंभाव राखून भोगायला मिळालेले सुख हे तात्पुरते असते. परंतु अहंभाव विलीन झाल्यावर येणारा सुखाचा अनुभव हा शाश्वत, टिकणारा असतो ∴ प्रत्येकाने आपल्या अंतर्यामी असणारा अहंकार शोधून नाहीसा करावा.

अहंकार हेच आपल्या दुःखाचे कारण असते. माणसे अगदी साध्या साध्या गोष्टींना प्रतिष्ठेचा प्रश्न बनवतात. मान अपमानाच्या किरकोळ प्रसंगावरून वैरभाव निर्माण करतात. मयसभा पाहताना दुर्योधन पाण्यात पडला किंवा स्वयंवर सभेत द्रौपदीने कर्णाला भाग घेऊ दिला नाही म्हणून कर्णाने अढी धरली. दुर्योधन, कर्ण यांच्या अहंकारातून हा सूडाचा प्रवास सुरू झाला.

(मानपान)

एखादा जमिनीचा तुकडा, एखादी वस्तू यावरून आयुष्यभर कटकटी करणारे भाऊ आपण पाहतो. मुलगा डॉक्टर किंवा इंजिनीयर व्हावा असे पालकांना वाटते. यात मुलाच्या प्रेमापेक्षा आम्ही मुलाला

© www.madhuveeraghuveer.com

डॉक्टर केले हा अभिमान जास्त असतो. पती-पत्नीचा संघर्ष, एखाद्या संस्थेतील विश्वस्तांचे मतभेद हे सगळे अहंकारामुळेच घडून येते. मी पण प्रपंचाच्या आणि परमार्थाच्या आड येतो.

मी पणे प्रपंच न घडे। मी पणे परमार्थ बुडे।
मी पणे सकळही उडे। यश कीर्ति प्रताप॥
मी पणे मैत्री तुटे। मी पणे प्रीति आटे।
मी पणे लिगटे। अभिमान संगी॥

अहंकारी माणसाचा स्पर्श काट्यासारखा तर विनम्र माणसाचा स्पर्श रेशमासारखा असतो. आर्जव, आदर, जिव्हाळा, प्रेम, भक्ती, निष्ठा, त्याग या सर्व सद्गुणांचा अहंकार हा शत्रू आहे. लाचारी, उद्धटपणा, दर्प, वासना, अवडंबर, भोग हे सारे अहंकाराचे मित्र आहेत. अहंकार सोडून दिला तर माणसाला सुख वेचता येईल. साध्या-साध्या प्रसंगातून जीवनात आनंदाचे झरे निर्माण करता येतील. रिक्षावाले काका, कंडक्टर, पोस्टमन फिल बॉसमन यांचा ग्रंथ Give happiness a chance तो म्हणतो की आनंद तुमच्या घराचे दार ठोठावतो आहे. लवकर दार उघडून त्याला आत घ्या.

कस्तुरी स्वतःच्या सुगंधामुळे प्रगट होते. ही कस्तुरी आहे असे शपथेवर सांगावे लागत नाही. ज्ञानादि गुणांचे तसेच आहे. अहंकार सोडून राहिले म्हणजे माणूस स्वतःही सुखी होतो आणि इतरांनाही सुखी करतो. आपल्याकडे अहंकार आहे की नाही हे ज्याचे त्यानेच शोधले पाहिजे. कौतुक करणारा चांगला आणि दोष दाखवणारा वाईट असे वाटणे हेही अहंकाराचे द्योतक आहे. नम्रता असावी पण नम्रता दाखवणे हा अहंकारच आहे. तो फार सावधपणे शोधावा लागतो. या कामी दुसऱ्या कुणाचे सहाय्य घेता येत नाही. तशीच उत्कट श्रद्धा असेल तर शास्त्राचे किंवा गुरुचे मार्गदर्शन उपयोगी पडते.

© www.madhaveeraghuveer.com

अहंतागुणे नीति सांडी विवेकी।
अनीतिबळे श्लाघ्यता सर्व लोकीं।
परी अंतरी सर्व ही साक्ष येतो।
प्रमाणांतरे बुद्धि सांडून जाते॥१६२॥श्रीराम॥

अर्थ - अहंभावाच्या पायी विचारी माणसे नीतीचा मार्ग सोडतात. इतकेच नव्हे तर अनीतिच्या जोरावर साऱ्या समाजात प्रसिद्ध होतात. पण लोकांनी जरी कितीहि तारीफ केली तरी त्यांचे मन त्यांना खरे काय ते सांगतेच. नीतिच्या मार्गाने वागायला सांगणारे शास्त्राधार सोडून त्यांची बुद्धी अनीतिच्या मार्गाने जाते.

स्पष्टीकरण - कोणत्याहि काळी कोणत्याहि समाजात कमी अधिक प्रमाणात भ्रष्टाचार चालू असतो भ्रष्टाचार करणारे माणसे स्वत:ला हीन समजतात व सर्वसाधारण समाजेद खील त्यांना कमीच मानतो परंतु अहंभावाची जेव्हा फार वाढ होते तेव्हा स्वार्थाला ऊत येतो. स्वार्थ अति वाढला की समाजातील विचारी माणसे सुद्धा नीति भ्रष्ट होतात. मर्यादेने वागत नाहीत. उलट आपल्या अनीतिच्या मस्तीने समाजात मान्यता पावतात. समाजजीवनात हा काळ कठीण समजावा.

माणूस अहंभाव व स्वार्थ यांच्या नादाने कितीहि चांगला म्हणून मिरवत असला तरी त्याचे मन त्याला खरे काय ते सांगत असते. माणूस जगाला फसवत असतो पण मनाला कसा फसवणार ? त्याच्या अंतरातील चांगला मी त्याला नीति विषयक शास्त्रप्रमाणे दाखवतो पण स्वार्थाच्या जोरावर सगळ्या चांगल्या गोष्टी दूर सारून वाटेल तसे वागतो. असे वागणारे समाजात बहुसंख्य झाले म्हणजे सज्जनांना कठीणकाळ येतो.

माणसाला बऱ्या वाईटाचे ज्ञान असते. तो विवेकी असतो पण त्याच्या ठिकाणचा अहंकार त्याला नीतिने वागू देत नाही. शास्त्राच्या नीतिच्या मर्यादा सोडून तो वागू लागतो त्याचे जीवन व्यसनांनी, व्यभिचाराने बरबटलेले असले तरी त्याला समाजात मानमान्यता हवी असते. आणि तेव त्यासाठीच तो अनीतिचे तत्वज्ञान बनवतो. अनेक महंत, कलाकार, साहित्यिक, पुढारी हे याची स्पष्ट उदाहरणे आहेत.

Copy केली तर मन खाते

© www.madhaveeraghuveer.com

शिव्यागाळीने भरलेले, ओंगळ, बीभत्स लेखनही वास्तवता व पीडित दलितांचे हुंकार या नावाने मान्यता पावते. धर्मातील असत्य आणि विकृत साहित्यही चाकोरीबाहेर पडण्याचा प्रयत्न प्रस्थापिताशी विरोध या नावाखाली भरपूर खपते. सुमधुर संगीत अळणी म्हणून बाजूला टाकून शिव्यांनी भरलेले, वाईट आवाजात गायलेले आणि वाद्यांचा दणदणाट असणारे संगीत नवीन पिढीचे प्रतिनिधित्व करणारे म्हणून डोक्यावर घेतले जाते.

देवांच्या सोमरसपानाचे दाखले देऊन मद्यपान करणारे असेच अनीतिचे तत्त्वज्ञान बनवतात. श्रुती, स्मृती, संत यांची वचने बुरसटलेल्या विचारांची द्योतक मानली जातात. धूम्रवलये त्यांना सभ्यतेचे, आधुनिकतेचे प्रतीक वाटते. आपल्या प्रभावी वाणीने तो त्यांचे समर्थन करतो आणि मग आरोग्यदृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या घातक असलेली ही व्यसने व्यापक प्रमाणात पसरत जातात. आणि कोवळी तरुण पिढी त्याची बळी ठरते.

अनीतिचे तत्त्वज्ञान बनवणारा अहंकारीही शेवटी माणूसच असतो. त्याला हे सर्व अयोग्य आहे हे आत कुठेतरी जाणवते पण हा आतला प्रामाणिक आवाज दडपला जातो. कारण कुणाचाच कशालाच प्रमाण न मानणे हाच अहंकाराचा स्वभाव आहे.

दुर्योधन - जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः
जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः।
केनापि देवेन हृदि स्थितेन
यथा निर्दिष्टोऽस्मि तथा करोमि॥

© www.madhaveeragniveer.com

Date 21.12.13
Page

देहे बुद्धिचा निश्चयो दृढ झाला।
देहातीत ते हीत सांडीत गेला।
देहेबुद्धि ते आत्मबुद्धी करावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६३॥ श्रीराम॥

अर्थ - अज्ञानामुळे मी देहच आहे असा घट्ट निश्चय होतो त्यामुळे माणूस आत्महित साधू शकत नाही. मी देहच आहे या भावनेला मी आत्माच आहे असे रुप द्यावे. पण हे साधण्यासाठी आत्मबुद्धी स्थिरावलेल्याची संगत करावी.

स्पष्टीकरण - ईश्वराने आपल्या संकल्पानुसार विश्वाची रचना केली. त्यात त्याने प्रवेश केला. म्हणून विश्वाला बाहेर दिसणारे दृश्य आणि त्याला सांभाळणारे अदृश्य अशी दोन अंगे आहेत. दृश्य अंग तात्पुरते, अपूर्ण व पंच महाभूतांपासून बनलेले आहे. अदृश्य अंग कायमचे, पूर्ण व आत्मस्वरुपाचे बनलेले आहे. आपल्या शरीराला हीच दोन अंगे असतात. अज्ञानामुळे आपण देहालाच सर्वस्व मानतो व आत्म्याला विसरतो त्यामुळे आपल्या जीवनात स्वानंद अनुभवता येत नाही. त्यासाठी देहाला सर्वस्व मानणाऱ्या प्रवृत्तीला वळवून आत्म्याला सर्वस्व मानावे.

दृश्य वस्तूंच्या समुदायात एका वस्तूवरील लक्ष काढून दुसऱ्या वस्तूवर ठेवण्यास विशेष कठीण जात नाही. पण आत्मस्वरुप हे अदृश्य तर आहेच पण ते अतिशय सूक्ष्म व अतींद्रिय आहे. त्याच्या ठिकाणी आपले लक्ष केंद्रित करायला शिकावेच लागते. ही विद्या संतांपाशी असल्याने त्यांची संगत करावी.

शास्त्रामध्ये मनाची व्याख्या संकल्पविकल्पात्मक मन अशी केली आहे तर बुद्धीची व्याख्या निश्चयात्मिका बुद्धिः अशी केली आहे. मन संकल्प विकल्प करुन वळवळत राहते तर बुद्धि निर्णय घेऊन निश्चयात्मकता आणते. निर्णय योग्य घेतला गेला तर ती सद्‌बुद्धी आणि निर्णय चुकीचा झाला तर ती दुर्बुद्धी! सगळे संत सांगतात की आपण देह नसून आत्मा आहोत. समर्थ म्हणतात —

ऐक शिष्या येथीचे वर्म। स्वये तूंचि आहेसि ब्रह्म।
ये विषयी संदेह भ्रम। धरुंची नये॥

©www.madhaveeraghuveer.com

साधकाला खात्री पटत नाही म्हणून तो स्वतःला देह समजत राहतो. आपण देह आहोत असा बुद्धीचा निश्चय होणे याला देहबुद्धी म्हणतात तर आपण आत्मा आहोत असा निश्चय होणे ही आत्मबुद्धी आहे.

येशू खिस्ताची आत्मबुद्धी प्रबळ होती. त्यामुळे देहाला होणारे कष्ट त्याच्या आत्म्यापर्यंत पोहोचत नव्हते. हातापायाला खिळे ठोकले जात असताना तो शांत होता.

नारळात जोवर पाणी असेल, तो ओला असतो तोपर्यंत आतील खोबरे वरच्या करवंटीला चिकटलेले असते. पण जेव्हा तो कोरडा होतो पूर्ण अलिप्त होतो तेव्हा आतील खोबरे व वरची करवंटी पूर्णपणे अलग होतात. येशूसारखे संत या गोटा खोबऱ्यासारखे असतात. ते देहला चिकटलेले नसतात. त्यामुळे देहाच्या वेदना त्यांना जाणवत नाहीत. मात्र सामान्य माणसे ओल्या खोबऱ्यासारखी असतात. ती देहाला चिकटली असल्याकारणाने देहाचे सुखदुःख हेच आपले सुखदुःख मानतात.

संत कबीरांच्या पायाला जखम झाली होती. एक कुत्रे त्या जखमेतील रक्त चाटत होते. नंतर ते जखमेजवळची कातडी ओढू लागले. तरी कबीर आपले शांतच! एकाने याबद्दल विचारले तेव्हा ते म्हणाले — कुत्ता जाने चमडी जाने! हे आत्मबुद्धीचे उत्कट उदाहरण आहे. रामकृष्ण परमहंसांना घशाचा कॅन्सर होता. जेमतेम चार चमचे पेज गिळता यायची. त्यांच्या आवडीची मिठाई त्यांना खाता यावी म्हणून शिष्य हळहळायचे. तेव्हा ते म्हणाले — इतक्या मुखातून कोण खातो आहे?

व्यवहाराच्या पातळीवर आणि परमार्थाचे साधन म्हणून शरीर वा शरीराची उपयुक्तता नाकारता येत नाही. पण शरीरच सर्वस्व मानू नये. त्यातूनच स्वैराचार, अनीति, स्वार्थांधता, परपीडन अशा वैयक्तिक व समाजाचा घात करणारी परिस्थिती निर्माण होते. म्हणून देहभावाच्या सुखकल्पनेत गढून गेलेली वृत्ति प्रयत्नपूर्वक आत्म्याकडे वळवावी. उदात्त ध्येय डोळ्यांपुढे ठेवावे. परोपकार, दान, ईश्वरभजन इ० साधनांचा अवलंब करावा. त्यासाठी सतत संतांच्या सहवासात रहावे.

© www.madhaveeraghuveer.com

मने कल्पिला विषयो सोडवावा।
मने देव निर्गुण तो ओळखावा।
मने कल्पिता कल्पना ते सरावी।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥१६०॥ श्लोकक्रमांक॥

अर्थ- मनाने कल्पना करून निर्माण केलेल्या दृश्यापासून स्वतःला बाजूला काढावे. त्रिगुणांच्या पलीकडे असलेला देव मनानेच अनुभवावा. मनाने केलेली कल्पना कल्पनेनेच नाहीशी करावी. पण हे साधण्यासाठी सज्जनांची संगत धरावी.

स्पष्टीकरण - प्राण्यामध्ये आणि माणसामध्ये मूलभूत फरक आहे. जनावरे ईश्वरनिर्मित सृष्टीमध्ये जगतात. तर माणूस ईश्वरनिर्मित आणि मानवनिर्मित अशा दोन सृष्टींमध्ये जगतो. ईशसृष्टी पंचभूतांची तर जीव सृष्टी कल्पनांची आहे. माणूस देहाने ईश्वरनिर्मित जगात वावरत असला तरी मनाने तो स्वनिर्मित कल्पनांच्या जगात वावरत असतो. स्वनिर्मित व भ्रामक असे कल्पनाजगत माणसाला स्वानंदापासून दूर ठेवते. तेव्हा आपल्या मनाने निर्माण केलेले हे जग मनानेच नाहीसे करावे.

हे कल्पनामय जगत दृश्यावर आधारित असते. या दृश्यातून आपल्याला आनंद मिळावा या कल्पनेने माणूस दृश्याला चिकटतो आणि हे चिकटणेच बंधाला कारण ठरते.

जे जे दृश्य असते ते प्रकृतीच्या कक्षेमध्ये येते आणि प्रकृती ही त्रिगुणात्मक असते. आत्मस्वरूप हे त्रिगुणांच्या पलीकडे आहे. त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी त्रिगुणांना ओलांडून गेले पाहिजे. आपले मन हेच अज्ञानाचे निवासस्थान आहे. जी वस्तु जशी नाही ती तशी आहे असे समजून घ्यायला लावणे हा मनाचा स्वभाव आहे. कल्पनेला स्वस्वरूपाकडे कशी वळवावी याची युक्ती संतसंगतीमध्ये शिकता येते.

मनुष्यत्व, मुमुक्षत्व आणि महापुरुषसंश्रय या तीन गोष्टी दुर्लभ आहेत. सत्संग दुर्लभ असला तरी असंभव नाही. सर्वकाळ जरी लाभला नाही तरी अधूनमधून सत्संगाची कास धरावी. पूज्य शंकराचार्य म्हणतात—

सत्संगत्वे निःसंगत्वम्। निःसंगत्वे निर्मोहत्वम्।
निर्मोहत्वे निश्चलचित्तम्। निश्चलचित्ते जीवनमुक्तिः॥

सतत संतांच्या सहवासात राहिले म्हणजे विषयांचे ममत्व कमी होते. नाहीतर विषयात सुख असल्याची कल्पना मन करते. त्यातून विषयसेवनाची मालिका आयुष्यभर चालू राहते व मौलिक नरदेह त्यासाठी खर्ची पडतो. म्हणून मनाने आपले निर्गुण स्वरूप ओळखले तर विषयाची कल्पना मनुष्य सोडून देईल. कल्पना माणसाच्या विवेकशक्तीला आंधळे बनवते.

जशी दृष्टी तशी सृष्टी असते. पूर्वी फार प्रिय असणारी व्यक्ती पुढे पुढे डोळ्यासमोर नकोशी होते. प्रेमाने संसार करणाऱ्या पती पत्नीमध्ये घटस्फोट होतो. आपल्याला जो मनुष्य आवडत नाही तो काही लोकांना प्रिय वाटतो. याचा अर्थ प्रेमही काल्पनिक व घटस्फोटही काल्पनिक आहे. म्हणून कल्पनेनेच कल्पना बाजूला सारावी. याचाच अर्थ वाईट कल्पनेऐवजी चांगली कल्पना करावी. नंतर ती चांगली कल्पनासुद्धा बाजूला सारावी. राखेने भांडे घासावे आणि भांडे स्वच्छ झाल्यावर पाण्याने राखही धुवून टाकावी. असे हे तंत्र आहे. त्यालाच नाथ 'मन मनेचि मारावे' असे म्हणतात. आणि कल्पनाच करायची झाल्यास रामकथा किंवा कृष्णकथा करावी.

समर्थांना सगुण अमान्य नाही. सगुणभजनावर आणि मूर्तिपूजेवर त्यांचे उत्कट प्रेम आहे. परंतु सगुणामधले निर्गुण जाणून घेण्याचा त्यांचा आग्रह आहे. तुकाराम महाराज म्हणतात.

आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाही ऐसा मनी अनुभवावा ।

अद्वैत हे तत्त्वतः जाणता येत अनुभवता येते पण त्याचे वर्णन करता येत नाही. कल्पनेचा निरास करण्यासाठी कल्पनेचाच उपयोग करावा. संत हे साक्षात्कारी, अनुभवी असल्याने त्यांच्या संगतीत राहिल्याने कल्पनानिरासाच्या अवस्थाक्रम योग्य रीतीने स्पष्ट होतो म्हणून सत्पुरुषांच्या संगतीत राहण्यासाठी प्रयत्नशील रहावे.

classmate
Date
Page

देहादीक प्रपंच हा चिंतियेला।
परी अंतरी लोभ निश्चीत ठेला।
हरीचिंतने मुक्तिकांता वरावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६॥ श्रीराम॥

अर्थ - माणूस आपल्या देहाचे आणि मुलाबाळांचे म्हणजेच संसाराचे सारखे चिंतन करतो. पण त्यामुळे अंतःकरणात प्रपंचाची आसक्ती घट्ट होत जाते. ते सोडून माणसाने भगवंताचे सारखे चिंतन केले तर त्याला मोक्षप्राप्ती होईल पण हे साधण्यासाठी आत्मबुद्धी स्थिरावलेल्या संतांची संगत करावी.

स्पष्टीकरण - कशाचे तरी चिंतन करणे हा मानवी मनाचा एक सहज स्वभाव आहे. मन ज्याचे चिंतन करते त्याचा आकार घेते. सामान्य माणूस प्रपंचातील वस्तूचे, व्यक्तींचे सतत चिंतन करत असतो. त्याचे मन तिथेच घोटाळत राहते. परिणामी त्याच्या मनात प्रपंच घट्टपणे जाऊन बसतो. जिवंतपणी तर तो प्रपंचाच्या चिंतनात बुडालेला असतोच पण मेल्यावरदेखील ते चिंतन तो बरोबर घेऊन जातो.

याच्या उलट माणसाने सतत भगवंताचे चिंतन केले तर त्याचे मन क्रमाक्रमाने भगवंताचा आकार घेत जाते. ज्या मानाने ते भगवदाकार होईल त्या मानाने दृश्याच्या दडपणातून ते मोकळे होईल. असे मोकळे मन सानंदाने भरून जाते. नवीन विःवाहिताचा आनंद भगवद्भक्ताला मिळतो.

एकदा मी देह आहे ही कल्पना घट्ट झाली की प्रपंच खरा वाटू लागतो. अपत्यस्त्रियांचे देह खरे वाटू लागतात. या सगळ्यांची जबाबदारी स्वीकाराविशी वाटू लागते. नसलेला अंतर्यामी लोभ वाटू लागतो. आपला संसार संपन्न व्हावा म्हणून पैशाचा लोभ निर्माण होतो. हाव वाढत जाते. त्यापेक्षा सतत सज्जनांच्या संगतीत राहून भगवद्चिंतन करावे. ते काल्पनिक असले तरी बंधनकारक किंवा दुःखपर्यवसायी नाही.

माणसाच्या अंतर्यामी स्त्रीचे पर्यायाने वैवाहिक जीवनाचे जे आकर्षण आहे ते ध्यानात घेऊन [illegible] मुक्तिकांतेची उपमा दिली आहे. प्रपंचातील कांता एकवेळ बंधनास कारण ठरेल पण हरिचिंतनाची मुक्तिकांता संसारातून मुक्त करेल

तुकाराम महाराज म्हणतात -

तुका म्हणे मुक्ती परिणिली नोवरी ।
आता दिस चारी खेळी मेळी ॥

दुसऱ्यावर प्रेम करताना ते प्रेम शरीरासंबंधी न ठेवता त्या व्यक्तीच्या आत्मस्वरूपावर ठेवले तर ते प्रेम बंधन ठरणार नाही. राम आणि सीता, कृष्ण आणि गोपी, रामकृष्णदेव आणि शारदामाता यांचे प्रेम अशाप्रकारे निर्विकारी, अशरीरी होते.

रामाचे सीतेवर प्राणापलीकडे प्रेम होते पण तरी रामाने सीतेचा त्याग केला. गोकुळच्या गौळणी या भ. श्रीकृष्णाच्या अभिन्नहृदयरूप होत्या. तरी सुध्दा कंसवधापूर्वी गोकुळ सोडल्या नंतर भगवान पुन्हा गोकुळाला गेले नाहीत. हे खरे उदात्त प्रेम आहे. या उदात्ततेमुळेच अन्या प्रेमिकाला मीलनापेक्षाही प्रतीक्षेत गोडी वाटते. या उदात्ततेमुळेच वाचस्पती मिश्रांच्या पत्नीने - भामतीने पतीकडून आपातत: झालेली उपेक्षा समाधानाने सहन केली. त्या साध्वीने स्वत:च्या अस्तित्वाची जाणिवही विद्यानंदात तल्लीन झालेल्या आपल्या पतीला होऊ दिली नाही. प्रेमाचे हे दिव्य स्वरूप आहे. आपण मात्र प्रत्यक्ष उपभोगात परिणत होणाऱ्या आसक्तीलाच प्रेम हे सोज्वळ नाव देतो.

प्रेयसीच्या भेटीसाठी जशी ओढ लागते तशी मुक्तीसाठी लागू द्या. प्रेयसीच्या मीलनाने जे सुख मिळते त्यापेक्षा अनंतपटीने अधिक आणि शाश्वत सुख मुक्तीच्या प्राप्तीने लाभते.

© www.madhaveeraghuveer.com

अहंकार विस्तारला या देहाचा।
स्त्रियापुत्रमित्रादिके मोह त्यांचा।
बळे भ्रांति हे जन्मचिंता हरावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६६॥ श्रीराम॥

अर्थ- देहाच्या मीपणाचा विस्तार होऊन स्त्री, पुत्र, मित्र इ० व्यक्तीमध्ये मन गुंतून राहते. पण अज्ञानामुळे झालेला हा गैरसमज आहे. तो अभ्यासाने नाहीसा करावा लागतो. म्हणजे पुन्हापुन्हा जन्माला येण्याची कटकट नाहीशी होईल. पण हे साधण्यासाठी आत्मबुध्दी स्थिरावलेल्या सत्पुरुषाची संगत धरावी.

स्पष्टीकरण - मी देह आहे अशी निःसंशय भावना होणे हेच देहबुध्दीचे स्वरुप आहे. पण ही भावना पसरते आणि मालकपणाने इतर व्यक्ती व वस्तू जवळ करते. मोह म्हणजे चित्ताची विपरीत अवस्था! जो देह मी नाही तो मीच आहे असे मनाने समजणे म्हणजे मोह निर्माण होणे. त्यानंतर जे जे देहासंबंधी आहे ते ते माझे वाटू लागते. हा त्या मोहाचा विस्तार होय. जे मी नाही ते मी आहे अशी विपरीत भावना होणे यालाच वेदांतात विपरीत ज्ञान किंवा भ्रांति म्हणतात. या भ्रांतिमुळे जीवनात अनेक दुःखे भोगावी लागतात आणि पुन्हापुन्हा जन्म घ्यावा लागतो. पुढचा जन्म कसा व कोणता येईल याची काळजी वाटते. सत्संगतीने ती नाहीशी होते.

मी देह आहे आणि हा सारा संसार माझ्या सुखा-साठी आहे अशी एकदा पक्की धारणा झाली की मग मन मुलाबाळात, नातवंडात, पतवंडात अडकून राहते. आप्तस्वकीयांबद्दल मोह निर्माण होतो. पणती पहावी. आपल्या डोक्यावर सोन्याची फुले उधळून घ्यावी. पणतीचे लग्न पहावे. तिच्यासाठी दागिन्यांची सोय करावी हे सारे सुरु होते. हा संसारच भ्रांतीजन्य आहे. जिथे सुख नाहि तिथे सुख आहे असे वाटू लागते. जे आपले नाहीत ते आपले वाटू लागतात.

तुवां भोगिल्या पुनरावृत्ती। ऐसी माय बापे किती।
स्त्रीकन्यापुत्र होती। लक्षानलक्ष॥
कर्मयोगे सकळ मिळाली। येके स्थळी जन्मास आली।
ती रे कैसी आपुली मानिली। पढतमूर्खा।

कैची माता कैचा पिता। कैची बहीण कैचा भ्राता।
कैची सुहृदे कैची वनिता। पुत्रकलत्रादिक॥
हे तू जाण मायेची। अवघी सोयरी सुखाची।
हे तुझ्या सुखदुःखाचे। सांगाती नव्हेती॥

अर्थ — ही भ्रांती एकदा नाहीशी झाली की पुन्हा जन्म घेण्याचे कारण राहणार नाही. 'जन्मचिंता हरावी' याचा अर्थ पुन्हा जन्म घ्यावा लागेल अशी सामग्री गोळा करू नये. व्यवहारातील सारे संबंध वरवरचे, दायित्वापुरते असावेत. हृदयात भगवंताला स्थान असावे. कोणातही अडकू नये पण कर्तव्याला चुकू नये. आपल्याला या जगात पाहुण्यासारखे वावरता आले पाहिजे. संत या जगात निर्लेपपणे वावरतात. ∴ त्यांची संगत धरावी.

माझे माझे वाटणे हीच भ्रांति आहे. बळाने म्हणजे दृढता-पूर्वक प्रयत्नपूर्वक या भ्रांतीचे निरसन करावे तरच सर्व प्रकारचे क्लेश नाहीसे होतील.

© www.madhaveeragurveer.com

करा निश्चयो शाश्वताचा करावा।
म्हणे दास संदेह तो वीसरावा।
घडीने घडी सार्थकाची करावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६०॥श्रीराम॥

अर्थ - कायम टिकणाऱ्या आत्मवस्तूबद्दल मनाची निःसंशय भावना करावी. श्रीसमर्थ सांगतात की मनाची दोलायमान अवस्था भूतकाळात नेऊन सोडावी. शिवाय आज प्रत्येक क्षण आत्मवस्तूकडे उपयोगात आणावा. पण हे साधण्यासाठी आत्म-बुद्धी स्थिरावलेल्या सत्पुरुषाची नित्य संगत करावी.

स्पष्टीकरण - सामान्य माणसाचे मन कोणत्याही अतींद्रिय वस्तूबद्दल अगदी निःशंक नसते. एकीकडे शाश्वत असा ईश्वर आहे ही त्याची श्रद्धा असते. तर दुसरीकडे तो आहे का नाही याबद्दल मनात संदेह असतो. श्रद्धा आणि संदेह यामध्ये त्याचे मन हेलकावे खात असते. या अस्थिर अवस्थेमुळे त्याचे मन ईश्वराशी चिकटत नाही. या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी ईश्वराबद्दल दृढ निश्चय करावा व सर्व संशय विसरून जावेत. सत्संगतीने हे जमू शकते.

मनाला संदेहापासून सोडवण्यासाठी काही काळ जावा लागतो म्हणून माणसाने आपल्या ध्येयाची जाण ठेवून आपला वेळ वाया जाणार नाही याची खबरदारी बाळगावी. जो चिकाटीने अभ्यास करील त्याला फळ निश्चितच मिळेल.

तात्पुरते सुख आणि शाश्वत सुख याचा विवेक माणसाला करता यायला हवा. व्यवहारातदेखील आपण दीर्घकालीन विमा उतरवून आपल्या वृद्धापकाळची किंवा मुलाच्या शिक्षणाची तरतूद करून ठेवतो. मग अध्यात्मातदेखील विषयसुख आणि आत्मसुख (प्रेयस आणि श्रेयस) याचा निवाडा करायला नको का? शाश्वताचा निश्चय करताना संयम, त्याग, उपासना, सत्यनिष्ठा, ब्रह्मचिंतन याची कास धरावी लागते. आपली प्रत्येक कृती आपल्याला शाश्वत सुखाकडे नेत आहे ना? याची काळजी घ्यावी लागते. पण या सगळ्यामुळे एका जन्माचा नाही तर जन्मजन्मांतरीचा प्रश्न सुटणार आहे. शाश्वत सुखाची वाटचाल दीर्घकालीन असते.

© www.madhavveeragluveer.com

बाहेत बुद्धिभेद करणारे खूप जण भेटतात. त्यामुळे संदेह निर्माण होऊ शकतो. एकदा संदेह आत शिरला की निश्चयाचे बळ कमी पडते.

श्रद्धा एवढी दृढ हवी, इच्छा एवढी उत्कट हवी, धैर्य एवढे निश्चल हवे की संदेहाचे पूर्ण विस्मरण व्हावे. यासाठी प्रत्येक गोष्टीत वेळ वाया घालवू नये. समर्थ म्हणतात –

काळ सार्थकाचि करावा। जनासहित॥ किंवा एका अभंगात

हरिभक्तीविणे जाऊ नेदी क्षण। या नाव लक्षण सार्थकाचे॥

ज्या गोष्टी अशाश्वत आहेत त्याचा भरवसा धरू नये. माणसाने सतत क्षणिक आणि भ्रांत यात गुंतून न राहता शाश्वत काय, सत्य काय ते विचारात घ्यावे. आणि आपले वागणे त्या प्रमाणे सुधारावे. विचाराने, विवेकाने साधनेची वाटचाल करावी.

संशयाच्या जंजाळातून बाहेर पडण्यासाठी सद्ग्रंथांचे वाचन, सतत चिंतन, निरलस प्रयत्न व सद्गुरूंचा सहवास या गोष्टी निश्चितपणे उपयोगी पडतात.

© www.madhaveeraghuveer.com

करी वृत्ति जो संत तो संत जाणा।
दुराशागुणे जो नव्हे दैन्यवाणा॥
उपाधी देहबुद्धिते वाढवीते।
परी सज्जना केवि बाधू शके ते॥१६८॥ श्रीराम॥

<u>अर्थ</u> - आपल्या मनाला जो सर्वांगाने आत्ममय करतो तोच संत होय. त्याच्या अंतरी आत्मस्वरूपाहून अन्य वासनाच नसते. त्यामुळे तो मस्त असतो. प्रपंचाचा पसारा देहबुद्धिला वाढवतो हे खरे पण संताला त्याची बाधा होऊ शकत नाहि.

<u>स्पष्टीकरण</u> - या श्लोकामधील संताची व्याख्या फार उचित व सुटसुटीत आहे. ज्याची स्मृति, कल्पना, अवधान, भावना व विचार सारे आत्मस्वरूपाने भरून जातात तो संत होय. माणसाचे मन आत्मस्वरूपाने इतके व्यापल्यावर त्यामध्ये इतर काही ठरू शकत नाही. म्हणून तो आतबाहेर स्वस्वरूपात बुडून जातो. तो संतपदाला पोचतो.

दृश्यवस्तूबद्दलची वासना माणसाला दीन व परतंत्र बनवते. संतांच्या अंतर्यामी तिला स्थानच नसल्याने तो आपल्याच आनंदात मस्त असतो.

सामान्य माणसाच्या जीवनांत प्रपंचाचा पसारा त्याच्या देहाहंकाराचे पोषण व वर्धन करतो हे खरे पण संत आत्म्यातच रममाण झाल्याने दृश्यातील घडामोडी त्याच्या पर्यंत पोहचू शकत नाहि. जगामध्ये घडणाऱ्या घटनांचे भान त्याला नसते असे नाहि. आपल्या अवतीभवती काय चालले आहे याची जाणिव संतांस असते. परंतु प्रत्येक घटनेच्या मागे असणारी परमेश्वराची सत्ता त्याला जाणवते, स्पष्ट दिसते. त्यामुळे त्या घडामोडींचे सुखदुःख त्याला बाधत नाही. देहाने तो प्रपंचात वावरत असला तरी मनाने तो स्वस्वरूपात स्थिर असतो.

९८ अलीकडे संत हा शब्द खूप सवंगतेने वापरला जातो. अध्यात्मावर प्रवचन करायला लागला की लगेच त्याला संत म्हणायला लागतात. दूरदर्शनवर उग्र मुद्रेचे अनेक रजोगुणी आणि तमोगुणी धंदेवाईक प्रवचनकार संत म्हणून मिरवत असतात. ही माणसे केवळ शब्दज्ञानी असतात पण त्यांचे

© www.madhaveeraghuveer.com

अहंकार फार जोपासले जातात. त्यांना मानणारा एक मोठा वर्ग तयार झाला की मग तर बघायलाच नको. थोड्या अपमानाने अस्वस्थ होणारे, शिष्यांना धडकावून देणारे संत हा संत या शब्दाची विटंबना आहे. खरे तर ज्याची वृत्ती शांत स्थिर व प्रसन्न झाली तो संत होय. शांत आणि संत किंवा Peace व Priest हे शब्द फार जवळचे आहेत. संतत्व क्षणाक्षणाला सिद्ध व्हावे लागते. विवेकशक्ती शाबूत आहे, बुद्धीला कशाचाही मोह नाही, कोणत्याही संकटाने मन विचलित होत नाही, कोणाकडून कशाचीही अपेक्षा नाही तो खरा संत!

तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात।

संतांना कुठलीही भौतिक अभिलाषा नसल्याने ते विकले जात नाहीत. मैत्र्यांच्या आणि दुरावांच्या नादी लागत नाहीत. त्यांना उपाधी बाधत नाही. याचा अर्थ ते निष्क्रिय असतात असे नाही, पण ते अलिप्त असल्यामुळे ती उपाधी त्यांच्या परमार्थाचा नाश करत नाही. भाजीत चवीपुरते मीठ असावे तसे हे संत समाजात कामापुरते मिसळतात. त्यांना कुठलाही अभिनिवेश, आग्रह नसतो. संत हे कमळपत्राप्रमाणे असतात.

ऐश्वर्याचा लोभ, विलासाची प्रवृत्ति, उद्योगांचे व्याप हे सर्व देहतादात्म्य वाढवणारे असतात. धार्मिक म्हणवणारा माणूस जेव्हा व्रतवैकल्यांच्या पसारा मांडतो तेही उपाधिरूपच असतो. त्यातून देहबुद्धीचेच पोषण होत असते. त्याने सात्त्विकता वाढत नाही. व्रतांमुळे इंद्रियांना संयमाची सवय लागली पाहिजे तसे होत नाही. उलट उपास सोडताना भीमेला सैर सोडतात. माणूस अमुक एक गोष्ट न खाण्याचा, केस वाढवण्याचा, वाती लावण्याचा, पोथी वाचण्याचा किंवा जप करण्याचा नियम करतात. पण त्यापेक्षा दुसऱ्याची निंदा न करणे, स्वतःचा मोठेपणा न मिरवणे, उपहास न करणे, दुसऱ्याला न दुखावणे, वेळ सत्कारणी लावणे असे चांगले नियम करत नाहीत.

Be a good person, but don't waste time to prove it.

वेळा जरी पोत बकेचि खाणी ज्वाला तरी ते वरती उफाळे।

© www.madhaveeraghuveer.com

नसे अंत आनंत संता पुसावा।
अहंकार विस्तार हा नीरसावा।
गुणेवीण निर्गुण तो आठवावा।
देहबुध्दिचा आठउ नाठवावा॥१६९॥ श्रीराम॥

अर्थ - अंत नसणारे अनंत परमात्मस्वरुप कसे आहे ते संतांना विचारावे. आपला मी व त्याचा पसारा नाहीसा करावा. गुणरहित अशा निर्गुण स्वरुपाचे स्मरण राखावे. देहबुद्धिचे स्मरण होऊ देऊ नये.

स्पष्टीकरण - आपण अंतवंत असल्याने आपल्या बुद्धीला अनंत आत्मस्वरुप कळणार नाही. पण संतांना ते कळलेले असते. म्हणून त्यांना त्याबद्दल विचारावे. त्यांच्या सांगण्याने आपल्याला त्या स्वरुपाची कल्पना येईल. त्या कल्पनेच्या पार्श्वभूमीवर आपला मी व त्याचा प्रपंच पसारा अर्थहिन असल्याचे अनुभवास येईल. म्हणून विवेकाने दोघांना नाहीसे करावे. हे साधण्यास एक दुहेरी उपाय आहे. मनाने एकीकडे त्रिगुणांच्या पलीकडे असलेले आत्मस्वरुप सतत आठवावे. आणि त्याच मनाने दुसरीकडे 'मी देह आहे' या भावनेचे स्मरण क्षीण करावे. आपण स्वतः काय किंवा जगात काय आपल्या देहाला परमावधिचे महत्व दिल्याने आयुष्यभर आपण देहाला विसरु शकत नाही. एका अंधाऱ्या खोलीत बारा वर्षे कोंडून ठेवलेल्या माणसाला दहा फूट-पलीकडचे पाहण्याची शक्ती उरत नाही, त्याचप्रमाणे जन्म-भर देहात कोंडलेल्या आपल्या 'मी'ला इंद्रियगोचर जगापलीकडे पाहण्याची शक्तिच उरत नाही. परमात्मवस्तू तर गुणातीत व अतींद्रिय आहे. ती पाहण्यासाठी देहाची कोंडी फोडली पाहिजे ती कशी फोडावी आणि अनंत सद्वस्तू कशी पहावी, हे सांगण्यासाठी समर्थ येथे उपाय सांगतात. अहर्निशपणे गुण-रहित स्वरुपाचे सतत स्मरण करावे आणि नाहिपणाने देहबुद्धीचे स्मरण राहावे. स्वरुपाचे स्मरण स्थिर झाले की देहाचे स्मरण न कळत क्षीण होऊन अखेर नाहिसे होईल.

शरीराला अंत आहे, ब्रह्म अनंत आहे. या अनंत ब्रह्माचे स्वरुप संतांकडून समजावून घ्यावे. संतांच्या सहवासात

© www.madhaveeraghuveer.com

देहबुद्धीचे स्मरणसुद्धा होऊ देऊ नये. परमार्थात रजोगुणी माणसाची संगत फार वाईट कारण रजोगुणी माणसे आपली देहबुद्धी वाढवतात. कारण अत्यादरे पिंडपोषण हेच रजोगुणी माणसाचे वैशिष्ट्य असते. आपला 'मी' मिरवणे यातच त्यांना आनंद असतो. या 'मी' पणाच्या निरसनासाठी सत्वगुणी माणसाची संगत धरावी. सत्वगुणी माणूस त्रिगुणांचा त्याग करून निर्गुणाचे चिंतन करत असतो.

त्रिगुण असार । निर्गुण हे सार । सारासार विचार । हरिपाठ ॥

संतांचा देहभाव शून्य झाला असल्याने संत ब्रह्मस्वरूपच होऊन जातात. संतांनी ब्रह्माचा अनुभव घेतल्याने ते त्याविषयी निश्चयाने सांगू शकतात. मानवमात्राविषयी जिव्हाळा असल्याने ते आपलेपणाने सांगतात.

तार्किक विद्वान, शब्दज्ञानी, परार्थी, प्रचारक, लौकिकाला, प्रतिष्ठेला कळिचावळले महंत यांचे मार्गदर्शन काही उपयोगाचे नाही. त्यात चांगलेपणाचा अंश असतो पण पूर्णता नसते.

संत अनुभवाच्या पूर्णतेतून सांगतात. विद्वानांची बुद्धी एकांगी असते. संतांनी काही सांगितले तर ते कळण्यासाठी व वळण्यासाठी ऐकणारा निरहंकारी असावा लागतो. नाहीतर सर्व ज्ञान म्हणजे 'पालथ्या घड्यावर पाणी' होते. तसे होऊ नये म्हणून 'अहंकार निरसावा' असे समर्थ सांगतात.

सृष्टीच्या उत्पत्तीच्या मुळाशी अहंकारच आहे. अहंकार हेच विश्वाचे बीज आहे ते नष्ट करणे ही गोष्ट आपल्या हातात नाही. पण अहंकाराचा विस्तार मात्र आपण केलेला असतो. मी कोण म्हणून सांगणे निराळे आणि मी विद्वान, शहाणा, नेता, परोपकारी असा मीपणा मिरवणे वेगळे. हा दुसरा भाग म्हणजे मीपणाचा विस्तार, पसारा आहे. तो अनावश्यक व अनिष्ट आहे. त्यासाठी तेराव्या अध्यायात सांगितलेली अमानित्वाची लक्षणे आत्म करून घेणे हा त्याच्या निरसनाचा उपाय आहे.

सर्व प्रकारची बंधे देहबुद्धीमुळे बाधक ठरतात. यासाठी देहबुद्धीची आठवणच होऊ देऊ नये.

देहेबुद्धि हे ज्ञानबोधे तजावी।
विवेके तया वस्तुचि भेटि घ्यावी।
तदाकार हे वृत्ति नाही स्वभावे।
म्हणोनी सदा ते चि शोधीत जावे॥१५०॥श्रीराम

अर्थ- मी आत्मा आहे या विचाराने मी देहच आहे ही मनाची भावना मोडून काढावी. आत्मविचाराने आत्म्याचा साक्षात्कार करून घ्यावा. आपले मन स्वाभाविकपणे आत्म्याशी तद्रूप होत नाही. म्हणून सतत त्या आत्म्याचा शोध घ्यावा.

स्पष्टीकरण - मी देह आहे ही भावना अज्ञानातून निर्माण झाली. अज्ञान निवृत्त करण्यास ज्ञान हाच एकमेव उपाय आहे. प्रथम आत्मानात्म विचाराने मी देह नसून आत्माच आहे असा बुद्धीचा निश्चय करावा लागतो. पण देहबुद्धीचा स्वभाव असा आहे की मी आत्माच आहे हा विचार मनात स्थिरपणे टिकत नाही. तो टिकवून धरण्यासाठी साधकाला साधा विवेक अखंड जागृत ठेवावा लागतो.

देहाशी तादात्म्य पावलेले मन स्थूल बनते. आत्मा तर सूक्ष्म असतो. म्हणून आपले मन सहजिकच आत्म्याशी समरस होऊ शकत नाही. आपल्या मनाला सूक्ष्म बनवण्यास सतत अभ्यास हाच राजमार्ग आहे. देहातून सुख घेण्याकडे झालेली मनाची ओढ फिरून तिचे तोंड आत्म्याकडे वळवले की आपले काम झाले.

देहबुद्धी ते आत्मबुद्धी करावी या एका चरणात परमार्थाचे सार आले आहे. देहबुद्धी हीच निद्रा होय तर आत्मबुद्धी ही जागृती आहे. देहबुद्धी हा परधर्म असून आत्मबुद्धी हा स्वधर्म आहे. विवेक हे जागृतीचे लक्षण आहे. आत्मानात्मविवेक, सारासार विवेक, नित्यानित्य विवेक करून साधक आत्मवस्तुची भेट घेऊ शकतो.

स्थूलाशी एकरूप होणे हा मनाचा स्वभाव आहे. यातून देहबुद्धीची जोपासना होते. मनाला प्रयत्नपूर्वक आत्मस्वरूपाशी एकरूप होण्याचा अभ्यास करावा लागेल. हे मनाच्या विरुद्ध वागणे होईल पण यातूनच मन सूक्ष्म होऊन निर्वासन होईल. व्यवहारामध्ये आत्मबोध ठेवायचा

© www.madhaveeraghuveer.com

याचा अर्थ सर्व व्यापार साक्षीभावाने पाहून, मी आत्मस्वरूप आहे याचे सतत भान ठेवायचे. कशातही गुंतायचे नाही. मनाने अडकायचे नाही. सर्व कर्म कर्तव्यबुद्धीने करायची पण 'मी' वेगळा आहे याची जाणीव जागृत ठेवायची. हे सर्व करत असताना देहाच्या प्राबल्याने आत्मानुसंधान पुन्हापुन्हा सुटत जाईल. पण प्रयत्नपूर्वक मन तदाकार करत रहायचे. अशाप्रकारे परमात्म्याचा शोध घेण्यातच पुरुषार्थ आहे.

व्यवहारामध्ये जीवन जगत असताना होणाऱ्या हालचाली, जाणवणाऱ्या संवेदना आणि उत्पन्न होणारे संकल्प विकल्प प्रत्येक पातळीवर तटस्थतेने पारखीत राहिले तर शरीर मन इंद्रिय, बुद्धी यांच्याशी जडून राहिलेली मीपणाची भावना सुटत जाईल, मावळत जाईल. 'मी' चे सत्यस्वरूप उमगेल. तटस्थपणे पारखीत राहणे हाच ज्ञानबोध आहे. स्थिर राहण्याचा अभ्यास केला तर विवेकाची जागृती होते. ही विवेकाची जागृतीच सत्यवस्तूची भेट घडवते. विविधतेच्या मागे असलेल्या वस्तुस्थितीचे ज्ञान होते. वृत्तींचा प्रवाह हा आतून बाहेर वाहत असतो. स्वभावतःच बहिर्मुख असणाऱ्या या वृत्ती सहजपणे तदाकार होत नाहीत. त्यासाठी नाना प्रकारच्या साधना कराव्या लागतात. हे प्रयत्न धीराने, निरलसपणे, उत्कटतेने, जिव्हाळ्याने, सातत्याने करावे लागतात. साधना करत असताना थकवा, आळस, कंटाळा, उपेक्षा, अश्रद्धा उत्पन्न होणार नाहीत याची काळजी घ्यावी लागते. उतावीळपणा म्हणजे उत्कटता नाही हे येथे लक्षात ठेवावे लागते. साधना क्रमाक्रमाने वरच्या पायरीवर न्यावी लागते. साधनेच्या बाह्यांगाचा भार प्रगतीच्या, उन्नतीच्या मार्गातील अडथळा बनणार नाही याची काळजी घ्यावी लागते. "सदा शोधीत जावे" म्हणण्यात हे सर्व अभिप्रेत आहे.

© www.madhaveeraghuveer.com

असे सार साचार ते चोरलेसे।
येही लोचनी पाहता दृश्य भासे।
निराभास निर्गुण ते आकळेना।
अहंतागुणे कल्पिता ही कळेना॥१६३॥ श्रीराम॥

अर्थ- अहंकाररूपी राहू मूळ परमात्मस्वरूपात उदय पावला. आकाशावत असणारे मूळ स्वरूप त्याने झाकून टाकले. त्यामुळे जिकडे तिकडे अज्ञानरूपी अंधार पसरला. आत्मानात्मविचाराने या गोष्टीचे निरसन करून पहावे.

स्पष्टीकरण - नित्य प्रकाशमान असणाऱ्या सूर्याला ग्रहणकाळी राहूने ग्रासल्यामुळे सर्वत्र अंधार पसरतो. या परिचित दृष्टांताचा उपयोग करून समर्थ सांगतात की मूळ आत्मस्वरूप स्वयंप्रकाश आहे पण त्या स्वरूपात अहंकार रूपी राहू उदय पावतो. तो स्वरूपावर अज्ञानाचे आच्छादन घालतो. त्यामुळे ज्ञानाचा प्रकाश लोपतो.

मानवी जीवनात ज्ञान व अज्ञानाचा अनुभव येतो. मूळ सद्वस्तु ज्ञानमयी असली तरी ते ज्ञान झाकून टाकणारे अज्ञानदेखील असतेच. अहंकाररूपाने अज्ञान साकार होते. ज्ञानाप्रमाणेच अज्ञानाचा विस्तारसुद्धा आकाशाप्रमाणे अनंत भासतो. फरक इतकाच की ज्ञान शाश्वत तर अज्ञान अशाश्वत असते आणि तेच माणसाने विचाराने समजून घ्यावे.

(१६३)

अर्थ - सत्य आणि सर्वांचे तत्त्व असलेले परमात्मस्वरूप गुप्त असते. आपल्या चर्मचक्षुंनी जे आपण पाहतो ते मूळस्वरूप नसून त्याचा भास आहे. देहाहंकाराच्या मर्यादेत राहून आपण कितीही कल्पना केली तरी आभासशून्य व निर्गुण परमात्मस्वरूप आकलन होणे शक्य होत नाही.

स्पष्टीकरण - इंद्रियांना फक्त विशेष वस्तूच गोचर होतात. त्या विशेषांना व्यापून असणारे सामान्य त्या वस्तूमध्ये गुप्तपणे राहते. तत्वाच्या दृष्टीने सामान्य खरे असून विशेष त्या सामान्याचा भासच म्हणायला हरकत नाही. म्हणून इंद्रियांना गोचर होणारे जग भासमय असते.

इंद्रियांच्या द्वारा माणूस जग पहात असताना तो देहाहंकार केंद्रित असतो. त्याच्या पाहण्याला मर्यादा असतात.

© www.madhavaraghuveer.com

परंतु परमात्मवस्तु नुसती सामान्य नाही तर सामान्यांची सामान्य आहे. तिच्या ठिकाणी अज्ञान नाही म्हणून कसलाही भास नाही, तिला त्रिगुणांचा स्पर्श नाही, तिला होण्याचा संपर्क नाही. ती अत्यंत सूक्ष्म अतींद्रिय व कल्पनातीत आहे. अशी सद्वस्तु पहाण्यासाठी ज्ञानचक्षु पाहिजेत. प्रत्येकात ते ज्ञानचक्षु आहेतच पण ते झाकलेले असल्याने त्यांना उघडण्याचा अभ्यास करावा लागतो.

☆ आपल्याला डोळ्यांनी अथवा इंद्रियांनी त्रिगुणांचा बोध होतो पण सत्याच्या दृष्टीने तो भास किंवा भ्रम आहे. अहंकारी मनुष्य बहिर्मुख असतो. तो या भासालाच सत्य मानतो. अशा अहंकारी माणसाला निराभास व निर्गुण परमात्म्याचे ज्ञान कधीही होणार नाही. सत्पुरुष मात्र गुप्त असलेले सारतत्त्व स्वीकारतात आणि आत्मानुसंधानामध्ये इंद्रियांच्या पातळीवरील लौकिक व्यवहार लीला/नाटक म्हणून अलिप्तपणे पार पाडतात. संतांच्या दृष्टीने सार चोरलेले नसते. ते प्रगट असतात. हिमालयात उन्मनी अवस्थेत असणाऱ्या एका साधूला एकाने विचारले — ब्रह्म जानते हो? तेव्हा तो उत्तरला — जानना क्या है? ब्रह्मही तो हूँ।

○ जे मूलतत्त्व आहे ते प्रगट होण्याची इच्छा धरत नाही. स्वतःच्या प्रगटीकरणाची त्याला आवश्यकता ही नाही.

पैं अवधान परी नवल लाघव तुझें । जे आपणपें चोरें ॥ ज्ञा

प्रसिद्धीला येणे, प्रगट होणे यामागे सामान्य माणसाची लोकैषणा असते ती येथे संभवतच नाही.

इंद्रिये, मन, बुद्धी ही आपल्या ज्ञानाची साधने. ती स्वभावतः बहिर्मुख आहेत. ती अंतरंगाचा वेध घेऊ शकत नाहीत. सातत्याच्या दीर्घकालीन प्रयत्नाने इंद्रियांची विषयासक्ती सुटली, मन अंतर्मुख झाले, बुद्धि एकाग्र झाली, तर तत्त्वाचे आकलन होऊ शकेल. पण अहंकार तेही घडू देत नाही. या अहंतेमुळेच बुद्धीला नको त्या विचारांचे फाटे फुटतात; मनाला चंचलता येते; इंद्रिये विषयासक्त होतात.

©www.madhayeeraghuveer.com

स्फुरे विषयी कल्पना ते अविद्या।
स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या।
मुळी कल्पना दो रुपे ते चि जाली।
विवेके तरी स्वस्वरुपी मिळाली॥१५२॥ श्रीराम॥

अर्थ- दृश्य विश्वाला अनुलक्षून स्फुरणारी कल्पना हे अज्ञानाचे लक्षण तर अदृश्य आत्मवस्तुला अनुलक्षून स्फुरणारी कल्पना हे ज्ञानाचे लक्षण आहे. मूळ परआत्मस्वरुपाच्या ठिकाणी दोन अंगांनी कल्पना स्फुरण पावली. परंतु विवेकाने तिचा आत्मस्वरुपामध्ये लय होतो.

स्पष्टीकरण - मूळ सद्वस्तु सर्वांशीने आहे म्हणून ती सत्तारुप आहे. तशीच ती ज्ञानरुप व अनंत पण आहे. सद्वस्तुहून अन्य काही नाही असे म्हटल्यावर हे विश्व-देखील तद्रूपच असले पाहिजे असे मानावे लागते. पण जगाचा प्रत्यक्ष अनुभव पाहिला तर जग असत म्हणजे अशाश्वत, अज्ञानमय व अंतवंत किंवा परिच्छिन्न असलेले आढळते. अर्थात हे दृश्य विश्व त्या सद्वस्तूचीच अतर्क्य कल्पना असली पाहिजे.

विश्व निर्माण करणाऱ्या विश्वकल्पनेला दोन बाजू आहेत. जेव्हा दृश्य खरे वाटून कल्पना त्याच्या नादी लागते तेव्हा ती अविद्येच्या अंमलाखाली वावरते. स्वस्वरुप खरे वाटून जेव्हा ती दृश्याकडून माघारी फिरते तेव्हा ती सुविद्येच्या अंमलाखाली वावरते.

मुळात कल्पना एकच खरी, पण मानवी जीवनात ती दोन तोंडांनी अनुभवास येते. विवेकाने ती अखेर स्वस्वरुपी लीन होऊन जाते.

☆ स्फुरण म्हणजे वृत्तीचे तरंग. हे दोन प्रकारचे असतात. १. ब्रह्मचिंतन २. आत्मचिंतन. विषयचिंतन ही माया माणसाला प्रपंचात अडकवते म्हणून तिला अविद्या म्हटले आहे तर ब्रह्मचिंतन मुक्त करते " " सुविद्या ".

'आत्माराम' या ग्रंथात समर्थांनी मायेचा गौरव केला आहे. एका काट्याने दुसरा काटा काढावा आणि नंतर दोन्ही काटे टाकून द्यावेत त्याप्रमाणे संवादी मायेने

विसंवादी माया टाकून द्यावी आणि ब्रह्माशी एकरूप झाल्यावर संवादी मायेचेही विसर्जन करावे. त्या दृष्टीने मठ, मंदिर, प्रवचने, ग्रंथ, साधने, भजन, मानवसेवा, दानधर्म हे सारे सुविद्या मायेचे प्रकार आहेत. सुविद्या व अविद्या या दोन्ही एका स्वरूपाचीच अभिव्यक्ती आहेत. वीजेने पाणी गरम करता येते व पाण्याचे बर्फही करता येते. तो एकच अनेकरूपाने नटलेला आहे याचा बोध सतत ठेवावा.

गणितामध्ये कोणतेही मूल्य असलेला किंवा नसलेला 'क्ष' गृहीत धरून उदाहरणे सोडवतात. परंतु उत्तरात कुठेही 'क्ष' नसतो तो गळून जातो. मायेचे तसेच होते. समजून घेण्यासाठी माया आणि अविद्या असा भेद कल्पिला आहे. जीवाला चिकटून राहते ती अविद्या किंवा विसंवादी माया। ही अज्ञान, मोह, विषयासक्ती, हवे-नको, राग-द्वेष, कामक्रोध यांना उत्पन्न करते.

सृष्टीच्या उत्पत्तीच्या मागे जी ब्रह्माची शक्ती गृहीत धरली जाते ती म्हणजे माया (मूळमाया) ही शुद्ध सत्वात्मक असते. साधनेला हिचे सहाय्य होते. हिच्यामुळेच ब्रह्माचे सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सर्वव्यापक, सर्वाधार, सर्वकारण इ० स्वरूपात वर्णन केले जाते. मायारूप चित्शक्ती ब्रह्मापेक्षा वेगळी आहे असे म्हणता येत नाही किंवा वेगळी आहे असेही म्हणता येत नाही. काही वेदांत्यांना माया शब्द वापरणे योग्य वाटत नाही. मग ते चित्शक्ती, चिद्विलास, लीला, स्फूर्ति, प्रभा, दीप्ति असे शब्द वापरतात.

समर्थ तिला चिद्शक्ती म्हणतात. तिच्यामुळेच जीव-जगत-जगदीश असे त्रैत व्यवहारात दिसते.

© www.madhavageeraghuveer.com

स्वरूपी उदेला अहंकार राहो।
तेणे सर्व आछ्यादिले व्योम पाहो।
दिशा पाहता ते निशा वाढताहे।
विवेके विचारे विवंचूनि पाहे॥१६३॥ श्रीराम॥

अर्थ - अहंकाररूपी राहू मूळ परमात्मस्वरूपात उदय पावला. आकाशवत असणारे मूळ स्वरूप त्याने झाकून टाकले. त्यामुळे जिकडे पहावे तिकडे अज्ञानरूपी अंधार पसरला. आत्मानात्मविवेकाने यांचे विवरण करावे.

स्पष्टीकरण - नित्य प्रकाशमान असणारा सूर्य ग्रहण-समयी राहूने ग्रासला जातो. त्यामुळे आकाशात दाही दिशांना अंधार पसरतो अशी कल्पना आहे. त्या दृष्टांताचा उपयोग करून श्री समर्थ येथे सांगतात - मूळ आत्मस्वरूप प्रकाशरूप आहे पण त्या स्वरूपात अहंकाररूपी राहू उदय पावतो. तो राहू स्वरूपावर अज्ञानाचे आच्छादन घालतो. त्यामुळे ज्ञानाचा प्रकाश लोप पावतो आणि जिकडे तिकडे अज्ञानाचा अंधार पसरतो. मानवी जीवनात ज्ञान आणि अज्ञान दोन्हींचा अनुभव येतो. मूळ सद्वस्तु ज्ञानमय आहे पण ते ज्ञान अज्ञानामुळे झाकले जाते. परंतु ज्ञान शाश्वत आहे पण अज्ञान तसे नाही.

स्वरूपाला आकाशाची तर अहंकाराला राहूची उपमा दिली आहे. दासबोधामध्ये अनेकदा स्वरूप व आकाश यातील साधर्म्य वेळोवेळी सांगितले आहे. तसेच अहंकाराला राहूची दिलेली उपमा योग्यच आहे. राहूला अस्तित्व नाही. ती एक कल्पना आहे. अहंकारदेखील काल्पनिक आहे. सत्याच्या कसोटीवर अहंकार टिकणारच नाही. परंतु सूर्यापुढे ढग आल्यामुळे काही काळापुरता सूर्य झाकला जातो. ढग काळेकभिन्न असतील तर दिवसा ढवळ्या देखील सर्व दिशा अंधारून जातील. पण हे सारे तात्पुरते असते. यामुळे 'सूर्य नाही' असे होत नाही. जीवनामध्ये अज्ञानाचा अंधःकार पसरतो पण त्यामुळे स्वरूप नाहीसे होत नाही.

या अहंकाराच्या राहूपासून सूर्याची ग्रहणदशा मुक्त

होण्यासाठी समर्थ चौथ्या चरणामध्ये तीन उपाय सांगतात. १. विवेक २. विचार ३. विवंचना. विवेक म्हणजे निवड विचार म्हणजे चिंतन किंवा अनुसंधान. विवंचना म्हणजे परमात्म्याच्या अनुभूतीची तळमळ. परमात्मा वाटेल त्याच्या-समोर प्रगट होत नाही. त्यासाठी परमात्म्याची खरी तहान लागावी लागते. या तीन साधनाद्वारे माणसाने स्वरूप साक्षात्कार करून घ्यावा ही समर्थांची तळमळ आहे.

आरंभी केवळ एकाकी असलेल्या त्या मूळतत्त्वाचे ठिकाणी, कळाचे ठिकाणी मी एकटा आहे (एकोऽहम्) ही जाणिव स्फुरली एकट्याला करमत नाही म्हणून त्याला पुष्कळ व्हावेसे वाटले (बहुस्याम्) आणि मग या सृष्टिक्रमाला आरंभ झाला. एकोऽहम् जाणवलेच नसते तर पुढची भानगडच झाली नसती. पण अहम् जाणवला आणि तोच पुढच्या विश्वोत्पत्तीचे कारण ठरला. आकाशाप्रमाणे शुद्ध निर्मळ असलेल्या स्वरूपातच अहंरूपी राहू ग्रासला आणि त्याने मग स्वरूपाचे सर्व रूपच झाकून टाकले. हे आच्छादन अंधारासारखे झाले. त्यामुळे दिशा पाहू जावे तर काही दिसत नाही असे झाले. मेघाने आकाश भरलेल्या अवसेच्या रात्री, घनदाट अरण्यात, नसलेल्या पाऊलवाटा शोधण्याचा प्रसंग यावा, तसे होते. इंद्रिये थकून जातात, मनाला शिणवटा येते, बुद्धि कुंठित होते म्हणून या जाणिवरूपाती (मी) ला विवेकाने तीक्ष्णता प्राप्त करून घेतली तर तिचे निजाचे यथार्थ ज्ञान होऊ शकेल.

अहंकाराला राहूची दिलेली उपमा मोठी मार्मिक आहे. कारण राहू हा कुणी शनि - मंगळाप्रमाणे अस्तित्वात असणारा ग्रह नाही. तो कल्पनामात्र आहे. पण ग्रहणाच्या रूपाने त्याचा परिणाम दिसतो आणि फलज्योतिषाप्रमाणे त्याचा प्रभाव जाणवतो. अविद्येचे व अहंकाराचे तसेच आहे.

या मतभेदाच्या पसाऱ्यातून सत्य शोधून काढण्यासाठी विवेकाने विवंचून पहावे लागते.

© www.madhaveeraghuveer.com

जया चक्षुने लक्षिता लक्षवेना।
भवा भक्षिता रक्षिता रक्षवेना।
क्षयातीत तो अक्षये मोक्ष देतो।
दयादक्ष तो साक्षिने पक्ष घेतो।।१६८।।श्रीराम।।

अर्थ- परमात्मवस्तु चर्मचक्षुने पाहण्याचा प्रयत्न केला तर पाहता येत नाही. ज्ञानचक्षुने तिचे दर्शन झाले की दृश्य विश्व विलीन होते. त्याचे रक्षण करू म्हटल्यास ते करता येत नाही. आत्मा स्वतः अक्षय असल्याने त्याचे दर्शन अक्षय मोक्ष देतो. तो दयाळु तर खराच परंतु केवळ साक्षीपणाने तो आत्मज्ञानी पुरुषाच्या संमेळ करतो.

स्पष्टीकरण - दृश्य विश्व पहाण्यासाठीच इंद्रिये आहेत. चर्मचक्षुने दृश्य, स्थूल विश्व पहाता येते. परंतु आत्मस्वरूप अतिशय सूक्ष्म व व्यापक असल्याने ते पाहण्यास इंद्रिये लटकी पडतात. मात्र ज्ञानदृष्टी अतींद्रिय असते. अज्ञानाची निवृत्ती करणे हेच ज्ञानाचे कार्य आहे. अज्ञान निवृत्त होत असताना अज्ञानाचे कार्य देखील निरास पावते त्यामुळच जेव्हा आत्मज्ञान होते तेव्हा दृश्य विश्वाचा अर्थच बदलतो.

जेव्हा जीव अज्ञानदशामध्ये असतो तेव्हा दृश्य विश्वातून आनंद मिळवण्याच्या भ्रमात असतो. परंतु ज्ञानदशामध्ये हा भ्रम भंग पावतो, त्यातून दृश्याचे बंधन तुटते व कायमचे स्वातंत्र्य प्राप्त होते.

परमात्मा दयाळु आहे. आपल्याकडून जितकी उत्कटता असते त्याच्या अनेकपटीने अधिक मदत त्याच्याकडून मिळते. असा हा परमात्मा प्रत्येकाच्या जीवनात साक्षीरूपाने हजर असतो. त्याच्या सांनिध्यामध्ये मोठा धीर आहे. मोठेच समाधान आहे.

चोरिया दूषण दासमें नहीं राममें दोष।
मन चाले इक पाँवडो हरि चाले सौ कोस।

जोपर्यंत संसार खरा वाटतो तोपर्यंत अज्ञान आहे. मात्र एकदा ज्ञान झाल्यावर दृश्य जगत कितीही वाचविण्याचा प्रयत्न केला तरी कोणीही त्याचे रक्षण

न देवा दण्डमादाय रक्षन्ति पशुपालवत्।
यं तु रक्षितुमिच्छन्ति बुद्ध्या संयोजयन्ति तम्॥

करू शकत नाही. पूज्यपाद श्री आद्य शंकराचार्य म्हणतात —
तीस कोटि लोकांनी जग खरे असे सांगितले तरी मी ठामपणे सांगेन की ब्रह्म सत्य आणि जग मिथ्या आहे. परमात्मा स्वतः क्षयातीत आहे. त्यामुळे त्याच्याद्वारे मिळणारी मुक्ती सुद्धा अक्षय असणार.
शास्त्रामध्ये सांगितलेल्या चार मुक्तींपैकी पहिल्या तीन मुक्तींना क्षय आहे. मात्र सायुज्यमुक्ती अक्षय आहे. तिथे पुनर्जन्म नाही. भगवंत दया दाखवताना कधी विलंब करत नाही, तो तत्पर असतो. हाक मारताच तो लगेच धावून येतो. म्हणून त्याला दयादक्ष म्हटले आहे. भगवंत भक्ताला त्याच्या पात्रतेपेक्षा कितीतरी अधिक देतो. अनेक गोष्टींचा वर्षाव त्याच्यावर करतो. त्याच्या मनामध्ये करुणा असल्यामुळे तो भक्ताला निर्दोष बनवतो. भक्तच भगवंत होऊन जातो.
आपणासारिखे करिती तात्काळ। नाही काळवेळ तयालागी॥
भगवंत भक्तांचा कैवार घेतो पण त्याचे श्रेय घेणारी भगवंत व भक्त यांच्यातील द्वैत संपल्यावर श्रेय घ्यायला किंवा द्यायला कोण राहणार?
या श्लोकात 'क्ष' या अक्षराचा अनुप्रास साधला आहे. एकूण ६२ वेळा 'क्ष' अक्षर आले आहे.
0 भगवत्कृपा लाभली तरच प्रत्यक्षरूप असा साक्षात्कार होऊ शकतो. यमेवैष वृणुते तेन लभ्यः तस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम्। हेच शेवटी खरे आहे.
हे नीट जाणून घेतले की साधनेचा अहंकार जातो व श्रद्धावंत भाविकाला आश्वासन मिळते.
भगवान सर्वसाक्षी आहे, दक्ष, तत्पर, दयाघन आहे. तो भक्ताच्या पाठीशी वात्सल्याने उभा राहतो. त्याने दयाळूपणाने दिलेली देणगी तो दक्षतेने पाहणारच. देणगीचा व्यवस्थित उपयोग जर होत नसेल तर पुन्हा सहाय्यासाठी तो कशाला येईल? देव परीक्षाप्रिय असतात. देवाचे सहाय्य अप्रत्यक्षपणे कामात असते. ज्याचे रक्षण करावेसे वाटते त्याला तो सद्बुद्धि देतो.

© www.majhaveeraghuveer.com

विधी निर्मिता लिहितो सर्व भाळी।
परी लिहिता कोण त्याचे कपाळी।
हरु जाळितो लोक संव्हारकाळी।
परी शेवटी शंकरा कोण जाळी॥१७८॥ श्रीराम॥

अर्थ - सृष्टि निर्माण करणारा ब्रह्मदेव प्राण्यांच्या कपाळावर त्यांचे भविष्य लिहितो, त्या ब्रह्मदेवाच्या कपाळावर त्याचे भविष्य लिहिणारा कोण बरे आहे? विश्व संहार करणारा श्रीशंकर प्रलयकाळी विश्व जाळतो, त्या श्रीशंकराला जाळणारा कोण आहे?

स्पष्टीकरण - ब्रह्मदेव विश्व निर्माण करतो, विष्णू त्याचे पालन करतो व श्रीशंकर त्याचा संहार करतो अशी पौराणिक कल्पना आढळते. विश्वाच्या व्यवहाराला तीन अंगे आढळतात. उत्पत्ती, स्थिती आणि लय या तीन अवस्था प्रत्येक वस्तूला आणि व्यक्तीला आहेत. जे अव्यक्त आहे ते व्यक्त होते त्याला उत्पत्ति म्हणतात. काही काळाने व्यक्त पुन्हा अव्यक्तात जाते त्याला संहार म्हणतात. उत्पन्न झालेली प्रत्येक वस्तू संहार होईपर्यंत जगितात असते म्हणजेच व्यक्तदशेत असते. पुराणामध्ये ही तिन्ही कामे वेगवेगळ्या देवतांना वाटून दिलेली आहेत. या सर्व देवांना आपल्या कार्याची शक्ती ज्याच्याकडून मिळते तो आत्मा हा खरा देव आहे. ब्रह्मदेवाचाही कोणी निर्माता असला पाहिजे. विष्णूचाही कोणीतरी पालनहार असणार. आणि शंकराला संपवणारा कोणीतरी मोठा देव असला पाहिजे. या श्लोकात समर्थ स्वतः उत्तर देत नाहीत तर साधकाला विचार करण्यास प्रवृत्त करतात.

☆ एखादी व्यक्ती किंवा देव्हाऱ्यातील मूर्ती हे कार्य करु शकणार नाही. पाषाणाच्या मूर्तीला खरा देव समजणाऱ्यांना समर्थ विवेकहीन म्हणतात. उत्पत्ति, स्थिती आणि लय या अविरत घडणाऱ्या घडामोडी आहेत. या तिन्ही गोष्टी ज्याच्या अधिष्ठानावर घडतात त्याला समर्थ मुख्य देव म्हणतात. या मुख्य देवाचा कोणीही निर्माता नाही. या प्रक्रिया युगानुयुगे अत्यंत सुसूत्रपणे चालल्या आहेत त्याअर्थी त्यांच्या

कुडाशी शक्तिमान देवता निश्चितपणे असली पाहिजे.

सकळांसी निर्मिता देव। देवासी निर्मिता नसे।
सर्वांसी मुक्त तो देव। देवासी मुक्त नाहिं॥

परमेश्वर भक्ताच्या कैवारासाठी निर्गुणातून सगुणात येतो. परंतु उपासनेसाठी स्वीकारलेल्या देवतेचे स्वरूप परमेश्वराच्या शुद्ध स्वरूपाशी मिळते जुळते असायला हवे.

स्पष्टपणे प्रत्ययाला येणारे अधिभौतिक आणि तत्त्वतः सत्य म्हणून मान्य करावे लागणारे अध्यात्म यामध्ये अधिदेवाचा एक स्तर आहे. हा अधिदैवाचा स्तरच निरनिराळ्या शक्तींच्या, निरनिराळे कार्य करणाऱ्या, भिन्न भिन्न अधिकाराच्या अनेक प्रकारच्या देवतांच्या कल्पनांचे अधिष्ठान आहे. मंत्राच्या मागे जे सामर्थ्य उभे असते ते या अधिदैवताचेच असते. मंत्रशक्ती ही अनुभवाची गोष्ट आहे. मात्र त्यामागचे खरे सामर्थ्य अध्यात्माचेच असते. अधिदेवाचा मर्यादितपणा आणि उपास्य देवतेचे श्रेष्ठ स्वरूप साधकाच्या लक्षात आणून देणे हा संतांचा प्रयत्न असतो.

ब्रह्मदेव सृष्टीची उत्पत्ती करतो हे खरे असले तरी त्याचे भवितव्य कोण ठरवते? रुद्र, महादेव ही संहारदेवता आहे. पण संहार करणाऱ्या महादेवाला नाहिसा करणारा कोणी असेलच की नाही? अनादि अनंत ब्रह्माचे स्वरूप महादेवाला आकलन होत नाही.

या श्लोकात विष्णूचा पालनकर्ता कोण असा उल्लेख नाही. त्यावरून विष्णूची मुर्वत राहून गेलेली दिसते अशी खोचक टिप्पणी विनोबा भावे यांनी केली आहे. तत्त्वज्ञ संत अशी कुणाची भीडमुर्वत बाळगत नाहीत.

निर्माता ब्रह्मदेव आणि संहारकर्ता रुद्र या आद्यनाच्या उल्लेखाने मधला विष्णु गृहीत धरावा अशी अपेक्षा आहे.

ब्रह्मा विष्णु आणि हर। यांसी निर्माता तोचि थोर।
तो ओळखावा परमेश्वर। नाना यत्नी॥

Date 29.12.2014

जगी द्वादशादित्य हे रुद्र आक्रा।
असंख्यात संख्या करी कोण शक्रा।
जगी देव धुंडाळिता आडळेना।
जनी मुख्य तो कोण कैसा कळेना।।१७८।।श्रीराम।।

अर्थ - विश्वामध्ये बारा आदित्य आहेत. अकरा रुद्र आहेत. इंद्रांची संख्या तर खूपच आहे, त्यांची गणना करणे कठीण आहे. देवतांच्या समुदायात देवाचा शोध केला तर तो आढळत नाही. सर्व देवांच्या मुख्य देव कोण व कसा आहे हे कळत नाही.

स्पष्टीकरण - वेदवाङ्मयामध्ये आणि पुराणामध्ये नाना प्रकारच्या देवांचे आणि देवींचे वर्णन आढळते. सामान्य माणसाच्या दृष्टीने ते बरोबर असले तरी ज्याला देवाच्या सूक्ष्म स्वरूपाचा विचार करायचा आहे त्याच्या दृष्टीने ते अत्यंत अपुरे पडते. सामान्य मनुष्य सकाम असतो. आपली वासना फलित व्हावी म्हणून तो देवाच्या नादी लागतो त्याच्या दृष्टीने देव म्हणजे आपल्या मनाप्रमाणे घडवून आणणारी एक देवता आहे. वेदांमधील लोकप्रिय देवतांपैकी आदित्य, रुद्र, इंद्र इ. चा उल्लेख येथे समर्थांनी केला आहे.

माणसाला गवसलेल्या भव्य व दिव्य कल्पनांपैकी देवाची कल्पना सर्वांहून दिव्य आहे. मात्र संतांना अनुभवास येणारा देव काही निराळाच आहे. तो सच्चिदानंदस्वरूप असून देवांचा देव आहे. तो मुख्य (थोरला) देव आहे. जगातील दृश्याच्या पसाऱ्यात तो सापडत नाही, त्याचा शोध प्रथम स्वतःच्या अंतर्यामी आणि नंतर विश्वाच्या अंतर्यामी करावा.

आपल्याकडे ३३ कोटी देवांची संकल्पना आहे. इथे कोटी हा शब्द संख्यात्मक नसून प्रकारात्मक आहे. त्यात १२ आदित्य, ११ रुद्र, ८ वसू, २ अश्विनीकुमार यांचा समावेश होतो. हे सगळे देव भक्तांच्या विशिष्ट वासना पूर्ण करतात. पण त्यांना शक्ती व क्षमता मुख्य देवापासूनच मिळते. परंतु लोक मुख्य देवाची कास न धरता या कनिष्ठ देवतांचे महत्त्व वाढवतात. त्यामुळे त्यांचे स्तोम माजवले जाते.

© www.madhaveeragiri.com

देव झाले उदंड । देवांचे माजले ~~[illegible]~~ बंड ।
भूतादेवांचे थोतांड । येकाचे जाले ।।

इंद्र ही देवता नसून ती पदवी आहे. असे अनेक इंद्र होऊन गेले. शिवाय इंद्र हा काही साधकांचा आदर्श नव्हे. म्हणून साधकाने मुख्य देवाचा शोध घ्यावा. त्याच्या कृपेने भौतिक सौख्यही मिळेल आणि मोक्षही मिळेल. प्रेयस ही मिळेल श्रेयसही मिळेल. भुक्ती आणि मुक्ती दोन्हीही मिळतील. आणि समजा प्रारब्धात भौतिक समृद्धी नसेल तर मुख्य देवाच्या ज्ञानाने भौतिकाची आसक्तीही नाहीशी होईल. श्रेष्ठ गोष्ट मिळणे शक्य असताना साधकाने कनिष्ठात का रमावे?

लहान मूल रांगायला शिकते तेव्हा त्याला रांगण्यात मजा वाटते. परंतु चालायला लागल्यावर रांगण्यात गंमत वाटत नाही. कोट्याधीशाला दहा रुपयाच्या नोटेची किंमत वाटत नाही.

स्वार्थी माणसाने आपले लबाडीचे व्यवहार सांभाळण्यासाठी शासनातील खालच्या लोकांना लाच देऊन स्वतःची कामे करून घ्यावीत, त्याच वृत्तीने माणसे पूजा अर्चा करतात. नवसाला पावणारा देव कोण आहे तेवढेच पाहतात. माणसे आपापल्या वृत्तीतील त्रिगुणांच्या प्राबल्यानुसार नाना देवतांची पूजा करतात. त्या देवतांच्या ठिकाणी असणारी प्रभावी शक्ती ही शेवटी त्या सर्वसमर्थ ईश्वराचीच आहे, हे ध्यानी घ्यावे.

विविध देवतांना कामे नेमून दिली आहेत. त्यांचे क्षेत्र मर्यादित आहे. पूजा-अर्चा करणाऱ्यांनी परमेश्वराचे श्रेष्ठ स्वरूप जाणून घेतले पाहिजे. गतानुगतिकतेने काही करू नये. नाहीतर अखेरीस अश्रद्धाच बळावते व आपलेच अहित होते.

© www.madhavveeraghuveer.com

तुटेना फुटेना कदा देवराणा।
चळेना ढळेना कदा दैन्यवाणा।
कळेना कळेना कदा लोचनासी।
असेना दिसेना जगी मीपणासी॥१८८॥ श्रीराम॥

अर्थ - मुख्य देव म्हणजे ईश्वर कधी तुटत नाही, फुटत नाही चळत नाही किंवा ढळत नाही. चर्मचक्षूंना तो कधीही कळत नाही. देहाहंकारास त्याचे अस्तित्व भासत नाही. तो प्रत्ययास येत नाही.

स्पष्टीकरण - वास्तविक देव हा दिव्यतेचा अनुभव आहे. किंवा सद्वस्तूच्या ज्ञानाचा प्रकाश हाच खरा देव आहे. ज्ञान म्हणजे काही पंचभूतात्मक जड वस्तू नाही. त्यामुळे दृश्य वस्तूच्या गुणधर्माचा स्पर्श चुकूनसुद्धा देवाला होत नाही. त्यामुळे देव कधी तुटणार किंवा फुटणार नाही. तो चळन पावणार नाही किंवा स्थानभ्रष्ट होणार नाही. तो परिपूर्ण असल्याने त्यात कशाची उणीव नाही. त्यामुळे तो दैन्यवाणा असून शकणार नाही. तो माणसासारखी कोणी व्यक्ती नाही. देव तो नाही किंवा ती नाही. देव म्हणजे केवळ अस्तित्व आहे. मात्र आपल्याला दृश्याची गोडी वाटते, दृश्य खरे वाटते आणि म्हणून आपण सर्व अनुभवांना, मूल्यांना इंद्रियांच्या कक्षेत आणायला पाहतो. देव पहायचा नसतो तर तो अनुभवायचा असतो. त्याला चर्मचक्षुंनी पहाता येत नाही.

जगात 'मी'पणाची सत्ता आहे, तोवर देवाचे अस्तित्व भासणार नाही. आणि देवाचे अस्तित्व जेव्हा भासेल तेव्हा 'मी'पणा राहणार नाही. देव पहाण्यासाठी ज्ञान उतरावे लागते.

✡ समर्थांच्या काळी यवनांचे आक्रमण होते. मुसलमान मूर्तिभंजक होते. जो पठाण / सरदार जास्तीत जास्त मूर्ति फोडेल त्याला बक्षिस मिळत असे. मूर्तीलाच खरा देव मानणाऱ्या सामान्य भक्ताला मूर्तिभंजनामुळे देवाच्या अस्तित्वाबद्दल अथवा सामर्थ्याबद्दल संभ्रम निर्माण होत असे अशा वेळी समर्थ - आत्मा किंवा परब्रह्म हाच खरा देव असून तो तुटत किंवा फुटत नाही. चळत वा ढळत नाही.

अवजानान्ति मां मूढा मानुषी तनुमाश्रितम् ।
पर भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥



खरा देव कधीही दैन्यवाणा नसतो तर सामर्थ्यशाली असतो मात्र साध्या डोळ्यांनी त्याचे ज्ञान होणार नाही.

भगवंत भक्ताचा भाव पाहून साकार होतो किंवा प्रतिमेत येतो. मात्र आकाराला आलेल्या मूर्ति /प्रतिमेला प्रकृतीच्या नियमानुसार तुटणे, फुटणे, चळणे, ढळणे हे वाट्याला येते. राम, कृष्ण, बुद्ध यांनी शरीर धारण केले ते कालांतराने नष्ट ही झाले. बाबराने अयोध्येतील राममंदिर पाडले. रामभक्तांनी बाबरी मशीद पाडली. प्रतीकात्मक किंवा गौण देवांच्या बाबतीत हे घडले तरी मुख्य देवाच्या बाबतीत हे घडत नाही. परमात्मा किंवा परब्रह्म हा मुख्य देव असून त्याला जाणण्यासाठी हृदयाचे आकर्षण कमी व्हावे लागते. देहबुद्धी केली बळकट आणि ब्रह्म पाहू गेला चोरटो हृदयाने शोधावी वाट परब्रह्माची ॥

जेवढी देहबुद्धी जास्त तितकी आसक्ती जास्त. आणि आसक्त मनुष्य कामनापूर्ति करणाऱ्या कनिष्ठ देवात अडकतो आणि खऱ्या देवाला मुकतो.

o भारतीय संस्कृतीने उपासनेसाठी मूर्तिपूजा स्वीकारली आहे. ती सोयीची आणि उपयुक्त आहे. ज्या समाजाने मूर्तिपूजा स्वीकारली नाही तो समाज बुद्धिमत्ता आणि वैभव असूनही दुःखी आणि अस्वस्थच राहतो.

जेव्हा इंग्रजांच्या प्रभावाने आपल्यातील बुद्धिमंतांचा वर्ग मूर्तिपूजेविषयी विकल्प बाळगणारा झाला होता. त्यामागचे खरे तत्त्व कोणी लक्षात घेत नव्हते. श्रद्धा गबाळी झाली होती मंदिरांना अवकळा आली होती. धार्मिक कर्मकांडे सुरूच होती. दांभिकता वाढली होती. विद्वत्ता लाचार झाली होती. समर्थांच्या काळी मुसलमानी पारतंत्र्यामुळे देशाची परिस्थिती चिंताजनक होती.

मूर्तिपूजेचे खरे, उदात्त स्वरूप लोकांच्या लक्षात आणून देण्यासाठी संतमहात्मे प्रयत्न करत होते. मूर्तिपूजा उपासनेचा चांगला प्रकार आहे पण तिचे शुद्ध स्वरूप जाणून घ्यायला हवे. केवळ मूर्ति म्हणजे देव नव्हे. मूर्ति तुटू फुटू शकते परंतु देव दैन्यवाणा नाही. तो नेहमी अखंड, अभंग, अक्षय, रमणीय, प्रसन्न असतो. तो व्यापक आणि स्थिर आहे. आवाहन/ विसर्जन मूर्तिपुरते असते.

©www.madhaveeraghuveer.com

Date 30.12.14

ज्या मानला देव तो पूजिताहे।
परि देव शोधुनि कोण्ही न पाहे।
जगी पाहता देव कोट्यानकोटी।
ज्या मानली भक्ति जे तेचि मोठी॥१८८॥

अर्थ - ज्याला जो देव आवडतो तो त्या देवाची पूजा अर्चा करतो. खरा देव कोणीच शोधून पहात नाही. लोकात पहावे तर असंख्य देव आहेत. ज्याला ज्याची भक्ति आवडते तीच तो श्रेष्ठ मानतो.

स्पष्टीकरण - उपासनाशास्त्राप्रमाणे माणसे सात्विक, राजस व तामस स्वभावाची असतात. प्रत्येकाला आपापल्या स्वभावानुसार देव आवडतो. आपल्या आवडत्या सगुण मूर्तीला जे आवडते ते अर्पण करतो. काही हीन देवतांना मद्य व मांस यांचा नैवेद्य लागतो. ज्या देवाला आपल्यासारखेच व्यसन आहे तो खरा देव आहे का? हा विचारच माणूस करत नाही.

पूर्वी वैदिक देवता प्रचलित होत्या. नंतर पौराणिक देवता प्रचलित झाल्या. मध्यंतरी परधर्मातील साधु व देवता यांचीही पूजा प्रचलित झाली. समाजमनातील हा गोंधळ पाहून समाजोन्मुख संतांना फार वाईट वाटते म्हणून सामान्य माणसाने खरा देव कसा व कोणता हे नीट समजून घ्यावे यासाठी जे झटतात.

★ माणसाने कामनापूर्तिसाठी आपापल्या कल्पनेने नाना देव निर्माण केले. त्या त्या देवतांचे कर्मकांड, त्यांचे नवस, त्यांच्या आवडी - निवडी, नैवेद्य यांची रचना केली. परन्तु खरेखरच तसे असते का?

भक्तांचे पालन करणारा देव काही जीवांच्या बळीने तृप्त कसा होईल?

शेर सवाशेर मूँग पपड़िया देवी को चढ़वायो।
देवी बापुडी खावे न पिवे आपहि भोग लगायो।
आपण आपल्या आवडी निवडी देवावर लादतो।

तमोगुणी माणसांच्या देवांना मद्य - मांसाचा नैवेद्य लागतो. रजोगुणी माणसाला नाना पक्वान्ने, लेकुर - तुपकट

पदार्थ देवाला अर्पण करावेसे वाटतात. सत्त्वगुणी मनुष्य नाम: स्मरण, ध्यान-भजन, वाचन-चिंतन-मनन याला महत्त्व देतो.

रामकृष्ण आश्रम, अरविंद आश्रम, चिन्मय मिशन येथे सुविद्य व सुबुद्ध साधकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे तिथे स्वच्छता, वैयक्तिक उपासना, प्रवचन यांना अधिक महत्त्व असते. तर रजनीशांचे बहुसंख्य शिष्य पाश्चिमेकडील असल्याने तिथे भोग विलासांची रेलचेल आढळते. माणसाने आपापल्या स्वभावानुसार उपासना पद्धती शोधून काढल्या. यातील सात्त्विक उपासक मोक्षाधिकारी आहेत.

मूर्तिपूजेमागची खरी शास्त्रीय भूमिका कालक्रमाने लुप्त झाली. तत्त्वज्ञानाचा आधार सुटला आणि गतानुगतिक कर्मकांड, सांप्रदायिक दुराग्रह आणि गबाळी भावना तेवढी उरली. देवघर टिकले पण देव्हाऱ्याला देवांच्या कोठाराची अवकळा आली. पंचायतन पूजेमागची समन्वयाची दृष्टी नाहिशी झाली. देवमूर्तींची संख्या अनेक प्रकारांनी वाढू लागली.

भोगामागची आसक्ती सुटावी यासाठी भोग ईश्वरार्पण करायचे. पण त्याकरता मुळात विरक्तीचे मानसिक पटलाचे असावे लागते. तसे नसते तेव्हा पूजेला दांभिकता येते किंवा पूजा हा धंदा होऊन बसतो. हे अनिष्ट आहे.

भावना आणि श्रद्धा या गोष्टी श्रेष्ठ खऱ्या पण त्या खऱ्या आणि सात्त्विक असाव्या लागतात. श्रद्धेला सात्त्विकतेच्या मर्यादेत राखण्यासाठी शास्त्राचे व संतांचे मार्गदर्शन प्रेमाने व आदराने स्वीकारावे लागते.

© www.madhaveeradhuveer.com

तिन्ही लोक जेथुनि निर्माण जाले।
तया देवरायासी कोण्ही न बोले।
जगीं थोरला देव तो चोरलासे।
गुरुवीण तो सर्वथा ही न दीसे॥१८०॥ श्रीराम॥

अर्थ - हे त्रैलोक्य ज्याच्यापासून निर्माण झाले त्या ईश्वराचा शोध कोणीही करीत नाही. देवांचा देव असलेला तो ईश्वर अति सूक्ष्मपणामुळे गुप्त आहे. सद्गुरुच्या मार्गदर्शनाखेरीज तो अनुभवास येत नाही.

स्पष्टीकरण - माणसाला घटनेच्या कारणाचा शोध घेण्यात विशेष रस वाटतो. त्यामुळे या विश्वाच्या कारणाचा शोध घेतल्यावाचून बुध्दीला चैन पडत नाही. अखेर सच्चिदानंद ईश्वराच्या ठिकाणी विश्वाचे मूळ कारण सापडते.

सामान्य माणसाच्या बुध्दीत फारशी रग नसते. तो सामान्य व लहान गोष्टींची कारणे शोधतो. परंतु त्रैलोक्याचे मूळ कारण शोधण्याची चिकाटी, खोली व व्यापकता त्याच्या बुध्दीमध्ये नसते.

नेहमीच्या जीवनातील दृश्य घटनांचे कारण बहुधा दृश्य किंवा कधी न अदृश्य असते. परंतु त्यापलीकडे झेप घेण्याची शक्ती स्थूल बुध्दीत नसते. त्यामुळे ईश्वर अनाकलनीय होतो. मात्र सूक्ष्मात विहार करण्याची विद्या संतांपाशी असते. ती विद्या संपादन करण्यासाठी संतांचे शिष्यत्व पत्करावे. त्यामुळे थोड्या श्रमात मोठे घबाड पदरात पडते.

लोकांना खरा देव नकोच असतो. त्यांना तात्पुरती कामे करणारे आणि पर्यायाने संसारात अडकवणारे सामान्य देवच हवे असतात. म्हणून 'थोरला देव चोरला आहे, त्याबद्दल कोणीच बोलत नाही' असे समर्थ म्हणतात. लोकांना नवसाला पावणारे देवच हवे असतात. स्वर्ग, मृत्यु, पाताळ हे तिन्ही लोक जिथून निर्माण झाले तो अंतरात्माच खरा देव आहे. त्याचा अनुभव घ्यायचा असेल तर सद्गुरुंनाच शरण जावे लागते.

© www.madhavgaidhani.com

सद्गुरु साधकाला कर्मकांडात अडकवत नाहीत किंवा वासनापूर्ती करणाऱ्या देवतांच्या मार्गी दाखवत नाहीत. ते साधकाला निर्वासन करून मुक्त करतात.

○ जन्माद्यस्य यतः। या ब्रह्मसूत्राने खऱ्या देवाचे म्हणजे ब्रह्माचे स्वरुप आणि सामर्थ्य सांगितले आहे.

वरुणाचा पुत्र भृगु याने आपल्या पित्याकडे ब्रह्म जाणून घेण्याची जिज्ञासा प्रकट केली. तेव्हा वरुणाने पुत्राला केलेला उपदेश उपनिषदात आला आहे "हे भासणारे व दिसणारे विश्व ज्याच्यामुळे उत्पन्न होते, ज्याच्या आश्रयाने राहते आणि शेवटी ज्यात लय पावते ते ब्रह्म हे समज." त्याप्रमाणे भृगुने तपश्चर्या केली व त्याला क्रमाक्रमाने सत्याच्या अधिकाधिक जवळचे ज्ञान होत गेले. व शेवटी त्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला आणि सच्चिदानंद हे ब्रह्माचे स्वरुप त्याच्या अनुभवास आले.

देवाचे हे स्वरुप कोणाला कळतही नाही किंवा कळावे अशी इच्छाही नसते. सृष्टीच्या उत्पत्ति-स्थिति-लयाचा आधार कोणी असेल तर असो, त्याच्याविषयी कुणाला बोलावयाचे वा ऐकावयाचे ही नसते. लोकांना नवसाला पावणारा देव संकटातून सोडवणारा, इच्छापूर्ती करणारा देव हवा असतो.

माणसाच्या कोत्या बुद्धीला व हळव्या मनाला खरा देव पेलतच नाही. भव्यतेचा साक्षात्कार सुखावह होण्यासाठी धैर्य लागते ते नसणारा उंबरा ओलांडायचाही कंटाळा करतो. 'मी' आणि 'माझे' सोडायला लावणारा देव कोणाला आवडणार? संयमाची शिदोरी घेऊन, वैराग्याच्या वाटेने ज्याच्याकडे जावे लागते. ज्याच्या दर्शनासाठी दीर्घकाळ प्रयत्न करावे लागतात, ज्याच्या भेटीसाठी सदाचाराचे प्रमाणपत्र लागते. अहंकाराचा वासही ज्याला सोसत नाही असा देव कोणाला भावणार? त्यापेक्षा (एखाद्या) नारळाला किंवा खडीसाखरेला भुलणारा देव बरा वाटतो आणि म्हणूनच थोरला देव चोरलाच रहातो.

© www.madhavgeeraghuveer.com

गुरु पाहता पाहता लक्ष कोटी।
बहुसाल मंत्रावळी शक्ति मोठी।
मनी कामना चेटके धातमाता।
जनी व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता॥१८०॥श्रीराम॥

अर्थ- समाजामध्ये अक्षरश: अनंत प्रकारचे गुरु आढळतात. त्यांच्याजवळ विशेष विविध प्रकारचे मंत्र असतात. अनेक प्रकारच्या मोठ्या शक्ति असतात. पण त्यांच्या अंतर्यामी वासना भरलेल्या असल्याने त्या तृप्त करण्यासाठी ते अनेक विपरीत क्रिया करतात व खऱ्या खोट्या गोष्टी सांगतात. असा गुरु ईश्वराचे दर्शन करवून देऊ शकत नाही, तो गुरुपदाला लायक नाही.

स्पष्टीकरण - गुरुबाजी हा भारतीय अध्यात्मजीवनाचा एक अतिशय जुना-पुराणा रोग आहे. भारतीय अध्यात्माचा तो कॅन्सरच आहे. या रोगाची वाढ होण्यास जनतेचे अज्ञान कारण होते. जरा कोणी वस्त्रे बदलून बराच वेळ डोळे झाकून बसू लागला की लोक त्याला साधु मानू लागतात. अनेक सुशिक्षित लोक त्याची सेवा करू लागतात. खरे साधुत्व कसे असते याची वास्तव कल्पना कोणालाही नसते. त्यामुळे होते काय की थोडी बहुत तपश्चर्या करून काही अतींद्रिय सामर्थ्य प्राप्त झालेली पुष्कळ माणसे गुरुपदाचा धंदाच करतात. या धंद्याच्या प्रथमावस्थेत गुरुचा प्रभाव पडतो त्याच्या तेजामुळे लोक नादी लागतात. परंतु त्यापुढे गुरुजींचे साधन मंदावते, सामर्थ्य क्षीण होते. पुढे आपल्या वासना तृप्त करण्यासाठी तो भलत्याच क्रिया करतो. खऱ्या खोट्या बाता मारून लोकांना भुलवतो. अशा गुरुच्या संगतीने ईश्वरदर्शन शक्य नाही.

अध्यात्मात रजोगुणी व तमोगुणी माणसांचा खूप भरणा झाला आहे. असे लोक वैचारिक गढूळपणा निर्माण करतात. सांसारिक दु:खांनी गांजलेल्या गांजल्यांना नादी लावतात. गुरुकृपेने आपली संकटे दूर होतील, इच्छा

पूर्ण होतील या कामनिक आशेने लोक गुरुच्या आहारी जातात. असे लक्षावधि गुरु आहेत. प्रत्येकाने वेगवेगळे मंत्र सिद्ध करुन मोठी शक्ती मिळवलेली असते. त्यातून कधी कधी धनप्राप्ती, संतानप्राप्ती होत असेलही. पण त्यातून मुक्ती कधीच लाभणार नाही.

कधी कधी दांभिक शिष्यच दांभिक गुरुंना जन्म देतात. स्तोम माजवतात. ऐश्वर्यशाली मठ, पूजेचा थाटमाट, अंगावरील राजेशाही कपडे, बोलण्यातील चातुर्य, रिद्धी सिद्धी या सर्व बहिरंगाला चांगली चांगली माणसे भुलतात. हल्ली गुरु होणे हा बिनभांडवली धंदा झाला आहे. आत्मज्ञान नसताना गुरु म्हणून मिरवणे हे मोठे पाप आहे.

बुद्धिवादाच्या पातळीवर कुणी कितीही नाकारले तरी गुरुची आवश्यकता ही एक अपरिहार्य वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच आपापल्या धारणेप्रमाणे गुरु या मालाला मागणी पुष्कळ आहे. खऱ्या मालाचा पुरवठा त्या प्रमाणात होण्याची शक्यता नाही. आणि म्हणूनच व्यावसायिक स्वार्थी लोक गुरु या नावाखाली काहीही खपवत असतात.

खऱ्या अध्यात्माची कोणाला कल्पना नसते व महत्वही वाटत नाही. त्यामुळे काही अद्भुत चमत्कार करण्याचे सामर्थ्य ज्याच्याजवळ आहे, ज्याला अंतर्ज्ञान वा भविष्यज्ञान आहे., जो संतति संपत्ती, रोगमुक्ती संकटांचा परिहार या संबंधिच्या लोकांच्या इच्छा पूर्ण करतो. ज्या देवाचे उत्सव वैभवशाली असतात. पूजेचा थाट-माट, मठ मंदिराची भव्यता कीर्तन-प्रवचनातील विद्वत्तापूर्ण व मनोहारी विवेचने, संगीत नृत्यांनी अलंकारलेले भजन, देखाव्याचे दानधर्म, लोकांना आकर्षित करणारे वेषभूषा असी अनुकूलता त्यांच्याकडे आहे. रिद्धी सिद्धी इ० बाह्यांगाने जे नटले आहेत, त्यांनाच लोक साधु समजतात व गुरु म्हणून त्यांच्या नादी लागतात. अध्यात्माच्या साधनापासून ते कोसो दूर असतात. त्यामुळे सत्यकाला मार्ग दाखवण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ नसते. त्यांची योग्यता नानाप्रकारच्या ऐहिक व्यावसायिकांइतकीच (वकील, इंजिनीयर डॉक्टर) आहे.

© www.madhaveeradhuveer.com

classmate
Date 31.12.15
Page

नव्हे चेटकी चाळकु द्रव्यभोंदु ।
नव्हे निंदकु मत्सरु भक्तिमंदु ।
नव्हे उन्मतु व्यसनी संगबाधु ।
जगी ज्ञानिया तोचि साधु अगाधु ॥१८७॥श्रीराम॥

अर्थ - चेटूक करणारा, फसवणारा, पैसे उकळणारा, निंदा व मत्सर करणारा, भक्ति नसणारा, मस्तवाल वागणारा, व्यसन करणारा आणि आपल्या संगतीने दुसऱ्याला बिघडवणारा असा माणूस गुरु किंवा साधु असूच शकत नाही. जो आत्मज्ञानी आहे तोच खरा साधु असून गुरुपदास योग्य समजावा.

स्पष्टीकरण - श्री समर्थांनी प्रथम गुरुपदास कोण लायक नाही हे सांगितले. त्या लक्षणांपैकी तीन लक्षणे महत्त्वाची -
१. लोकांना भुलवून त्यांच्याकडून पैसे उकळणारा
२. दुसऱ्याची निंदा व मत्सर करणारा
३. आपल्या सहवासाने इतरांना भ्रष्ट करणारा -
असा माणूस साधु असणे शक्य नाही. ज्याच्या अंगी साधुत्वाचा उदय होतो त्याचे पैशाचे प्रेम प्रथम क्षीण होते. तसेच प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्यामी त्याला ईश्वरी सत्ता दिसते. त्यामुळे निंदा करणे म्हणजे ईश्वराला नावे ठेवणे असे तो मानतो. अशा अनसूय माणसाच्या संगतीने इतरांचीही मानसिक धारणा उंचावते.

त्याला आत्म्याचे ज्ञान झाल्याने जाणावयाचे काही शिल्लक उरत नाही. यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यत्ज्ञातव्यमवशिष्यते त्यामुळे देहाने तो माणूस दिसत असला तरी ज्ञानी या दृष्टीने तो अगाध असतो. ज्यास आत्मज्ञान झाले नाही त्याला गुरुपदाचा अधिकार नाही हे अध्यात्मशास्त्राचे मूलभूत तत्त्व आहे.

चेटकी म्हणजे जारण मारण उच्चाटन करणारी विद्या होय. विद्या। काही तांत्रिक गुरु ही विद्या आत्मसात करतात. सूड घेण्यासाठी शत्रूचा काटा काढण्यासाठी हे अघोरी प्रकार अवलंबले जातात. चाळकु म्हणजे फसवणारा, देवदर्शनाच्या पुनर्जन्माच्या भाकड कथा सांगून काही गुरु भोळ्याभाबड्या

शिष्यांना नाची करवतात. तू, राधा, सुदामा सांगून झुलवतात. कुंडलिनी जागृत झाली असल्याचे सांगतात. कल्पभेद म्हणजे लोकांची भावना एक्करा करायची. अयोध्या - रामायण, शुकताल - भागवत, तीर्थस्थाने - व्यापारीकरण. हल्ली प्रतिष्ठान काढणे हा संपत्ति अपहरणाचा राजमार्ग झाला आहे.

खरे गुरु हे निंदक नसतात. ते अन्य संतांना नावे ठेवत नाहीत. दोन वकीलांप्रमाणे दोन महाराजांमध्येही स्पर्धा असते. खरे सद्गुरु या सर्व दोष दुर्गुणांपासून दूर असतात.

उन्मत्त म्हणजे गर्विष्ठ, उर्मट, ताठा मिरवणारा. आपले महत्त्व वाढवण्यासाठी काही दांभिक गुरु पिशाच्चवत् वागतात. अज्ञानी जनांना ती त्यांची उच्च आध्यात्मिक अवस्था वाटते. दांभिक गुरुंना अफू, गांजा, चरस अशी व्यसनेही असतात. त्यांचा सहवास साधकाला बाधक ठरतो - कुसंगाचे तोटे.

© www.madhaveeradhuveer.com

नव्हे वाउगी चाउटी काम पोटी।
क्रियेवीण वाचाळता ते चि मोठी।
मुखे बोलिल्यासारखे चालताहे।
मना सद्गुरु तो चि शोधूनि पाहे॥१८२॥श्रीराम॥

अर्थ – ज्याच्या अंतःकरणात वासना भरलेली असते, जो आचावाच्या बोलतो, ज्याचे करणे शून्य व बडबडणे फार असते असा पुरुष गुरुपदास योग्य नाही. जो तोंडाने आत्मज्ञान सांगतो व त्याप्रमाणे आचरण करतो तो खरा।

स्पष्टीकरण – अज्ञानी मनुष्य देहबुद्धीमुळे वासनांनी भरलेला असतो. तर ज्ञानी मनुष्य आत्मबुद्धीमुळे वासना-रहित असतो. बोलण्यासारखी क्रिया नसणे हेच वासनेच्या प्रभावाचे व्यक्त स्वरूप आहे. असा पुरुष शिष्याची वासना कशी नाहीशी करणार? तो गुरुपदाला लायक नसतो.

ज्याची वासना पूर्ण गेली आहे अशा पुरुषाचे स्वतःच्या मनावर स्वामित्व असते. तो जसे बोलतो तसेच वागतो. किंबहुना स्वतःच्या वागण्याशी मेळ असेल असेच तो बोलतो. शिष्याची वासना क्षीण करण्याचे सामर्थ्य त्याच्यात असते. शिवाय 'बोले तैसा चाले' याचा आदर्श तो स्वतः असतो. मात्र असा थोर सत्पुरुष सगळीकडे आढळत नाही. म्हणून त्याला शोधून काढायला हवे.

☆ खरे सद्गुरु जसे बोलतात तसे चालतात. लबाड गुरु बोलताना अध्यात्माच्या लांब्याचौड्या गप्पा मारतील पण प्रत्यक्षात त्यांच्या जीवनात तसे कुठेही दिसून येणार नाही. फार उच्च, जड बोलण्याने लोक आपल्याला अधिकारी समजतील व सेवाभावाने आपल्या कामना पूर्ण करतील अशी अभिलाषा त्यांच्या मनात असते. त्यामुळे प्रत्यक्षात न आलेले अनुभवही ते दडपून सांगतात.

वाउगी म्हणजे व्यर्थ बोलणारा तर चाउटी म्हणजे चावट काहीतरी बोलणारा! काम पोटी म्हणजे वासनांनी भरलेला! असा मनुष्य सद्गुरुपदास लायक नाही.

© www.madhaveeraghuveer.com

यथा चित्तं तथा वाचा

जनी बोलण्यासारिखे आचरावे -- (१९५)

सुखोपभोग, संपत्ति वा कीर्ति उदंड मिळावी अशी अभिलाषा धरून लोकांना आकर्षित / प्रभावित करणारी व्याख्याने / प्रवचने दिल्याने काही कोणी सद्गुरु ठरत नाहीत. एखाद्या शिक्षकाने / विचारवंताने लोकांना अध्यापन माहिती देणे / त्यांना बहुश्रुत करणे निराळे! पण तेवढ्याने काही तो सद्गुरु ठरत नाही.

खरे सद्गुरु हे शाब्दे च परे च निष्णात असावे लागतात. साक्षात्कारी / अनुभवी हवेत.

संयम, तितिक्षा, निःस्पृहता, भक्ति, विवेक हे गुण अशा सद्गुरूंच्या ठिकाणी असणे Mandatory आहेत. आणि तो केवळ प्रवचनाचा नव्हे तर आचरणाचा विषय असावे.

प्रवचन / कीर्तनामध्ये शृंगार किंवा बीभत्स रस असू नये. त्यावर बोलण्याने श्रोत्यांचे मन विचलित होते. आणि व्यर्थ बोलण्यामुळे श्रोत्यांना विश्वास डळमळीत होतो.

खरा संत महात्मा कसा असतो, हे तुकाराम महाराज एका अभंगात स्पष्टपणे सांगतात.

कपट काही एक । नेणे भुलवायाचे लोक ।
तुमचे करितो कीर्तन । गातो उत्तम ते गुण ॥
नेणे वाद घटपटा । करिता पंडित करटा ।
नाही हालवित माळा । भोवते मेळवुनि गबाळा ॥

© www.madhaveeraghuveer.com

classmate
Date 1.12.15
Page

जनी भक्त ज्ञानी विवेकी विरागी।
कृपाळु मनस्वी क्षमावंत योगी।
प्रभु दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे।
तयाचेनि योगे समाधान बाणे॥१८३॥ श्रीराम॥

अर्थ - जो भक्ती, ज्ञान, विवेक आणि वैराग्य यांनी संपन्न आहे. क्षमाशील असून जो अतिशय करुणासंपन्न आहे, जो योगी आहे, जो वडीलपणाने वागतो जो बहुश्रुत असून सावधान आहे, आणि जो चतुरपणाने वागण्याचे जाणतो, असा पुरुष गुरुपदास लायक समजावा. त्याच्या सहवासाने समाधान बाणते.

स्पष्टीकरण - ज्ञानदशा आणि अज्ञानदशा अशा माणसाच्या दोन अवस्था असतात. ज्ञानदशेमध्ये काही गुणांचा स्वाभाविक आविष्कार होतो. ज्याला आत्मदर्शन होते तो भक्तिमान, ज्ञानवान व विवेकवैराग्यसंपन्न होतो. असा आत्मज्ञानी पुरुष अत्यंत क्षमाशील आणि करुणामय असतो. त्याची वृत्ति स्वरूपात दृढ झाल्याने तो सतत अनुसंधानात राहतो.

जो ज्ञानी एकांतवासात काळ कंठतो त्याची गोष्ट निराळी पण जो ज्ञानी, गुरुपद धारण करतो त्याचा अनेक प्रकारच्या अज्ञानी लोकांशी निकट संबंध येतो. भिन्न वयाच्या, भिन्न मानसिक पातळीवरच्या स्त्रीपुरुषांना एकत्र व एकटे वागवणे सोपे काम नाही. शिष्यांना सतत योग्य मार्गदर्शन करून आत्मसन्मुख ठेवण्यासाठी सद्गुरु अत्यंत चतुर असावा लागतो. वडीलपणे वागणारा, सावधान वृत्तीचा बहुश्रुत देखील असावा लागतो. भाग्याने अशा सत्पुरुषाचा सहवास लाभला तर वासना शांत होऊन समाधान वाढत जाते. सद्गुरु मार्ग दाखवतात, मार्गामध्ये साथ देतात पण चालण्याचे काम ज्याचे त्यालाच करावे लागते.

☆ आत्मसाक्षात्कार होईपर्यंत विनातक्रार साधन करणे हीच सद्गुरुकृपेची खूण आहे. स्वयं सद्गुरूची १२ लक्षणे
(१) ज्ञानी. (२) जनी भक्त - स्वतःला ज्ञान झाले असले तरी तो लोकांसमोर आदर्श ठेवतो, भक्तिभावाने वागतो, मार्गाधारे वर्तावे (३) विवेकी - सार-असार, आत्म-अनात्म, नित्य-अनित्य

©www.madhaveeraghuveer.com

योग्य - अयोग्य, ग्राह्य - त्याज्य, न्याय्य अन्याय्य, श्रेयस - प्रेयस
(४) वैराग्य - वस्तू व्यक्ति याबद्दल ममत्वाचा अभाव। जेवढी देहबुद्धी कमी तेवढे वैराग्य अधिक। असले तर असू दे व नसेल तर नसू दे याला गोंदवलेकर महाराज वैराग्य म्हणतात.
(५) कृपाळू - शिष्याचे कल्याण व्हावे अशी तळमळ असते. ते शिष्याला रागावले तरी हितासाठी रागावतात. (६) मनस्वी - मनावर नियंत्रण असणारा किंवा निश्चयी, श्रेष्ठ - मोठ्या मनाचा. तेजस्वी, बाणेदार (७) क्षमाशील - मनात करुणा जागी असल्याने अन्याय करणाऱ्यांना किंवा त्रास देणाऱ्यांनाही तो उदार मनाने क्षमा करतो
(८) योगी - शरीराने सांसारिक कर्तव्ये पार पाडत असतानाही तो मनाने भगवंताशी सतत जोडलेला असतो. (९) प्रभु - तो इंद्रियांचा स्वामी असतो. भगवंताचा हा भक्त संघटन प्रमुख किंवा नेता असतो. धर्मसंस्थापनेसाठी लोकांचे नेतृत्व करतो.
(१०) दक्ष - सन्मार्गाने जात असताना एखादा मोहाचा क्षण येतो तेव्हा तो दक्ष असतो. मोहाच्या आहारी जात नाही. अखंड सावध असतो. साधे साधे जुनीचे प्रसंग सामान्य माणसाला भगवंतापासून दूर नेतात. पण हा भक्त सावध असतो. (११) व्युत्पन्न - शास्त्रग्रंथ, धर्मग्रंथांचा व्यवस्थित अभ्यास हवा. साधकबाधक चर्चा करून शिष्याचे समाधान करता यायला हवे (१२) चातुर्य - माणसाची पारख हवी, व्यवहारचातुर्य हवे. कुणाला व किती अंतरावर ठेवावे हे चातुर्य हवे. विचित्र व्यक्तींमुळे कार्यनाश होऊ शकतो.
अशा सद्गुरुंच्या सहवासात शिष्याला समाधान वाटते.

नव्हे तेचि जाले नसे तेचि आले।
कळों लागले सज्जनाचेनि बोले।
अनिर्वाच्य ते वाच्य वाचे वदावे।
मना संत आनंत शोधीत जावे॥१८४॥श्रीराम।

अर्थ - मूळ परमात्मस्वरूपात विश्व नव्हते. पण तिथे ते निर्माण झाले. त्यास व्यक्त आकार नव्हता पण त्याला आकार आला. सज्जनांच्या सहवासात त्यांचे बोलणे ऐकून या गोष्टी ध्यानात येऊ लागल्या. वास्तविक परमात्म-स्वरूप वाणीचा विषय होऊ शकत नाही. पण शब्द बोलून संत त्यास वाणीचा विषय करण्याचा प्रयत्न करतात.

स्पष्टीकरण - परमात्मा केवळ ज्ञानमय आहे तिथे अज्ञान नाहीच. परंतु मानवी जीवनात ज्ञान व अज्ञान आहे.

ईश्वराच्या संकल्पामुळे विश्व निर्माण झाले खरे परंतु ते प्रगट नव्हे, ते सूक्ष्म अवस्थेत होते. अज्ञानी दृष्टीला अप्रगट किंवा अव्यक्त विश्व नसल्यासारखेच असते. नंतर त्यास दृश्य, इंद्रियगोचर असा स्थूलाकार आला. तेव्हा जे असून नसल्यासारखे होते ते प्रत्यक्षात आले. Let there be light and light was there.

विश्वाकडे दोन दृष्टींनी पाहता येते. एक ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीतून आणि दुसरे अज्ञानी पुरुषाच्या दृष्टीतून। परमात्मस्वरूपाकडून जगाकडे पाहिले तर जग हा अज्ञानी माणसाला होणारा भास ठरतो। आणि जगाकडून परमात्म्याकडे पाहिले तर जग हा ईश्वराचा संकल्प आहे असा निर्णय होतो. संतांपाशी राहून ज्ञानदृष्टीने जगाकडे पहायला शिकावे

परमात्मवस्तु स्थलकालांच्या मर्यादांपलीकडे आहे. व वाणी केवळ दृश्य वस्तूंचे वर्णन करते. त्यामुळे अतींद्रिय वस्तु वाणीच्या वर्णनाचा विषय होऊ शकत नाही. हे जरी खरे असले तरी परमात्मवस्तुची कल्पना येण्यासाठी संतांना अखेर वाणीचाच आश्रय घ्यावा लागतो. संतांचे ब्रह्मज्ञान अतिशय स्पष्ट व पूर्ण असते. त्यामुळे ब्रह्माला सुद्धा संत पुष्कळ अंशी वाणीचा विषय करू शकतात. परमात्मवस्तूचे ऐश्वर्य संतांच्या तोंडूनच ऐकावे।

वस्तुतः जग अस्तित्वात नाही. पण जग आहे असा भास अज्ञानाने होतो यालाच नव्हे तोचि जाले असे म्हटले आहे. आणि एकदा जगद्भास स्वीकारला की अनेक काल्पनिक गोष्टी स्वीकाराव्या लागतात त्याला नसे तेचि आले असे म्हटले आहे. एकदा जग मिथ्या असूनही ते आहे असे मानले की सूर्योदय, सूर्यास्त, चतुर्थी, ग्रहण, आमावस्या या सर्व कल्पनांना जन्म द्यावा लागतो. जोपर्यंत अज्ञान आहे तोपर्यंत हे सर्व खरे वाटते. परंतु सद्गुरुंच्या सहवासात या सर्व गोष्टी लक्षात येतात. अज्ञान दूर करणे, भ्रम नाहीसा करणे हेच सद्गुरुंचे लक्षण आहे. वस्तुतः परब्रह्म अनुर्वाच्य आहे. जग नाहीच, परमात्माच आहे. त्यालाच तुकाराम महाराज 'विष्णुमय जग' असे म्हणतात तर समर्थ 'नारायण असे विश्वी' असे म्हणतात.

संतांनी अनुर्वाच्य ब्रह्म वाचेने सांगून सामान्य जनांच्या आकलन कक्षेत आणून सोडले. ज्ञानदेव म्हणतात.

अबोलाची बोलीन । ईश्वरपाचे रूप दावीन ।
अतींद्रिय परी भोगवीन । इंद्रियाकरवी ॥

जे शब्दांनी व्यक्त होत नाही असे अंतिम सत्य संत शब्दात मांडून सामान्यांपर्यंत पोहोचवतात. समर्थ म्हणतात —

फोडून शब्दाचे अंतर । वस्तु दाखवी निजसार ।
तोचि गुरु माहेर । अनाथांचे ॥

साहित्यिकांचे आणि पंडितांचे ग्रंथ वाचून त्या अंतिम सत्याबद्दलचा गोंधळ वाढतो. परंतु संतांची वाणी ऐकल्यास ते कळू लागते. ते कल्याणाचे ठरते. बोलतो जे अर्णव पीयूषाचे ।

लपावे अती आदरे रामरूपी।
भयातीत निश्चीत ये स्वस्वरूपी।
कदा तो जनीं पाहता ही दिसेना।
सदा ऐक्य तो भिन्नभावे वसेना॥१९८॥ श्रीराम॥

लपणे

अर्थ- आपण अगदी मनापासून परमात्मस्वरूपात मिसळून जावे. ते आत्मस्वरूप सर्व प्रकारच्या भीती व चिंता यांच्या पलीकडे आहे. लोक त्याला पहायला जातात. पण तो कोणाला दिसत नाही. कारण तो सदैव परमात्मरूप असतो, वेगळेपणाने उरतच नाही.

स्पष्टीकरण- स्वस्वरूपामध्ये लपण्याची कल्पना स्वरूपानुभूतिच्या दृष्टीने फारच अर्थपूर्ण आहे. गुप्त होऊन जाणे हे लपण्याचे खरे मर्म आहे. लपण्याच्या अवस्थेत माणूस असून नसल्यासारखा होतो. आत्मानात्मविवेकाने अनात्म बाजूला काढले की जीव आपोआप मावळतो. तो सहजच स्वस्वरूपात लीन होतो. झोपेमध्ये 'मी' मावळण्याचा अनुभव आपल्या सर्वांना येतो. येथे जागेपणी विवेकाच्या सहाय्याने त्या 'मी'ला स्वस्वरूपात लीन करायचे आहे.

स्वस्वरूप सर्व काळज्या, भीती पासून मुक्त आहे. काळजी क्षीण होत जाणे हा स्वरूपी समरस होण्याचा निकष आहे.

स्वस्वरूपी लपलेला पुरुष लोकांमध्ये देहाने वावरतो पण त्याचे स्वरूपाशी सतत ऐक्य असते. ज्या माणसाचा 'मी' देहातून वेगळा होऊन स्वस्वरूपात मिसळला तो देहभानावर नसतो. त्याचा देह पाहून त्याच्या अंतर्यामाची खरी कल्पना येत नाही.

☆ साधकाने जिथे जिथे राम, रघुवीर, रघुनायक असा शब्द जिथे जिथे येईल तिथे आपापल्या इष्टदेवतेची प्रतिष्ठापना करावी. तुकाराम- विठ्ठल, मीराबाई- कृष्ण, रामकृष्ण परमहंस- कालीमाता. इथे आशय असा की लपावे म्हणजे मिसळून जावे. म्हणजे रामच दिसावा, मी दिसू नये. आपले स्वतंत्र अस्तित्व नकोच. आपले प्रत्येक स्पंदन, आपली प्रत्येक कल्पना, रामरूपात विसर्जित व्हावी. लपणे म्हणजे आपली अंतःस्थिती कुणाच्या लक्षात न येणे. भक्ताचे स्वतंत्र अस्तित्व न उरणे.

असा साधक रामरूप झाला आहे हे अन्य लोकांच्या

भये व्यापिले सर्व ब्रह्मांड आहे
भयातीत ते संत आनंत पाहे॥



कधीतही येणार नाही. सगुण रूपाचे अवलंबन घेतले की माणूस भयातीत होतो. माणसाला नाना प्रकारचे भय असते. मनोबोध-१३६

उपनिषदे सांगतात - द्वितीयात् वै भयं भवति।

परंतु आपल्यापेक्षा कुणी वेगळा नसलेच तर भय कशाचे वाटणार?

classmate
Date 2.1.2016
Page

दूरस्थ धार्मिक व तत्।

सदा सर्वदा राम सन्नीध आहे।
मना सज्जना सत्य शोधूनि पाहे।
अखंडीत भेटी रघूराज योगु।
मना सांडि रे मीपणाचा वियोगु॥१८६॥ श्रीराम॥

अर्थ- स्वस्वरूप सदा सर्वकाळ आपल्या अगदी निकट आहे. सज्जन मना! ते तू नीट शोधून पहा. त्या स्वरूपाशी तुझी अखंड भेट आहे, त्याच्याशी सदैव ऐक्य आहे. मीपणाने आलेले वेगळेपण मना, तू सोडून दे.

स्पष्टीकरण - जीवप्राणी म्हटला की त्याच्या अंतर्यामी आत्मस्वरूप असलेच असते. जीवाच्या सर्व अवस्थांमध्ये ते कायम रहाते. स्वतःच्या आतमध्ये खोलवर शिरून त्याचा शोध घ्यायला हवा. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तीन अवस्था ओलांडून पलीकडे गेलो तर त्या स्वरूपाचे दर्शन घडेल.

वास्तविक आत्मा आपले स्वरूप असल्याने त्याचा वियोग घडणे शक्य नाही. परंतु 'मी'पणा विघ्न निर्माण करतो. तो स्वतःहून आपल्याला वेगळे करतो. तो नाहीसा झाला तर ऐक्य आहेच

☆ येथे सदा आणि सर्वदा असे दोन शब्द वापरले आहेत. सदा म्हणजे नेहमी, सर्वकाळ - All the time आणि सर्वदा म्हणजे सर्वत्र everywhere. भगवंताचे अस्तित्व स्थळकाल-निरपेक्ष आहे. तो सतत (२४ तास, ३६५ दिवस) आहेच आणि सर्वत्र व्यापून आहे. सर्वत्र असल्यामुळे आपल्या अगदी सान्निध आहे. सन्निध हा शब्द सुद्धा थोडा दुरावा दाखवणारा आहे. वस्तुतः आपण रामस्वरूपच आहोत. पण ही भाषेची मर्यादा आहे. सूर्यकिरण सूर्याच्या जवळ नसून प्रत्यक्ष सूर्यच आहेत. दागिना सोन्यासारखा नसून सोनेच आहे. भगवंताकडून आपले व त्याचे सर्वकाळ ऐक्यच आहे. पण आपल्या मीपणामुळे आपल्याला आपण भगवंतापेक्षा निराळे आहोत असे वाटते. ऐक्य हेच वास्तव आहे. वियोग हा काल्पनिक आहे.

हिरण्यकशिपुने प्रल्हादाला भगवंत कुठे आहे असे विचारले तेव्हा सर्वत्रास्ति सदास्ति कि ननु गिरा त्वय्यस्ति मय्यास्ति च। असे यथार्थ उत्तर त्याने दिले. गीतेमध्येही भगवंत आपण सर्वत्र व्यापून असल्याचे व सर्वांच्या हृदयामध्ये वास

© www.madhaveeraghuveer.com

करत असल्याचे सांगतात. एका स्फुट अभंगात समर्थ म्हणतात -

तुम्हा आम्हा मुळी नाही आली तुटी। तुटीविण भेटी इच्छिताती।
इच्छितसा योग नसता वियोग। तुम्हा आम्हा योग सर्वकाळ।
सर्वकाळ तुम्ही आम्ही लोक स्थळी। काया मृगजळी बुडो नये॥

मृगजळ - मृगांनी, समजावे, मिथ्यत्व

© www.madhaveeraghuveer.com

भुते पिंड ब्रह्मांड हे ऐक्य आहे।
परी सर्व ही स्वस्वरूपी न साहे।
मना भासले सर्व काही पहावे।
परी संग सोडूनि सुखी रहावे॥१८५॥ श्रीराम॥

<u>अर्थ</u> - पंचमहाभूते जीवप्राणी आणि विश्व यांच्यामध्ये एकत्व आहे. पण शाश्वत आत्मस्वरूपात त्यांना खरे अस्तित्व नाही. म्हणून मनाला जे काही अनुभवास येते ते पहावे. परंतु त्यात खरेपणाच्या भावनेने न गुंतता स्वानंदात रहावे.

<u>स्पष्टीकरण</u> - हे विश्व पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचभूतांपासून बनलेले आहे. सचेतनात आणि अचेतनात विविध भेद आढळले तरी अखेर पंचमहाभूते हेच सर्वांचे मूलतत्व आहे. विश्वाच्या दृष्टीने सचेतन व अचेतन तर स्वरूपानुभवाच्या दृष्टीने शाश्वत व अशाश्वत हा भेद आढळतो.

स्वस्वरूप शाश्वत तर पंचमहाभूतांसकट सर्व विश्व अशाश्वत आहे असा अनुभव सर्व संतांना येतो. पण अशाश्वताला स्वतंत्र अस्तित्व नाही. त्या कारणाने स्वस्वरूपाच्या ठिकाणी त्याचा नुसता भास होतो.

स्वस्वरूपामध्ये, ज्ञानदशेमध्ये अन्य कशाची अनुभूती नसते तर अज्ञानदशेमध्ये ती असते इंद्रियांच्या द्वारा मनापर्यंत पोहोचणारे दृश्य विश्व अनुभवास येते म्हणून खरे मानता येत नाही आणि बाजूलाही सारता येत नाही. म्हणून सारे दृश्य भास आहे या दृढ भावनेने पहावे आणि पाहिले तरी त्यात मनाने गुंतून जाऊ नये. असा अलिप्तपणा राखून स्वरूपाच्या आनंदात रहावे. खरे तर हे पंचमहात्मक दृश्य विश्व कोणाला बाधक ठरत नाही. त्यामध्ये जीव गुंतला तर स्वरूपाला विसरून जीव बाहेर यावयाला लागतो.

☆ पिंड म्हणजे माणसाचे, पशु-पक्ष्याचे स्थूल शरीर तर ब्रह्मांड म्हणजे परब्रह्माचे स्थूल शरीर - परब्रह्माच्या शरीरामध्ये पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे, ग्रह-नक्षत्र, आकाशगंगा या समस्त अंतराळाचा समावेश होतो. पिंड आणि ब्रह्मांड दोन्ही पंचभौतिक असल्याने त्यांच्यामध्ये ऐक्य आहे. पिंड म्हणजे छोटे यंत्र तर ब्रह्मांड म्हणजे मोठे यंत्र आहे.

© www.madhaveeraghuveer.com

'पिंडी ते ब्रह्मांडी' असे म्हटले जाते. या दोन्ही यंत्रातील भेद हा आकारमान किंवा प्रमाणाचा आहे. मुंगी आणि हत्ती या दोघांच्या शरीरात फरक असला तरी उत्पत्ति, स्थिति, लय किंवा आहार, निद्रा, भय, मैथुन या रचनेत पूर्ण ऐक्य आहे.

जे चि पिंडी तेचि ब्रह्मांडी। पंचभूतांची नांदणी।
प्रचीत नाही की रोकडी। दोहीकडे॥ दासबोध॥

सर्व पदार्थांच्या मुळाशी विद्युत् कण आहेत असे आता वैज्ञानिकही सांगतात. विविधता किंवा भिन्नता हे वास्तव नसून केवळ भास आहे. समर्थांच्या मते आपण हा भास जपावा परंतु अनुसंधान स्वस्वरूपाचेच ठेवावे. वस्तू वस्तू मधील भेद परब्रह्माला सहन होत नाही

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम्।

तारांच्या विविधतेचा आनंद घ्यावा पण हा सारा समुद्र आहे याचे भान ठेवावे.

पिंड ब्रह्मांड ही तत्त्वे जीव शिव एकीकडे।
म्हणूनि पर ते ब्रह्म। सर्वोदित संपदे॥

पिंड ब्रह्मांड किंवा जीव-शिव ही तत्त्वे अलिकडची आहेत परंतु परब्रह्म हे सर्वांत जुने असून तिथे केवळ ऐक्यच आहे. भासाचे नियम समजावून घ्यावेत, त्यानुसार वागावे परंतु बोध अभेदत्वाचा ठेवावा.

© www.madhaveeraghuveer.com

देहेभान हे ज्ञानशस्त्रे खुडावे।
विदेहीपणे भक्तिमार्गेचि जावे।
विरक्तीबळे निंद्य सर्वै त्यजावे।
परी संग सोडूनि सूखे रहावे॥१८२॥श्रीराम॥

अर्थ- मी आत्मा आहे या जाणिवेने मी देह आहे ही भावना तोडून टाकावी. देहाचे भान लोपवून स्वरूपाच्या अनुसंधानात रहावे. मनाने अनासक्त होऊन विषय संपूर्ण सोडावा. दृश्यामध्ये खरेपणाच्या भावनेने न गुंतता आनंदात रहावे.

स्पष्टीकरण- आज आपल्याला देहाचे स्मरण आहे. 'मी देह नाही' असे आपण म्हणत गेलो तर त्या देहाचे विस्मरण होण्या-ऐवजी स्मरणच दृढ होत जाते. म्हणून 'मी आत्मा आहे' असे सतत स्मरण ठेवले तर देहाचे विस्मरण आपोआप घडत जाते.

भगवंतापासून जो कधीही विभक्त नसतो तो खरा भक्त अशी समर्थांनी भक्तीची सोपी व्याख्या केली आहे. भगवंतामध्ये अखंड मिळून मिसळून जाण्याचा जो अभ्यास तो भक्तिमार्ग होय. आणि स्वतःच्या देहाचे विस्मरण झाल्याशिवाय कोणी भक्त होऊ शकत नाही. स्वस्वरूपाच्या अनुसंधानामध्ये जागेपणी स्वतःचे विस्मरण कसे करावे हे संत शिकवतात.

विरक्ती हा शब्द उच्चारला की संन्यासाचा किंवा उदासीनतेचा भास येतो. संन्यासी विरक्त असतो हे खरे परंतु जो विरक्त असतो तो संन्यासी असतोच असे नाही. ज्याच्यामुळे देहबुद्धी वाढीला लागते ते सर्व निंद्य होय. निंद्य सर्व सोडून दिले तर हळूहळू देहाची जाणीव क्षीण होत जाते.

मनोबोधामध्ये देहबुद्धी किंवा देहबोध सोडावा हा विषय पुन्हा पुन्हा येतो. ज्ञानाच्या शस्त्राने देहभान खुडावे.

असङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा । गीता -

म्हणजे देहबुद्धी ते आत्मबुद्धी करावी. १२व्या श्लोकात देहबुद्धी विवेकाने सोडून द्यावी असे सांगतात. तर १६८ व्या श्लोकात देहबुद्धीचा ओढा नाठवावा असे सांगितले आहे. आणखी एके ठिकाणी देहबुद्धी निरूपणी विसरावी असे सांगितले आहे.

© www.madhaveeraghuveer.com

देहबुद्धी सोडण्यासाठी समर्थ भक्तीची कास धरायला सांगतात. नुसत्या ज्ञानाने कोरडेपणा येऊ शकतो. तसेच अहंकाराचा किंवा शून्यवादाचा धोका असतो. देहबुद्धी सोडताना जीवनात निर्माण होणारी पोकळी भगवद्प्रीतीने भरून काढावी. प्रेमामुळे मनुष्य देहयातनेकडे दुर्लक्ष करू शकतो. सावरकरांसारख्या देशभक्तांनी मातृभूमीवरील प्रेमासाठी कोलू ओढण्याच्या यातना सहन केल्या. आपलं बाळ आजारी असेल तर आई अनेक रात्री जागरण करून त्याची सेवा करते. प्रेमाची ही शक्ती लक्षात घेऊन समर्थ देहबुद्धी सोडण्यासाठी भक्तीची मदत घ्यायला सांगतात.

विरक्ती असेल तर निंद्य गोष्टींचा त्याग करताना जड जाणार नाही. आणि विरक्ती नसेल तर निंद्य हे निंद्य वाटणारच नाही. आसक्तीपोटी माणूस वाईट गोष्टींचे समर्थन करतो Glorification.

भक्ती आणि विरक्ती ही साधनेच्या रथाची दोन चाके आहेत. भक्तीमध्ये माणूस तहानभूक विसरतो. वास्तवी विरक्त माणसाला विषयसेवनाचीच लाज वाटते. त्याच्या जीवनातून निंद्य गोष्टी गळून पडतात. त्यासाठी त्याला वेगळा संघर्ष करावा लागत नाही.

Know yourself thoroughly & then
Forget yourself completely

© www.madhaveeraghuveer.com

classmate
Date
Page

मही निर्मिली देव तो वोळखावा ||
जया पाहता मोक्ष तत्काळ जीवा |
तया निर्गुणालागि गूणी पहावे |
परी संग सोडूनि सूखे रहावे ||१८२|| श्रीराम ||

अर्थ - ज्या देवाने हे जगत निर्माण केले त्याचे ज्ञान करून घ्यावे. ते ज्ञान झाल्याबरोबर जीव मुक्तदशेत जातो. तो देव निर्गुण आहे पण त्याला निर्गुणाच्या पसाऱ्यात बघावे. दृश्यामध्ये न गुंतता स्वानंदात रहावे.

स्पष्टीकरण - आपणे माणस जेव्हा विश्व निर्मितीचा विचार ~~श्वेध्यक्षा~~ करतो तेव्हा त्यास आदिकारण शोधतो. त्या आदि कारणाचे कारण काही सापडत नाही. म्हणून ईश्वर स्वयंभू आहे असे मानावे लागते. स्वयंभू म्हणजे स्वतःच स्वतःचे कारण असणारा. दृश्याचे ज्ञान कार्यकरण संबंधामध्ये केंद्रित असते. तोच नियम विश्वाच्या निर्मितीला लावून ईश्वर विश्वाचे कारण बनतो. त्या ईश्वराचा साक्षात्कार झाला की जीव संपूर्ण ज्ञानी होतो. व त्या ज्ञानाचा परिणाम म्हणून जीव चटकन मुक्त होतो.

कारण
कार्य

Creator
Creation

विश्वामध्ये व ईश्वरामध्ये मुळातच फरक नाही. विश्व हे ईश्वराचे स्वप्न समजावे. माणसाला जेव्हा स्वप्न पडते तेव्हा तो स्वतः एकीकडे स्वप्नातील पदार्थ बनतो व दुसरीकडे त्या पदार्थांना पाहणारा द्रष्टा बनतो. तसेच ईश्वराने जेव्हा आदिसंकल्प केला तेव्हा एकीकडे ईश्वर पंचभूतात्मक विश्व बनला आणि दुसरीकडे शिवरूपाने त्याचा साक्षी द्रष्टा झाला. म्हणून ईश्वर त्रिगुणातीत असला तरी गुणमय विश्वामध्ये भरून राहिला आहे अशी दृष्टी असावी.

जीव
जगत
जगदात्मा

☆

इथे ~~खऱ्या~~ देवाला पाहणे म्हणजे आपण स्वतः परमात्मस्वरूप होणे. To see means to be!

देव पहाया गेलो | तो देव होऊनि ठेलो |

असे तुकाराम महाराज ~~स्वतः~~ देवाबद्दल म्हणतात.

आकलन

या श्लोकातील तिसऱ्या ओळीबद्दल असे सांगता येईल की ऽ. निर्गुणाची एकदम धारणा करता येत नाही म्हणून सगुणाची कास धरावी. म्हणजे आधी सगुण आणि मग निर्गुण प्राप्त करावे

©www.madhaveeraghuveer.com

विना ज्ञान या
साधकाला नाही
दाशरथी रामोपासना

समर्थ

२. आणि दुसऱ्या अर्थाने जरी निर्गुणाची प्राप्ती झाली तरी सगुण सोडू नये. अधिक स्पष्ट सांगायचे तर सगुणामध्ये त्यालाच पहावे. जर परमात्मा सगळीकडे व्यापून आहे तर मूर्तीतही तो असणारच आहे. ते निर्गुण ब्रह्म तुमच्या आमच्या सोयीसाठी सगुणात साकारले आहे. समर्थ म्हणतात —— दासबोध –

मानुडे मुख्य परमात्मा । म्हणोनि करावी लागे प्रतिमा ॥

किंवा एका स्फुट कवितेत म्हणतात –

भजनरहित ज्ञाने मोक्ष होणार नाही । सकळ निगम त्याचे सार शोधूनि पाही । सगुण भजन मागे राखिले थोरथोरी । अधम नर तयांचे ज्ञान संदेहकारी ॥

आणि शेवटी सगुण-निर्गुण दोन्ही सोडायचे व गुणातीत व्हायचे. जो स्वतःला ब्रह्मापेक्षा भिन्न समजतो. त्याने जरी साधना केली तरी ब्रह्माशी एकरूप न झाल्याने तो शून्यात अडकतो. देहबुद्धी असताना ब्रह्मचिंतन केल्यास चिंतनामुळे काही काळापुरते दृश्य खोटे वाटू लागते पण अहंकारामुळे ब्रह्माशी एकरूप होता येत नाही. अशावेळी त्रिशंकू अवस्था होऊन साधक शून्यात अडकतो. अहंकाराचा त्याग केल्याशिवाय शून्य व अज्ञान मावळत नाही.

देहबुद्धी वळली ... । आणि ब्रह्म पाहू गेला धीर ।
... दृश्याने सोपविली वाट । परब्रह्माची ॥

© www.madhaveeradhuveer.com

माधि निर्वेदकारणी
विवर्त

माघ/विवर्त/उपदेशात्मक

नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता।
पेरूनि धर्ता न लिंपे विवर्ता।
तया निर्विकल्पासी कल्पीत जावे।
परी संग सोडूनि सुखे राहावे॥१८०॥श्रीराम॥

**अर्थ** - परमात्मा कार्यकारणभावाच्या अतीत आहे. तो विश्व पालन करतो ही मानवी कल्पना आहे. त्याच्या ठिकाणी ती कल्पना नाही. तो परावाणीच्याही पलीकडे आहे. त्याला भ्रमाचा स्पर्शही होऊ शकत नाही. सर्व कल्पनांच्या पलीकडे राहणाऱ्या परमात्म्याकडे आपली कल्पना योजावी. दृश्यामध्ये खरेपणाच्या भावनेने न गुंतता स्वानंदात राहावे.

**स्पष्टीकरण** - समुद्रात लाटा येतात व जातात, तशाच या आनंदसमुद्रात व्यक्ती व वस्तु दिसतात आणि (दिसेनाशा) नाहीशा होतात. पण मानवी मनाला काळाचा क्रम लावून विचार केल्याखेरीज चालत नाही. म्हणून माणसानेच ही कल्पना केली आहे की ब्रह्मदेव जग निर्माण करतो, विष्णु त्याचे पालन करतो आणि शिव त्याचा संहार करतो. मानवी कल्पनेने निर्माण केलेली ही त्रिमूर्ति खरी नाही. परमात्मस्वरूपाशी तिचा संबंध नाही. (अनुसंधान)

जगामध्ये सर्वत्र शक्तीचा प्रभाव दिसतो. शक्तीचे प्रकार अनेक आहेत. त्यातील वाणी हा शक्तिप्रकार अत्यंत सूक्ष्म व परिणामकारक आहे. परावाणी हे वाणीचे शुद्ध व पूर्ण स्वरूप आहे. तिलाच शारदा म्हणतात. शक्तीला अधिष्ठान लागते. ईश्वराला शारदेचे अधिष्ठान मानतात. मात्र परमात्मस्वरूप या दोहोंच्या पलीकडे आहे. (प्रकृति पुरुष) (उत्पत्ति: पुरुष प्रकृति)

जे खरे नाही तसे ते दिसणे किंवा भासणे याला विवर्त म्हणतात. म्हणजे दोरी असताना सर्प भासणे. वास्तविक एका परमात्मस्वरूपाहून दुसऱ्या कशाला अस्तित्व नाही. पण आपल्याला हे विश्व दिसते. विश्व म्हणजे परमात्मस्वरूपावरील विवर्त समजावा.

परंतु दोरीला हार समजले किंवा साप समजले तरी त्यामुळे दोरीला काही फरक पडत नाही तसेच

आपण विश्व खरे मानले काय किंवा खरे न मानले तरीही परमात्मस्वरूपाला किंचितही स्पर्श होत नाही.

☆ खरा देव या सृष्टीचा निर्माता नाही किंवा पोषणकर्ताही नाही. चारही वाणी त्याचे वर्णन करायला असमर्थ आहेत. म्हणून तो परेहून पर्ता आहे. तो वाचातीत निरंजन आहे. त्याला मायेचा किंवा भ्रमाचा स्पर्श होत नाही

Option विकल्प म्हणजे पर्याय! निर्विकल्प म्हणजे पर्यायरहित. ब्रह्मासारखी दुसरी कोणती वस्तू नसल्याने त्याची कल्पना

कल्पना करता येत नाही, तरीदेखील समर्थ ब्रह्माची कल्पना करायला सांगतात. शब्दांच्या मदतीनेच निःशब्द होता येते, विचारांच्या द्वारेच निर्विचार होता येते. ब्रह्माची कल्पना करूनच आपण ब्रह्माला जाणू शकणार आहोत.

निर्विकल्पासी कल्पावे । परी कल्पिते आपण न व्हावे ।
मीपणा ही त्यागोन । ऐसी रीती ॥

कर्मयोगात जसे कर्म करायचे पण कर्तेपण घ्यायचे नाही म्हणजे कर्मयोग्याला ते कर्म लिंपत नाही, तसेच ब्रह्मचिंतन करताना मी ब्रह्मचिंतन करत आहे या वृत्तीचा त्याग करायचा. आकाशात सर्व घडामोडी घडतात, पण आकाशाला काहीही चिकटत नाही. (जसं) आरशात प्रतिबिंब दिसते पण ते आरशाला चिकटत नाही. सिनेमातील कोणतेही दृश्य सिनेमाच्या पडद्याला चिकटत नाही (-आग पूर रंगपंचमी) पडदा जसाच्या तसा राहतो, त्याप्रमाणे निर्गुण ब्रह्माच्या अधिष्ठानावर सृष्टी निर्माण होते, त्याच्या सत्तेने सर्व घडामोडी घडतात. पण निर्गुण ब्रह्म त्याने लिप्त होत नाही. संत ज्ञानदेव म्हणतात —

हे मन कारणे जाले । परी म्यां नाही केले ।

सूर्यामुळे समुद्राच्या पाण्याची वाफ होते त्याचे ढग होतात. त्यातून पाऊस पडतो. पण सूर्य हा पावसाचा कर्ता नाही. सूर्यकिरणांमुळेच वनस्पती अन्न तयार करतात. पण सूर्य त्यांचा पोषणकर्ता नाही. सारे काही निर्गुण ब्रह्माच्या सत्तेवरच घडते. पण निर्गुण ब्रह्म कशाचे श्रेय घेत नाही. साधकाने सुद्धा सर्व संग सोडून सुखाने

© www.madhaveeraghuveer.com

ब्रह्मस्वरूप व्हावे किंवा ब्रह्मचिंतनात रमावे.

ब्रह्माशी तद्रूप होण्यासाठी ब्रह्मासारखेच वागता यायला हवे.

© www.madhaveeraghuveer.com

Date ५.३.२०१५
Page ३४३

देहबुद्धिचा निश्चयो ज्या ढळेना।
तया ज्ञान कल्पांतकाळी कळेना।
परब्रह्म ते मीपणे आकळेना।
मनीं शून्य अज्ञान हे मावळेना॥१८१॥ श्रीराम॥

अर्थ - मी देहच आहे हा निश्चय ज्याच्या अंतःकरणातून हलत नाही त्याला ब्रह्मज्ञान कधीही होणे शक्य नाही. जोपर्यंत मीपणा आहे तोपर्यंत परब्रह्माचे ज्ञान होणार नाही. इतकेच नव्हे तर जे मुळात नाहीच ते अज्ञान मनातून निवृत्त होणार नाही.

स्पष्टीकरण - देह अनात्मा असल्याने 'मी देहच आहे' ही भावना 'मी आत्मा आहे' या भावनेच्या बरोबर उलट असते. म्हणून मी देहच आहे ही भावना दृढ धरून युगानुयुगे प्रयत्न केला तरी आत्मज्ञान होणार नाही.

हजारो माणसे देवाच्या मागे लागतात. पण त्यापैकी एखादाच आत्मज्ञानी होतो. कारण तो एखादाच देहबुद्धी मारू शकतो. निष्ठेने साधन करून देहबुद्धी मृतवत झाली की आत्मज्ञान उदय पावते.

वास्तविक आत्म्याकडून विचार केला तर आत्मज्ञान कधी निर्माण झालेच नाही. मानवी मनच 'मी वेगळा आहे' अशी अहंकारमय कल्पना दृढपणे करते. त्या कल्पनेपायी ज्ञान झाकले जाते. जोपर्यंत मी पणा आहे तोवर वेगळेपणा राहते आणि जोपर्यंत वेगळेपणा आहे तोपर्यंत आत्मज्ञान नाही.

वासना आणि ज्ञान या दोन्ही गोष्टी एकत्रित नांदणे कठीण आहे. जेवढी देहबुद्धी जास्त तितकी वासना जास्त. आणि जेवढ्या वासना जास्त तेवढ्या कटकटी जास्त. पशूंना कधीही ज्ञान होणार नाही कारण त्यांचे जीवन देहबुद्धीच्या पातळीवर (आहार, निद्रा, भय, मैथुन) असते.

माणसाचेही आयुष्य - देहबुद्धी जास्त असेल तर - उपभोगात निघून जाते. अशा विषयी माणसाला कल्पांतकाळी ज्ञान होणार नाही, असे समर्थ सांगतात.

कृत, त्रेता, द्वापार, कलि अशी चार युगे आहेत.

©www.manache-shlok (watermark)

classmate
Date
Page

या चार युगांचे एक हजार आवर्तन म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस, आणखी एक हजार आवर्तने म्हणजे " " रात्र! त्यानंतर कल्पांत येतो. म्हणजे आठ अब्ज चौसष्ट कोटि वर्ष! एवढ्या अवधीत जर ज्ञान झाले नाही तर कोट्यवधि वेळा जन्म व मरण! म्हणजे माणसाला किती दुःख भोगावे लागते कल्पना करा तरीही माणसे देहबुध्दीची उपासना करतात.

देहबुध्दीप्रमाणेच अहंकार हा ज्ञानमार्गातील अडथळा आहे. मनुष्य कितीही शुद्ध असला तरी त्याचा 'मी' हा परब्रह्मापेक्षा मोठा असतो. असा मनुष्य विनयी नसल्याने ज्ञानाचा अधिकारी असत नाही. अहंकारी मनुष्याने कितीही साधना केली तरी तो ब्रह्माशी एकरूप न झाल्याने तो शून्यात अडकतो. समर्थ म्हणतात –

भिन्नपणे अनुभविले। त्यासी शून्य बोलिले।
वस्तु लक्षिता अभिन्न झाले। पाहिजे आधी॥
वेगळेपणे पाहणे घडे। तेणे वृत्ति शुन्याचि पडे।
घोरी संदेह पवाडे। शुन्यत्वाचा॥ दासबोध

देहबुद्धि असताना ब्रह्मचिंतन केल्यास चिंतनामुळे दृश्य तात्पुरते खोटे वाटते आणि अहंकारामुळे ब्रह्माशी एकरूप ही होता येत नाही. अशावेळी त्रिशंकू अवस्था होऊन साधक शून्यात अडकतो. अहंकाराचा त्याग केल्याशिवाय शून्यत्व आणि अज्ञान मावळत नाही.

कच्चिन्नोभय विभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति।
असा प्रश्न अर्जुनानेही गीतेत विचारला आहे.

© www.medhaveeraghuveer.com

मना ना कळे ना ढळे रूप ज्याचे।
दुजेवीण ते ध्यान सर्वोत्तमाचे।
तया खूण ते हीण दृष्टांत पाहे।
तेथे संग निःसंग दोन्ही न साहे॥१९२॥ श्रीराम॥

अर्थ – ज्याच्यामध्ये कधीही बदल होत नाही असे परमात्म-स्वरूप मनाला आकलन होत नाही. त्या सर्वोत्तमाचे ध्यान अभिन्नपणे करावे लागते. खुणेने ते स्वरूप सांगावे म्हटले तर दृष्टांत अपुरा पडतो. परमात्मस्वरूपाच्या ठिकाणी संग व निःसंग या दोन्ही कल्पना टिकत नाहीत.

स्पष्टीकरण – आपले मन अज्ञानाचे प्रमुख साधन आहे. द्रष्टा व दृश्य असा भेद करून पाहणे हा मनाचा स्वभाव असल्याने वेगळेपणाशिवाय त्याला वस्तुचे आकलन करून घेता येत नाही. जिथे अनेकांचा व्यवहार असतो तिथे आपले मन उत्तम काम करते. परंतु परमात्मस्वरूप एकच एक असल्याने आपल्या मनाचा तिथे प्रवेश होऊ शकत नाही.

आपल्याला दृश्य वस्तुचे ध्यान करणे सोपे जाते. कारण तिथे पाहणारा वेगळा असतो. परंतु परमात्मस्वरूप अतींद्रिय व सूक्ष्म असल्याने त्याचे ध्यान वेगळेपणाने करता येत नाही. त्या प्रकारच्या ध्यानाभ्यासात आपले मन हार खाते.

एखादा संकेत किंवा दृष्टांत त्या स्वरूपाची कल्पना देण्यास अपुरे ठरतात. परमात्मस्वरूप आहे-नाही च्या पलीकडे असल्याने मानवी युक्त्या तिथे कुचकामी ठरतात. परमात्मा सापेक्ष कल्पनांच्या पलीकडे आहे.

परब्रह्म मनाला कळू शकत नाही. त्याचे रूप इतके सूक्ष्म आहे की मन ते ग्रहण करू शकत नाही. 'नाढळे' या शब्दाचे दोन अर्थ आहेत. १. न आढळे – परब्रह्म सूक्ष्म असल्याने ते जसे मनाला कळत नाही तसे ते कुठे आढळतही नाही. मनाच्या तर्काच्या कक्षेत ते येत नाही. २. ना ढळे – म्हणजे ढळत नाही. परब्रह्म सर्वव्यापी आहे त्यामुळे ते ढळणार तरी कुठे? ढळण्यासाठी जागा मोकळी असावी लागते. यद्‌जाति तन्मेजाति।

त्याचे ध्यान करताना ~~साधकाने~~ दुजे म्हणजे वेगळे

© www.madhavgeranuveer.com

राहून चालत नाही.

ध्यान धरिते ते कोण? ध्यानी चिंतिले ते कोण?
त्या दोहों मध्ये अनन्यलक्षण। जाले पाहिजे॥ दासबोध.

ध्याता, ध्येय आणि ध्यान या त्रिपुटीचा लय झाला म्हणजे साधकाला परब्रह्माचा अनुभव येतो. हा अनुभव आल्यावर त्याचे वर्णन करता येत नाही. परब्रह्माला आकाशाची उपमा देऊन पाहिली तरी आकाश कनिष्ठ ठरते. कारण आकाशात सप्तदोष (?) आहेत.

आकाश अनुभवा येते। स्वरूप अनुभवा परते।
म्हणोनिया आकाशाते। साम्यता न घडे॥

स्वरूप साक्षात्काराची ही अवस्था संग व निःसंग या दोन्हींच्या अतीत आहे. परमात्मस्वरूपात कोणतेही द्वंद्व नाही.

जसे सूर्याच्या दृष्टीने दिवस/रात्र हे दोन्ही शब्द व्यर्थ ठरतात. त्याचप्रमाणे त्रिपुटी लय झाल्यावर संग आणि निःसंग या शब्दांचे प्रयोजनच संपते. साधक एकदा ब्रह्म झाल्यावर माया संपते.

© www.madhaveeraghuveer.com

नव्हे जाणता नेणता देवराणा।
न ये वर्णितां वेदशास्त्रां पुराणा।
नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा।
श्रुति नेणती नेणती अंत त्याचा॥१९३॥ श्रीराम॥

अर्थ- परमात्मस्वरुपाच्या ठिकाणी ज्ञान नाही व अज्ञान नाही. वेद, शास्त्रे व पुराणे यांना त्याचे वर्णन करता आले नाही. परमात्मा जसा दृश्य नाही तसा अदृश्य देखील नाही. इतकेच नव्हे तर दृश्य व अदृश्य दोन्हींचा तो साक्षीही नाही. वेदांना त्याचा अंतपार लागला नाही.

स्पष्टीकरण- माणूस दोन जगात जगत असतो. एक जग देहाचे व दृश्य वस्तूंचे आणि दुसरे जग मनाचे व अदृश्य संकल्पनांचे असते. दृश्य जग जसे परिच्छिन्न व सांत असते तसेच अदृश्य जगदेखील परिच्छिन्न असते. माणसाच्या संकल्पना सार्‍या सापेक्ष असतात. सापेक्षता आली की संबंध आला. पण परमात्मा सर्व संबंधांच्या पलीकडे आहे. म्हणून ज्ञान व अज्ञान, सांत व अनंत, दृश्य व अदृश्य, स्थूल व सूक्ष्म इ० संबंध त्याच्या ठिकाणी नसतात. त्यामुळे शब्दांनी त्याचे वर्णन करता येत नाही.

त्याप्रमाणे जगातील व्यवहार सूर्य साक्षीपणाने पाहतो किंवा रंगभूमीवरील दिवा नाटक साक्षीपणाने बघतो त्याप्रमाणे आत्मा साक्षीपणाने विश्वाकडे पाहतो असा संतांना अनुभव येतो. साक्षीपण म्हणजे अलिप्तपणा! लिप्त व अलिप्त या दोन्ही कल्पना सापेक्ष आहेत. म्हणून साक्षीपणाच्या ही पलीकडे जायला हवे. माणसाने परमात्म्याच्या विषयी केलेल्या सर्व कल्पना मानवपणाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या असतात. परमात्मा मानव नाही तसा अतिमानव देखील नाही. म्हणून मानवाने केलेल्या सर्व कल्पना विराम पावल्यावर जे शुद्ध उरते ते खरे परमात्मस्वरुप असते. वेदांना देखील जे कळत नाही.

परमात्मा ज्ञानस्वरुप असल्याने त्याला नेणता म्हणता येणार नाही. पण त्याला जाणताही म्हणता येत नाही. कारण जाणणे ही वृत्ति आहे. जाणता म्हटले की द्वैत आले.

जाणणे आणि नेणणे या संवेदना आहेत. आणि खरा देव या संवेदनांच्या अतीत आहे. म्हणून वेद, शास्त्र, पुराणांनी त्याचे वर्णन केले तरी ते एकांगी व अपूर्ण आहे.

खरा देव डोळ्यांनी दिसत नाही म्हणून त्याला दृश्य म्हणता येणार नाही पण ब्रह्मांडाच्या रूपाने तोच नटला आहे म्हणून त्याला अदृश्यही म्हणता येणार नाही.

*प्रगट रामाचे निशाण । आत्माराम सनातन ।*
*विश्वंभरे विद्यमान । भाग्ये कळे ॥*

केवळ भाग्यवंतांनाच या विश्वातील विश्वंभर पहाण्याची दृष्टी प्राप्त होते. ज्याने ब्रह्माचा अनुभव घेतला त्याला नेणता म्हणता येणार नाही. पण तो अनुभव त्याला सांगता येत नसल्यामुळे त्याला जाणताही म्हणता येत नाही. श्रुतिलाही त्याचा अंतपार लागत नाही.

ज्याप्रमाणे गाढ झोपलेला माणूस 'मी गाढ झोपलो आहे' असे सांगायला शिल्लक राहत नाही तसे आत्मज्ञान झालेला मनुष्य 'मला ज्ञान झाले' हे सांगायला उरत नाही.

मुक्याने मिष्टान्न खाल्ले तर ते त्याला सांगून समजावता येत नाही. जे माहीत आहे ते सांगता आले पाहिजे. या भूमिकेने सांगता येत नसेल तर माहीत नाही असे गृहीत धरावे लागते. या विचाराने मुका हा न जाणता ठरतो आणि अनुभव घेतला असल्याने न नेणता ठरतो.

इथे शब्द पुरे पडत नाहीत आणि शब्दाचा उपयोग केला तर चालत नाही अशी ही विचित्र स्थिती आहे. शेवटी वर्णन करून सांगण्यापलीकडचे एवढेच वर्णन करता येते.

© www.mohanveeraghureer.com

वसे हृदयी देव तो कोण कैसा।
पुसे आदरे साधकु प्रश्न ऐसा।
देहे टाकिता देव कोठे राहतो।।
परी मागुता ठाव कोठे पहातो।।१८४।। श्रीराम।।

अर्थ – साधक आदरपूर्वक असा प्रश्न विचारतो की – हृदयामध्ये जो देव राहतो तो कोण व कसा आहे? देह सोडल्यावर तो देव कोठे राहतो? नंतर तो कोठे जन्म घेतो?

स्पष्टीकरण – कोणत्याही तर्कशुद्ध तत्वज्ञानाला तीन समस्या सोडवाव्या लागतात. १. माणूस जन्मास येतो कुठून? २. त्याच्या जीवनात अनाहूत दुःख का येते? ३. मृत्यूनंतर त्याचे काय होते?

यातील गंमत अशी की मृत्यूचे गूढ उकलले तर सर्व समस्या एकदम सुटतात. अध्यात्मामध्ये अनेकांनी मृत्यूचा विचार केला आहे. श्रीसमर्थांनी येथे देवाच्या कल्पनेशी संबंध असणाऱ्या अंगाचाच तेवढा विचार केला आहे.

साधकाच्या प्रश्नाची पार्श्वभूमी अशी की प्रत्येकाच्या हृदयात देव वास्तव्य करतो असे शास्त्र म्हणते. आतापर्यंत जे देवाचे स्वरूपवर्णन ऐकले त्यावरून देव माणसाच्या हृदयात कसा राहत असेल हे ध्यानात येत नाही. म्हणून हृदयात राहणाऱ्या देवाचे स्वरूप समजावून घेण्याची इच्छा झाली. शिवाय देवाला जर देहाचा आधार असेल तर मृत्युसमयी देह पडल्यावर देवाची काय अवस्था होते? त्याला पुन्हा देहाचा आधार मिळतो का? व तो मिळत असला तर कसा मिळतो या अडचणी मनापुढे उभ्या राहतात.

ईश्वर सर्व शब्दांच्या अतीत आहे. वेद देखील त्याच्यापुढे नेति नेति म्हणतात – हे ऐकून साधक भांबावतो पण तो निष्ठावंत आहे. त्याला स्वतःची उन्नती, प्रगती साधायची आहे म्हणून तो गुरुला प्रश्न विचारतो. – हा हृदयात राहणारा ईश्वर कोण आहे? कसा आहे? मनुष्य जेव्हा देह सोडतो तेव्हा हा ईश्वर कुठे जातो? राहण्यासाठी तो दुसरे कोणते स्थळ शोधतो?

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।
हृदि सर्वस्य विष्ठितम्। सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो

असे गीतेने वर्णन केले असेल तरी हृदयाचा X Ray काढला असता त्यात तो आढळत नाही. शस्त्रक्रिया करत असताना तो दिसत नाही. मग तो मानायचा कसा? आणि याच पुराव्यावर नास्तिक माणसे गीता अविश्वसनीय मानतात.

शरीरामध्ये निरनिराळ्या आवांच्या, रक्ताच्या गुठळ्या किंवा खडे बनतात. व त्यांचे स्वरूप क्ष-किरण परीक्षेमध्ये दिसते. ईश्वराचे स्वरूप हे असे आहे असे समजणे अडाणीपणाचे आहे. मात्र जो साधक हा प्रश्न विचारत आहे तो नास्तिकही नाही किंवा अडाणी देखील नाही.

तो समजून घेण्याच्या दृष्टीने आदराने विचारत आहे आणि अनुभवी साक्षात्कारी सिद्ध या प्रश्नाचे उत्तर देत आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

नभी वावरे जो अणुरेणु काही।
रिता ठाव या राघवेवीण नाही।
तया पाहता पाहता तोचि जाले।
तेथे लक्ष आलक्ष सर्वे बुडाले॥१९६॥ श्रीराम॥

अर्थ- आकाशामध्ये जे सूक्ष्मातिसूक्ष्म जडद्रव्याचे कण वावरतात त्यांच्यामध्येही ते परमात्मस्वरूप भरून आहे. त्या स्वरूपावाचून रिकामी जागा कोठेच नाही. त्या स्वरूपाला पाहण्याचा अभ्यास केला तर पाहणारा तेच बनून जातो. मग तिथे दृश्य व अदृश्य परमात्ममय होऊन जाते.

स्पष्टीकरण- विश्वाच्या रचनेत स्थूल व सूक्ष्म यांच्या श्रेणी आढळतात. वस्तु जशा कमी अधिक स्थूल असतात तशा त्या कमी अधिक सूक्ष्मही असतात. वस्तु जितकी सूक्ष्म तितकी ती जास्त व्यापक असते. सर्वात सूक्ष्म वस्तु सर्वात व्यापक असते. परमात्मा सूक्ष्मत्या परमोच्चांक असल्याने सर्व दृश्य व अदृश्य वस्तूंना तो व्यापून आहे. आणि विश्वाला आतबाहेर व्यापून पुन्हा तो शिल्लक उरतो.

धरणी
वायू तेज
माती पाणी

परमात्मस्वरूपाला पहायचे असेल तर त्याच्यासारखेच सूक्ष्म व व्यापक व्हायला हवे. पाहणारा जितका व्यापक होईल तितके परमात्मस्वरूप आकलन होईल. जीवपणा जाऊन शिवपणा येईल. शिवपणाही मावळल्यावर साऱ्या दृश्य- अदृश्याचा लय होऊन केवळ स्वरूप तेवढे शिल्लक राहते. 'मी देह आहे' जाऊन 'मी ब्रह्म आहे' हा अनुभव येतो. शेवटी तोही अंतर्धान पावतो.

संकुचित
× व्यापक

ईश्वर चराचर व्याप्त आहे हा अध्यात्मातील ठाम सिद्धांत आहे. स्थूल व सूक्ष्म अशा सर्व पदार्थात तो ओतप्रोत भरला आहे. समर्थ म्हणतात - सूर्यकिरणांच्या कवडशामध्ये जे रजःकण दिसतात त्यात ही परमात्मा भरला आहे.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्। असे उपनिषद सांगते. भरला घनदाट हरि दिसे असा ज्ञानदेवांचा अनुभव आहे. तर दासबोधामध्ये समर्थ म्हणतात -

अनंत ब्रह्मांडाखालुते। अनंत ब्रह्मांडावरुते।
नेणों किती स्थळ रिते। अणुमात्र नाही॥

या ओवीमध्ये तोच आशय आहे.

पाहता पाहता तेचि जाले याचा पाहणे म्हणजे एकरूप होणे. तुकाराम महाराज - देव पहावया गेलो। देवचि होऊनि ठेलो।

भगवंताचा अनुभव येणे म्हणजे आपणच भगवंत होणे - मग देहाच्या किंवा नामरूपाच्या दृष्टीने आपण इतके दिवस जोपासलेले आपले अस्तित्व मिथ्या असल्याचा अनुभव येतो

आपण मिथ्या साच देव। देव भक्त अनन्य भाव।
या वचनाचा अभिप्राव। अनुभवी जाणती॥

या अनन्यभावात लक्ष्य (दृश्य) आणि अलक्ष्य (अदृश्य) दोन्ही संपते. तिथे द्वैताची भाषा शिल्लक राहत नाही. झाड दिसते, त्याची मुळे दिसत नाहीत. पण झाड व मूळ एकच आहे व्यक्त होणे ही त्या अव्यक्ताची लीला आहे.

दृश्य - अदृश्य, लक्ष - अलक्ष, सगुण - निर्गुण, बद्ध - मुक्त, विकारी - निर्विकारी, व्याप्य - व्यापक, ज्ञाता - ज्ञेय, दिगंबर - वेषधारी हे सारे काही तो परब्रह्मच झाला आहे.

पाण्याने थांबून आपले डबके करून घेऊ नये. वहात रहावे. त्याला समुद्र भेटतोच. नुसताच भेटत नाही तर ते पाणीच समुद्ररूप होऊन जाते. ईश्वरदर्शनाची ओढ असलेल्या साधकाचेही असेच होते.

गोड्पणे जैसा गूळ। तैसा देव झाला सकळ।
किंवा ब्रह्मविद ब्रह्मैव भवति।

असे उपनिषदांनी सांगितलेच आहे.

असे एकरूप झाल्यावर साधना, उपासना असे काही उरतच नाही. लक्ष आणि अलक्ष सगळेच बुडून जाते.

परमेश्वर सर्वत्र असल्याने कोणत्याही काळी, परिस्थितीत साधनेला आरंभ होऊ शकतो. साधकाची योग्यता कोणतीही कशीही असली तरी चालते. प्रश्न आहे तो केवळ योग्य साधना निवडण्याचा, प्रामाणिक निष्ठेचा आणि सातत्याचा।

पाहता पाहता ही विराणी त्यासाठीच आली आहे.

१८४
पाणिनि
प्रमाणे अर्थ

वसे हृदयी देव तो जाण ऐसा।
नभाचे परी व्यापकु जाण तैसा।
सदा संचला येत ना जात काही।
तयावीण कोठे रिता ठाव नाही॥१८५॥ श्रीराम॥

अर्थ - हृदयामध्ये जो देव राहतो तो आकाशाप्रमाणे सर्व ठिकाणी व्यापून आहे. तो निरंतर सर्वत्र भरलेला असल्याने त्याच्यावाचून कोणतीही जागा रिकामी नाही अर्थात त्याला कोठे जाणे-येणे नाही.

स्पष्टीकरण - समजा एका समुद्रात काही लहान मोठी मडकी सोडली. काही वेळाने सारी मडकी भरली व बुडाली गेली. प्रत्येक मडके आतबाहेर पाण्याने व्यापले. त्या मडक्यांपैकी काही मडकी फुटली तरी समुद्राच्या पाण्यामध्ये त्यामुळे काय फरक झाला? त्याप्रमाणे परमात्मस्वरूप अनंतपणे पसरले आहे. त्यामध्ये प्राण्यांचे देह येतात आणि जातात, परंतु परमात्मस्वरूप जसेच्या तसे राहते.

पण मग माणसाच्या हृदयात देव राहतो याचा अर्थ काय घ्यायचा? ज्ञानदशेमध्ये अज्ञानाला अस्तित्वच नसल्याने ज्ञानी मनुष्याला सर्व विश्व, सारा दृश्यपसारा परमात्मस्वरूपच दिसतो. पण अज्ञानदशेमध्ये विश्व तसे दिसत नाही. पंचमहाभूतांचे बनलेले विश्व हे परमात्मस्वरूपावरील पांघरूण आहे असा अज्ञानी माणसाचा प्रत्यय असतो. सर्व ठिकाणी पसरलेले हे पंचभूतात्मक पांघरूण मानवी पिंडामध्ये पंच कोशांच्या रूपाने विकसते. पांघरूणाचा शेवटचा पदर म्हणजे आनंदमय कोश होय. आनंदमय कोशात स्वरूपाचा प्रकाश मिळतो व आनंदमय कोश हृदयात असतो म्हणून हृदयात देव राहतो असे म्हणतात.

माणसाला चार देह असतात. स्थूलदेह, सूक्ष्मदेह, कारण देह व महाकारण देह! कारण देह हा सूक्ष्मदेहाचाच अधिक सूक्ष्मभाग असतो. मरणसमयी सूक्ष्मदेह स्थूलदेहामधून कायमचा बाहेर पडतो. काही काळ तो त्या अवस्थेमध्ये काढतो. नंतर त्याची वासना अधिकाधिक तृप्त होण्यास योग्य स्थूलदेह ज्या आईबापांपासून मिळेल त्यांच्या पोटी तो जन्म घेतो.

9881718193 Aarti Bhide

9422622585

classmate
Date
Page

समर्थ म्हणतात - हृदयस्थ परमेश्वर हा हृदयापुरता मर्यादित नाही तर तो आकाशाप्रमाणे सर्वत्र व्यापून आहे. त्याला ये-जा करायला रिकामी जागा आहेच कुठे?

हृदय तयार झाले आणि मग परमेश्वर तिथे रहायला आला असे नसून सर्वव्यापी परमेश्वराच्याच सत्तेत हृदय तयार झाले.

मृत्युनंतर खरा देव मृतदेहातून बाहेर पडत नाही. कारण तो सर्वव्यापीच आहे. मृत शरीरातही परमात्मा असतोच. मृत्यूमध्ये सूक्ष्म शरीर स्थूल शरीराचा त्याग करून बाहेर पडते. सूक्ष्म शरीर वायुस्वरूप असल्याने त्याला ये-जा करता येते. सूक्ष्म शरीरामुळेच स्थूल शरीराला चेतना मिळते. सूक्ष्म शरीर निघून गेल्यावर स्थूल शरीर अचेतन होते. त्याला मृत्यू असे म्हणतात.

अशा अचेतन शरीरातही परमात्मा असतो. पण परमात्मा केवळ सूक्ष्म शरीराद्वारेच प्रगट होतो. सूक्ष्म शरीर नसल्याने खरा देव प्रगट होऊ शकत नाही. म्हणून आपल्याला वाटते की परमेश्वर पण बाहेर निघून गेला. परमेश्वर सर्वव्यापी असल्याने त्याला जाणे येणे नाही.

नभोवाणी केंद्रातून प्रसारित होणारे संगीत दूरवर ऐकू येते. त्याचे माध्यम काय? ईथर हे गृहीत धरावे लागते.

आकाश घरात राहते, प्रत्येक घरात राहते आणि तरी ते व्यापक आहे. सायकलच्या रबरी नळीत तरी हवा भरावी लागते तसे घटासाठी काही करावे लागत नाही. घट फुटल्यानंतर आकाश कुठे जाते? आकाशाप्रमाणेच ईश्वर सर्वत्र भरलेला आहे. तो कुठे जात नाही येत नाही. नवीन ठिकाणी जागा मिळवण्यासाठी (बदली झालेल्या माणसाप्रमाणे) त्याला धडपड करावी लागत नाही.

© www.madhavee raghuveer.com

नभासारिखे रूप या राघवाचे।
मनी चिंतिता मूळ तुटे भवाचे।
तया पाहता देहबुद्धी उरेना।
सदा सर्वदा आर्त पोटी पुरेना॥१८०॥ श्रीराम॥

अर्थ - परमात्मस्वरूप आकाशासारखे सर्वव्यापी आहे. त्याचे सतत चिंतन केले तर दृश्य सत्य वाटायला लावणारा भ्रम नाहीसा होतो. परमात्म्याचे दर्शन झाले की देहबुद्धि शिल्लक उरत नाही. इतकेच नव्हे तर दर्शनाची तृप्ती होत नाही.

स्पष्टीकरण - आपण डोळ्याने एखादी वस्तु पाहतो. आपले मन त्या वस्तूचा आकार घेते. ज्या वस्तूचे सतत चिंतन घडते त्या वस्तूचा दृढ आकार मनाला येतो. मनाने परमात्मचिंतन सतत घडले तर मनाला तेच रूप प्राप्त होते. मनदेखील अतिशय व्यापक व सूक्ष्म बनते. आणि मग दृश्याच्या खरेपणाचा भ्रम आपोआपच नाहीसा होऊन जातो.

देहाच्या कोंडीत राहणारे मन जेव्हा बाहेर पडते तेव्हाच ते परमात्मस्वरूपाला चिकटते. 'मी देहच' ही भावना तिथे उरत नाही. देहबुद्धिच्या कक्षेमध्ये येणारी सुखे कालांतराने नकोशी वाटतात. मात्र परमात्मस्वरूपातील आनंद तसा नाही. परमात्मा जसा अनंत तसा त्याचा आनंददेखील अनंत आहे. तो तादात्म्यानेच भोगता येतो. तो कधीच नकोसा वाटत नाही किंबहुना आपण आनंदरूप आहोत हेही भान तिथे नसते.

☆ श्रुतीच्या म्हणण्यानुसार आकाश हेच ब्रह्म आहे. समर्थ इथे राम हा ब्रह्मवाचक अर्थाने वापरतात. आणि म्हणून ते रामाला आकाशस्वरूप मानतात. आकाश सर्वत्र व्यापून आहे. आकाश सर्वांतरयामी आहे. आकाश निराकार, अनंत व अलिप्त आहे. भगवंताच्या या व्यापक रूपाचे चिंतन केले म्हणजे संसाराचे मूळ नाहीसे होते. वासना हेच संसाराचे मूळ आहे. वासनेतूनच देहबुद्धिची जोपासना होते. देहबुद्धि-मुळेच आपण भवसागरात गटांगळ्या खातो. भगवंताच्या चिंतनाने मन निर्वासन होते आणि भवाचे मूळ तुटते. याचाच अर्थ पुन्हा पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात अडकावे लागत नाही.

परब्रह्माच्या सगुण रूपाचे प्रेम एकदा निर्माण झाले तर

© www.madhaveeraghuveer.com

म्हणजे ते रूप कितीही वेळा पाहिले तरी तृप्ती होत नाही. सर्व इंद्रियांना त्याचाच ध्यास लागतो.

मीराबाई, रामकृष्ण परमहंस, तुकाराम महाराज काही क्षणांपुरते जरी त्यात अंतर पडले तरी विरहाने मन व्याकुळ होते. यातूनच अनेक संतांनी विरहिण्यांची रचना केली आहे. सर्वमान्य सगुणाचे प्रेम अधिक आहे. या सगुण प्रेमाच्या वर्णनाकाच समर्थ 'आर्त पोटी पुरेना' असे म्हणतात.

राम गावा, राम ध्यावा। राम जीवीचा विसावा।। किंवा दासाची संपत्ती राम सीतापती असे अनेक अभंग आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

classmate
Date 8.1.2015
Page 357

नभे व्यापिले सर्व सृष्टीस आहे।
रघुनायेका उपमा ते न साहे।
दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावे।
तया व्यापकु व्यर्थ कैसे म्हणावे ॥ १९८ ॥ श्रीराम ॥

अर्थ - आकाशाने सर्व विश्व व्यापले आहे खरे. परंतु परमात्मस्वरूपाला आकाशाचे साम्य लागू पडत नाही. ज्याच्या ठिकाणी यत्किंचित द्वैत नाही असा तो परमात्मा सहजपणे आहे. तो व्यापक आहे हे म्हणणे व्यर्थ होय.

स्पष्टीकरण - आतापर्यंत परमात्मस्वरूपाचे वर्णन करताना तो व्यापक आहे हे पुन्हा पुन्हा सांगितले, पण व्यापकपणा सापेक्ष असतो. म्हणजे आकाश व्यापक आहे असे म्हणताना ते आकुंचित नाही असा एक भाव असतो. तर ते कशाला तरी व्यापते असा दुसरा भाव असतो. व्यापकपणाच्या कल्पनेत अशा रितीने द्वैताचा, संबंधाचा संदर्भ घ्यावा लागतो.

परमात्मस्वरूपाच्या ठिकाणी द्वैताला ठाव नाही. तसेच संबंधाला ठाव नाही. एकच एक स्वरूप सगळीकडे पसरलेले असल्यामुळे ते दुसऱ्या कशाला व्यापून असणार? ∴ त्याला व्यापक म्हणणे योग्य नाही. ती उपमा अपुरी आहे.

☆ ब्रह्म आणि ब्रह्मांड, ईश्वर आणि जगत या दोन गोष्टी भिन्न नाहीतच. ही गोष्ट समर्थ साधकाच्या चित्तावर वारंवार ठसवीत आहेत. जेव्हा आपण राम सर्वत्र व्यापून आहे असे म्हणतो तेव्हा व्यापून टाकणारा राम आणि व्यापून टाकलेले दृश्य जगत असे दोन पदार्थ असा भाव निर्माण होतो. येथे व्याप्य - व्यापक हा भावच नाही. आत - बाहेर असा पदार्थच नाही. सोने आणि अलंकार हे जसे एकच तसा एकच परमात्मा सर्वत्र नटून आहे.

ब्रह्म व्यापक हे खरे। दृश्य आहे तो हे उगरे।
व्यापेविण कोण्या प्रकारे। व्यापक म्हणावे ॥

मागील श्लोकात दिलेली उपमा पुरेशी नाही. हे स्पष्ट करत आहेत. तत्त्वज्ञानाची काटेकोरता सांभाळण्यासाठी हे आवश्यक आहे परमात्मस्वरूपात स्वगत, सजातीय, विजातीय भेद नाहीत.

तर्को ऽप्रतिष्ठः श्रुतयः विभिन्नाः
नैको मुनि यस्य वचः प्रमाणम्।



अती जीर्ण विस्तीर्ण ते रूप आहे।
तेथे तर्क संपर्क तोही न साहे।
अती गूढ ते दृढ तत्काळ सोपे।
दुजेवीण जे खूण स्वामीप्रतापे ॥१८८॥ श्रीराम ॥

अर्थ - परमात्मस्वरूप अत्यंत पुरातन आहे, तसेच ते कमालीचे विशाल आहे. आपल्या तर्कबुद्धीची मजल तिथपर्यंत जाऊ शकत नाही. तसेच ते स्वरूप अतिशय रहस्यमय, गुप्त व स्थिर आहे. पण त्याच्या ठिकाणी दुजेपण नाही ही खूण कळली की गुरुकृपेने ते तत्काळ सुलभ होते.

स्पष्टीकरण - माणसाच्या मनाने कितीही प्रयत्न केला तरी अखेर आपला अनुभव सांगायला त्याला स्थलकालाची भाषा वापरावीच लागते. ज्या परमात्मस्वरूपाला व्यापक म्हणणे देखील अयोग्य वाटते, त्याचे वर्णन करताना समर्थ पुरातन हा कालवाचक तर विशाल हा स्थलवाचक शब्द वापरतात. हृदयाच्या क्षेत्रात विश्वासाने संचार करणारी मानवी तर्कबुद्धी परमात्मस्वरूपाच्या बाबतीत लटकी पडते. तिचे ते क्षेत्रच नव्हे. परमात्मा अखेर बुद्धीने आकलन होत नाही हेच बुद्धीला कळते.

यत्र यत्र धूमो तत्र तत्र वन्हि

स्थलकालमर्यादा मागे टाकणारे, बुद्धीच्या कक्षेबाहेर राहणारे आणि खरोखरीच रहस्यमय असणारे परमात्मस्वरूप अनुभवास येणे कठीणच असले पाहिजे. अक्षरशः हजारो माणसामध्ये एखादाच त्याचे दर्शन घेऊ शकतो. पण आपल्या विचारशक्तीला कठीण असणाऱ्या त्या स्वरूपाची एक खूण आहे. त्या स्वरूपात कोणतेही दुजेपण नाही. त्याच्याशी समरस झाले की ते अनुभवता येते. ही खूण गुरुच सांगू शकतो, पटवून देतो व अनुभवास आणून देतो. ही खूण ज्याच्या आवाक्यात येते त्याच्या दृष्टीने थोरला परमात्मस्वरूप अतिशय सुलभ बनते.

☒ (सुनार) परब्रह्म अत्यंत जीर्ण आहे. उत्पत्तीच्या क्रमात प्रथम ब्रह्म आहे. मूळमाया, गुणमाया, त्रिगुण हे सारे त्यानंतरचे आहे. जीर्ण शब्देखील सर्वात जुने या अर्थी आला आहे.

© www.madhaveeraghuveer.com

त्वमादिदेवः पुरुषः पुराणः। किंवा
कवीं पुराणं अनुशासितारम्।
असे उल्लेख भगवद्गीतेतही आले आहेत.
विसर्गि याचा अर्थ ब्रह्मांड. अनंत कोटि ब्रह्मांडे आहेत. प्रत्येक आकाशगंगेत हजारो सूर्य आहेत. अशा अगणित आकाशगंगा आहेत. ज्यांची संख्या निश्चित करणे अजूनही वैज्ञानिकांना शक्य झाले नाही. ५०० वर्षांपूर्वी आकाशगंगेचा (Galaxy) जो पहा वैज्ञानिकांनी पाहिला तो त्यांना अजून दुसऱ्यांदा दिसला नाही.
शिवाय देवलोक, पितृलोक, ब्रह्मलोक, स्वर्ग, नरक, सप्तपाताळ कितीतरी आहेत. परब्रह्माच्या या रुपाबद्दल काय तर्क करणार? किती सांगणार?
मात्र परमात्म्याचे स्वरूप असे गूढ असले तरी सद्गुरुच्या संगतीत ते तत्काळ समजते.
आहे तरी परम सुगम। परी जनासि जाला दुर्गम।
का तयाचे चुकले वर्म। सत्समागमाकडे।।
अत्यंत गूढ असलेले परमात्मस्वरूप स्वामीकृपेने तत्काळ सोपे होते. गुरु अधिकारानुसार शिष्याला मार्ग दाखवतात. शरणागतीने जे साधेल ते प्रयत्नाने साधणार नाही. भक्त शरण आला की त्याची तळमळ पाहून भगवंत आपले रूप व रहस्य त्याच्यापुढे प्रगट करतात. ही भगवंताची करुणा आहे. आंधळी कोशिंबिरीचा खेळ खेळत मूल शोधत असताना थकले की आई आपणहून त्याच्याकडून पकडली जाते. तुळजाभवानीच्या आरतीत हेच आहे
त्रिभुवनी भुवनी पाहता तुज ऐसे नाही --------
भक्ताचा भाव पाहून परमात्मा त्याच्या आकलनक्षेत येतो

कळे आकळे रूप ते ज्ञान होता।
तेथे आटली सर्वसाक्षी अवस्था।
मना उन्मनी शब्द कुंठीत राहे।
तो रे तोचि तो राम सर्वत्र पाहे॥२००॥श्रीराम॥

**अर्थ** - ज्ञान झाले म्हणजे ते परमात्मस्वरूप कळते, त्याचे बरोबर आकलन होते. मग सर्वसाक्षीपणाची अवस्था ही नाहीशी होते. मनाचे उन्मन होते; शब्द लटके पडतात. एका परमात्म्याहून अन्य काही प्रत्ययास येत नाही.

**स्पष्टीकरण** - परमात्मस्वरूपाचे ज्ञान होण्याचा देखील एक सामान्य क्रम सांगता येतो. प्रथम आपले ज्ञान हे विपरीत ज्ञान आहे, याची स्वच्छ जाणीव होते. मग ते विपरीत ज्ञान बाजूला सरून अज्ञान पुढे येते. 'मी देहच आहे' हे विपरीत ज्ञान आहे. ते खरे नाही हे पटते. पण मी कोण आहे हे काही कळत नाही. अखेरीस अज्ञानाची निवृत्ती होऊन केवळ ज्ञान तेवढे शिल्लक राहते. म्हणजे मी देह नसून मी आत्माच आहे याचा प्रत्यय येतो.

अज्ञान व विपरीत ज्ञान असताना जागेपण, स्वप्न आणि गाढ झोप या अवस्था आलटून पालटून येतात. ज्ञान झाल्यावर एक चौथी अवस्था येते. तिला तुर्या म्हणतात. या अवस्थेमध्ये मी ब्रह्म आहे असे भान राहते. मी सर्व विश्वाचा साक्षी आहे अशी विश्वव्यापी जाणीव देणारी तुर्या ज्ञानाचे खरे ऐश्वर्य असते.

अज्ञान निवृत्त होऊन जेव्हा ज्ञान उदय पावते तेव्हा ज्ञानाची जाणीव होते. पुढे ही जाणिवदेखील जिरते तेव्हा परमात्मस्वरूपाचे खरे आकलन होते. तिथे तुर्यासुद्धा अंतर्धान पावते. अवस्थाच नाहीशी झाल्यावर सर्वसाक्षीपण आपोआप नाहीसे होते. एका परमात्मस्वरूपाहून अन्य काही प्रत्ययास येत नाही. समर्थ यालाच सर्वत्र रामदर्शन होणे असे म्हणतात.

सर्वत्र परमात्मदर्शन होणारा पुरुष नंतर काही काळ जीवन जगतोच. मग तेव्हा त्याच्या मनाची काय अवस्था असते? ज्ञान होण्याच्या अगोदर ज्ञाता हा ज्ञेयापासून वेगळा असतो. पुढे अज्ञान निवृत्त झाले, ज्ञानही जिरले मग मन

© www.madhaveeraghuveer.com

मनपणाने उरलेच नाही. म्हणजेच उन्मन झाले. ही तुर्येच्याही पलीकडची स्थिती आहे. अज्ञानाच्या क्षेत्रात भाषेला फार मोठे महत्व आहे. ज्ञानदशेत केवळ खुणेसाठी तिचा उपयोग होतो. तर तुर्यातीत अवस्थेत भाषा लाजून माघारी येते.

कळे आकळे या शब्दांचा संबंध ज्ञानाशी आहे. कळणे म्हणजे परोक्ष किंवा प्रत्यक्ष ज्ञान आणि आकळे म्हणजे अपरोक्ष किंवा अप्रत्यक्ष ज्ञान! 'कळणे' या मध्ये श्रवण, मनन, निदिध्यास येतात तर आकळणे मध्ये प्रत्यक्ष अनुभूती येते. परमात्म्याचे खरे ज्ञान झाल्यावर जाणणारा शिल्लक राहत नाही. त्यामुळे सर्वसाक्षी अवस्था जाईल. म्हणजे संपते. तुरीय अवस्थेपर्यंत सर्वसाक्षित्व आहे. कारण तोपर्यंत मन आहे. शुद्ध ज्ञान प्राप्त झाल्यावर उन्मनी अवस्था प्राप्त होते. उन्मनी अवस्थेत मन नसल्याने शब्द, विचार हे सर्व संपते. सर्वत्र तो रामच दिसू लागतो.

वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः। गीता. ७.१९.

मग म्हणे सर्वत्र सच्चिदानंदु।
मीचि एक स्वतःसिद्धु।
जो आपणे नसु भेदु।
नेणोनि जाणे ॥ — ज्ञानेश्वरी

© www.madhaveeragmulveer.com

आत्मपरीक्षण -

कदा वोळखीमाजी दूजे दिसेना।
मनीं मानसीं द्वैत कांही वसेना।
बहूतां दिसां आपुली भेटि जाली।
विदेहीपणें सर्व काया निवाली॥२०७॥ श्रीराम॥

अर्थ - एका परमात्मस्वरूपाखेरीज अन्य काही जाणिवेमध्ये दिसेनासे झाले. चुकूनसुद्धा मनात द्वैताचा उदय होत नाही. फार दिवसांनी आपली व परमात्म्याची गाठ पडली. त्यामुळे देहाचे भान हरवून सर्व शरीर शांत झाले.

स्पष्टीकरण - जी जाणीव पूर्वी दृश्य आत घेत असे तिच्यात संपूर्ण परिवर्तन घडून ती आता एका परमात्म्यावाचून दुसरे काही जाणतच नाही. ज्याप्रमाणे समुद्रामध्ये पाण्यातून लाट वर येते; ती पाण्याचीच बनली असते; पुन्हा पाण्यातच लय पावते. त्याचप्रमाणे ज्ञातेपणाने परमात्माच उदय पावतो. ज्ञेयपणाने परमात्मा जाणला जातो आणि निर्माण होणारे ज्ञान परमात्म-रूपच होऊन वावरते. अशा या जीवनव्यवहारात मनामध्ये चुकूनसुद्धा परमात्म्याहून अन्य काही भासत नाही. अनुभवाची परिसीमा येथेच घडते. येथे मोक्ष पण हरका पडतो. केवळ संपूर्ण समाधान उरते. दोन पारडी — आईचे पारडे जड

हे समाधान मिळविण्यासाठी जीव जन्मभर, नव्हे तर अनेक जन्म तडफडत असतो. समाधानमय स्वस्वरूपाची गाठ पडल्यावर जीव प्रथम आनंदाने बेहोष होतो. त्यामुळे त्याला देहाचा विसर पडतो. आनंदाचा उल्हास ओसरल्यावर त्याचे मन व शरीर समाधानरूपच होऊन जाते.

एकदा ब्रह्माची किंवा भगवंताची ओळख पटली म्हणजे त्याच्याशिवाय काही दिसेनासे होते. अशा अवस्थेत मनच शिल्लक नसल्याने द्वैतही शिल्लक राहत नाही. मन द्वन्द्वात्मक असल्याने द्वैत निर्माण करते. हे द्वंद्व संपले की आपण खऱ्या अर्थाने स्वतःला भेटतो. ही भेट अनेक जन्मांनंतर होते. ब्रह्मापासून विलग होऊन जीवदशा प्राप्त झाली तेव्हा-पासून ज्ञानाच्या या अवस्थेपर्यंत किती जन्म झाले हे त्या परमेश्वरालाच ठाऊक!

बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते।

© www.madhaveeraghuveer.com

देवभक्त आणि ज्ञानी अध्यात्म न खंडिता।
चालवी देवदेवता प्रार्थना ही सुरू आता॥

हे प्रमाण फारच कमी आहे कारण फार थोड्या माणसांना परमात्म्याची ओढ लागलेली असते म्हणूनच फारच थोडी माणसे त्यासाठी प्रयत्न करतात.

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः॥

समर्थही दासबोधात म्हणतात - पडदा येक येक जन्माचा।
अनेक जन्म घ्यावे लागतात म्हणून निराश होऊन ही चालणार नाही. कोणत्या तरी जन्मात मुक्त व्हायचा प्रयत्न सुरू करावाच लागेल. ज्याला खरच मुक्ती हवी आहे तो एका जन्मात मुक्त होईल. अनेक जन्म घ्यावे लागतात कारण ती माणसाची हौस आहे. त्याला थोडे खेळून मग मुक्ती हवी असते. या संदर्भात बुद्धांच्या जीवनातील एक प्रसंग-

८० वर्षांचे गृहस्थ भगवान बुद्धदेवांकडे मुक्तीसाठी आले. २-३ वर्षे थांबण्याची त्यांची तयारी होती. त्यापेक्षा लवकर मुक्ती मिळाली तर चालेल का? ६ महिने, ३ महिना आठ दिवस असे करता करता आता लगेच मिळाली तर चालेल का? असे विचारताच ते गृहस्थ घाबरून पळून गेले.

मुक्तीची साधना करणारे लोक वेगवेगळ्या प्रकारच्या मायेत अडकलेले असतात. मात्र अशी स्वतःची स्वतःशी भेट झाल्यावर विदेहीपणे काया निवते म्हणजेच चतुर देहाचा निरास होतो, पंचकोश विलीन होतात. त्रिविध ताप संपतात. इंद्रिये, मन शांत होते पुनर्जन्म टळतो. किंवा देहबुद्धीची वटवट संपते.

श्लोक/६ विकार/ पु पंचकोश/ ४ देह/ त्रिविध ताप/ देहाच्या निरास/
एकत्वाची अनुभूती
आता जन्म/मरण फेरे नाही
यद् गत्वा न निवर्तन्ते | तुकारामांनी विठ्ठले
रहस्य उलगडले
नाचनाचुनि अति मी दमलो
थकलो रे नंदलाला

मना गूज रे तूज हे प्राप्त जाले।
परी अंतरी पाहिजे येत्न केले।
सदा श्रवणे पाविजे निश्चयासी।
धरी सज्जनसंगती धन्य होसी॥ २०२॥ श्रीराम॥

अर्थ - मना! परमात्मदर्शनाचे हे रहस्य तुला मिळाले आहे. पण त्याचा अनुभव घेण्यास तुला अंतर्यामी साधन केले पाहिजे. सतत श्रवण केल्याने आत्मबुद्धी उदय पावते. म्हणून संतांची संगति धर. तिने तू धन्य होशील.

स्पष्टीकरण - दृश्याचे ज्ञान आणि अतींद्रिय आत्म्याचे ज्ञान यामध्ये फरक असतो. दृश्याचे ज्ञान शब्दाने सांगता येते आत्म्याचे ज्ञान वाणीचा विषय होऊ शकत नाही. पण जनतेचे कल्याण व्हावे यासाठी संतांनी आत्मज्ञान शक्य तितके शब्दांमध्ये घालून आपल्यासमोर ठेवले. मनाचे श्लोक हे याचे उत्तम उदाहरण आहे. आत्मज्ञानाचे रहस्य यातून मिळाले पण संतांनी लिहिलेले ग्रंथ नुसते वाचून अथवा त्यांची पारायणे करून आत्मज्ञान पदरात पडत नाही. त्यासाठी साधन केलेच पाहिजे. दृश्यज्ञानाच्या व आत्मज्ञानाच्या साधनात मूलभूत फरक आहे. दृश्यज्ञान मिळवणारे मन ज्ञानव्यवहारामध्ये जसेच्या तसे राहते. पण आत्मज्ञान मिळवण्याच्या प्रयत्नात ज्ञान मिळवणारे मन संपूर्णपणे बदलून टाकावे लागते. म्हणून आत्मज्ञानासाठी होणाऱ्या यत्नांमध्ये अंतरंग सुधारण्याकडे लक्ष हवे.

ज्ञान मिळवण्यासाठी बराच प्रयत्न करावा लागतो. तो करण्यासाठी चिकाटी लागते. चिकाटी टिकण्यासाठी मनाचा निश्चय लागतो. मनाचा निश्चय टिकण्यासाठी सतत श्रवण करावे लागते. संतांच्या संगतीत उत्तम श्रवण घडते. म्हणून संतसंगति केल्याने आत्मज्ञान होऊन माणूस धन्य होतो.

गूज म्हणजे जीवनाचे रहस्य! अध्यात्मशास्त्र हे जीवनाचे रहस्य सांगते. गीतेत 'गुह्यतम शास्त्र' म्हटले आहे. सर्वसामान्य माणसाला भौतिक गोष्टीत रस असतो.

मायादेवीचे चांदणी। सुरमी कोण मन घाली।

वस्तूंचे सेल, राजकारण, क्रिकेट, निवडणुका, टी.व्ही.

हे सर्व सोडून ब्रह्मचिंतनाची कुणाला आवड आहे? किंवा ब्रह्मचिंतनासाठी सवड आहे? ज्या साधकाला जीवनाचे हे रहस्य कळले त्याने अनुभूतीसाठी प्रयत्न करायलाच हवेत. तुकाराम महाराजसुद्धा 'शेवटचा दिस गोड व्हावा' असे मागणे मागतात. हे गूज सर्वसामान्यांसाठी नाही. ज्यांच्या जीवनाचे वेढे संपत आले आहेत त्यांच्यासाठी हे रहस्य आहे. सद्गुरुसुद्धा हे ज्ञान सर्वांना देत नाहीत. फक्त अधिकारी साधकाला सांगतात.

अध्यात्माचे रहस्य नुसते माहिती असणे पुरेसे नाही. त्यासाठी श्रवण, मनन, चिंतन, निदिध्यास ही प्रक्रिया सतत चालू राहिली पाहिजे. एकदा दोनदा ऐकून भागत नाही म्हणून निश्चयपूर्वक सतत श्रवण केले पाहिजे.

आपण प्रयत्न केले पाहिजेत. याचा आणखी एक अर्थ म्हणजे नुसते सद्गुरुंचे आशीर्वाद पुरेसे नाहीत. त्यासाठी ज्याचा त्याने श्रद्धापूर्वक प्रयत्न करायला हवा. आणि हा प्रयत्न सुलभ होण्यासाठी संतसंगतीत रहायला हवे.

यत्न तो देव जाणावा।
प्रयत्नांती परमेश्वर।
प्रयत्न करणाऱ्यांवर परमेश्वर प्रसन्न होतो।

He helps them who help themselves.

उत्तरायण गतं दीर्घं जीवितं न हि जीवितम्।
श्रवणेन सुमनसा यो जीवति स जीवति॥

©www.madhaveeraghuveer.com

Date 10.1.2015
Page 367

मना सर्वही संग सोडूनि द्यावा।
अती आदरे सज्जनाचा धरावा।
जयाचेनि संगे महादुःख भंगे।
जनी साधनेविण सन्मार्ग लागे॥२०३॥श्रीराम॥

अर्थ - मना! जीवनामध्ये इतर सर्वांची संगत सोडून दे आणि मनापासून संतसंगत कर. संतसंगतीने जीवनातील सारी दुःखे नाश पावतात आणि साधनाचे कष्ट न होता आत्मदर्शनाचा मार्ग लाभतो.

स्पष्टीकरण - माणसांची संगती हा मानवी जीवनातील फार मोठा घटक आहे. त्याचा परिणाम प्रत्येक व्यक्तीवर घडतो. हे जर प्रत्यक्ष अनुभवास येते तर आत्मज्ञान मिळवण्यासाठी संतसंगतीचा उपयोग करून घ्यावा असा योग्य आग्रह श्रीसमर्थ धरतात. व्यवहारात स्नेहाच्या नातेवाईकांच्या किंवा उपयोगी पडणाऱ्यांच्या संगतीला जितके महत्त्व आपण देतो तितके तरी महत्त्व संतसंगतीला द्यावे. व्यवहारातील संगतीत दोन्ही बाजू स्वार्थी असतात. संतसंगतीमध्ये आपण स्वार्थी असलो तरी संत अत्यंत स्वार्थरहित असतात. म्हणून आपल्या मनात असो किंवा नसो संतसंगतीचा उत्तम परिणाम होतोच.

संत म्हणजे आत्मशक्तीने भरलेले मानवयंत्र आहे. त्यांच्या सहवासात राहिल्याने त्यांची आत्मशक्ती कमी-जास्त प्रमाणात आपल्यामध्ये संचारते. मनाचे परिवर्तन करण्याची साधना चालू असेल तर त्या शक्तीचा फार उपयोग होतो. थोडक्या श्रमामध्ये आपले विकार ताब्यात येतात व मन स्वच्छ होण्यास उपयोग होतो पण आत्मानुसंधान ठेवण्याची कला साधणे हा संतसंगतीचा सर्वात मोठा परिणाम समजावा. ज्यांना संतसंगती लाभत नाही त्यांना या कलेच्या सिद्धीसाठी फार मोठी साधना करावी लागते.

☆ समर्थ आपल्याला दुर्जनसंग सोडायला सांगतात.
दुःसंग सर्वथैव त्याज्यः। असे नारद भक्तिसूत्र सांगते.
परि संग सोडोनि सुखे रहावे - श्लोक ६८८ ते ६९०
मना कामना कामसंगी नसो दे - ६२५ - मनोबोध
मना नष्ट चांडाळ तो संग त्यागी - १०८ "

दुर्जनांचा संग सर्वथा प्रीति चार्ची न करावी
उघडा क्षणिक चाडनाद? शीतां कुणाचाने काय

सिगारेटचे पाकिट थोडा वेळ जरी शर्टच्या खिशात ठेवले तरी कपड्याला सिगारेटचा वास येतो. विषयी माणसाच्या संगतीचा असाच परिणाम होतो.

'मना सर्वही संग सोडोनि द्यावा' याचा दुसरा एक अर्थ असा आहे की मनाला काही चिकटू देऊ नये. आपण व्यवहार करतो त्याच्या चांगल्या वाईट स्मृती चित्ताला लगेच चिकटतात. अनासक्त कर्म म्हणजे कर्माचा कोणताही ठसा चित्तावर उमटू न देणे - विवेकानंद

संत आनंदस्वरूप असल्याने संतांच्या संगतीत महादुःखाचा नाश होतो. सूर्याला अंधार ठाऊक नाही, तसे संतांना दुःख ठाऊक नसते.

संत आनंदाचे स्थळ। संत सुखचि केवळ।
नाना संतोषाचे मूळ। ते हे संत॥ — दासबोध

संत इतरांना तत्काळ आपल्यासारखे करतात. याचा अर्थ आनंदी करतात. साधनेविण सन्मार्ग लागे। यातील मर्म जाणून घ्यायला हवे. याचा अर्थ साधन न करता सर्व मिळते असे नाही तर संतांच्या संगतीत राहणे हेच साधन आहे. सूर्याजवळ राहिले म्हणजे अंधार घालवण्यासाठी वेगळे काहीही करावे लागत नाही. तसे संतांच्या संगतीत योग्य ती साधना आपोआप घडत राहते. संत दिशाहीन भटकंती थांबवतात.

सुसंगति सदा घडो। सुजनवाक्य कानी पडो।
कलंक मतिचा झडो। विषय सर्वथा नावडो।
सदंघ्रिपद्मी जडो। मुरडिता हटाने अडो।
वियोग घडता रडो। मन भवच्चरित्री जडो॥

classmate
Date 12-1-2015
Page 369

मना संग हा सर्व संगास तोडी।
मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी।
मना संग हा साधका शीघ्र सोडी।
मना संग हा द्वैत निःशेष मोडी॥२०४॥ श्रीराम॥

अर्थ- मना! संतांची संगत इतर संगतीपासून बाजूला करते. सत्संगाने चटकन मोक्ष मिळतो. सत्संगाने साधकाची चटकन सुटका होते. सत्संगाने द्वैत समूळ नष्ट होते.

स्पष्टीकरण- संतांचा सहवास केला असता 'मी देह आहे' हा भ्रम क्षीण होतो. तो क्षीण होऊ लागला की दृश्य व्यक्ती व वस्तु यांच्यात गुंतलेले मन आपोआप तेथून बाजूला सरते. अशा रीतीने बंधने गळून पडली की मोक्ष मिळतो.

दृश्याच्या जंजाळात गुंतलेला साधक स्वप्रयत्नाने सुटण्यास फार वेळ लागतो. संतांची संगत केल्यास त्याला आत्मशक्तीचा पुरवठा होतो. त्या शक्तीच्या करामतीने साधक फार लवकर आपल्या ध्येयाला पोहोचतो. आत्मज्ञान झाल्यावर तेथे स्थिर होण्यासाठी पुनः सत्संगतीच कामाला येते. परमात्मस्वरूपी संपूर्णपणे लीन होऊन द्वैताचा समूळ उच्छेद झाला की मग काम संपते. अशा रीतीने आरंभापासून ते अखेरपर्यंत सत्संगती माणसाला सांभाळते व आत्मज्ञान करून देते.

सत्संगतीत असलेल्या व्यक्तीला कुसंगती टाळण्यासाठी वेगळे काही करावे लागत नाही. ते आपोआप घडून येते. रेवदंडा येथील दासबोध निरूपणाच्या बैठकीत जे साधक बसतात. त्यांची दारू, मांसाहार आपोआप सुटतो. आपली व्यसने कशी सुटली हे त्यांच्या लक्षात देखील येत नाही तसे त्यांना कुणी सांगितलेलेही नसते. सत्पुरुषांकडे नेहमी जाणे- येणे असले म्हणजे 'आपण वाईट वागलो तर त्यांच्या लक्षात येईल' या धाकाने माणसे चांगली वागायला लागतात. सत्संगतीत जुने- वाईट सहकारी आपोआप सोडून जातात. साधनेआड येणारी माणसे आपोआप तुटतात.

सत्संगतीत मोक्ष मिळणे किंवा जन्ममरणाच्या फेऱ्यातून शीघ्र सुटणे हे साधकाच्या लायकीवर अवलंबून आहे.

© www.madhaveeramuveer.com

मुमुक्षुंचे तीन प्रकार आहेत. १. मंद २. मध्यम ३. तीव्र
मंद मुमुक्षुंना मोक्षाची एवढी घाई नसते. सात्विक करमणूक म्हणून ते परमार्थाकडे पाहतात. त्यांची खरी आवड ही प्रपंचाची असते पण प्रपंच नीट चालावा म्हणून ते परमार्थ करतात.

मध्यम मुमुक्षु थोडा गंभीर असतो. त्रिविधतापाने तो पोळलेला असतो. जन्म मृत्युच्या फेऱ्यातून लवकर बाहेर पडावे असे त्याला वाटत असते. संसाराची एक एक उपाधि तो दूर करतो.

तीव्र मुमुक्षु मात्र 'उठोनि वेगेंचि लागावे दिगंतराप्रती' या उक्तीनुसार एका क्षणात सर्वसंगपरित्याग करतो. त्यांच्यातील द्वैतभाव समूळ नाहीसा होतो.

सत्संगात प्रारंभी द्वैत असते. नंतर सद्गुरु आणि सत्शिष्य यांच्यात अभेदभक्ती निर्माण होते. गुरु शिष्यांचे द्वैत नाहिसे होते. तसेच जीव-ब्रह्म हे द्वैत संपुष्टात येते जीवो ब्रह्मैव नापरः। अशी अनुभूती येते. अशा अनुभूतीनंतर साधकाचे व्यवहार द्वैताच्या नियमाप्रमाणे घडतात. पण मनाची अद्वैतबोधाची धारणा खंडत नाही

© www.madhaveeraghuveer.com

मनाची शते ऐकता दोष जाती।
मतीमंद ते साधना योग्य होती।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी।
म्हणे दास विश्वासता मुक्ति भोगी॥२०५॥ श्रीराम॥

अर्थ- हे दोनशे पाच श्लोक श्रवण केले तर दोष जातील. अज्ञानी माणसे साधन करण्यास योग्य होतील. त्यांच्या अंगी ज्ञान, वैराग्य व सामर्थ्य चढेल. श्रीसमर्थ म्हणतात की त्यांनी खात्रीने मुक्ति भोगण्यास मिळेल.

स्पष्टीकरण - श्री समर्थांसारख्या अलौकिक ब्रह्मज्ञानी ग्रंथकाराने वाचकांचा उद्धार व्हावा म्हणून हे मनाचे श्लोक लिहिले आहेत. इथे उद्धार होणे म्हणजे अज्ञान नाहीसे होणे. हे सामर्थ्य निश्चितपणे मनोबोधात आहे. अज्ञान नाहीसे होताना दोन परिणाम दिसतील. माणसाचे दोष क्षीण होऊन तो (मुमुक्षु) आत्मज्ञानाचा साधक बनण्याइतका योग्य होईल आणि साधनात राहिल्यावर त्याच्या अंतरजीवनात संपूर्ण बदल घडून येईल.

ज्याला आत्मज्ञान नसते त्याच्या अंतर्यामी अज्ञान, अपूर्णता, विफलता, आसक्ती, दुर्बलता व दुःख यांचे प्राबल्य असते. अनुसंधानाची कला साधल्यावर साधकाला आत्म्याचा स्पर्श लाभतो. आत्मस्पर्शामुळे त्याच्या आतील विफलता व दुर्बलता नाहीशी होते. तो ज्ञान, वैराग्य व आत्मसामर्थ्य या त्रयींनी भरून जातो. त्याचे अज्ञान, आसक्ती व दुःख लोपतात. या जीवनात तो संपूर्ण स्वातंत्र्य भोगतो.

☆ मनोबोधातील हा फलश्रुतीचा श्लोक आहे. मात्र श्रवण म्हणजे केवळ ऐकणे नाही. तर संत सांगतात तसे वागणे. सतत श्रवण केले म्हणजे दोष लक्षात येतात. त्याबद्दल पश्चात्ताप होतो आणि आपोआप दोष नाहीसे होतात. मात्र दोष लक्षात आल्यावर न्यूनगंड किंवा आत्मघृणा निर्माण होऊ नये. ☆ श्रवणातून साधक तयार झाला पाहिजे. त्याला समर्थ साधनायोग्य म्हणतात. सत्संगाने जीवन बदलले पाहिजे.

© www.madhaveeraghuveer.com

महाराज - मला बुद्धिमान माणसांविषयी आदर परंतु सश्रद्ध माणसांविषयी प्रेम वाटते
तुझा भावसमन्वितता।

बुध्दिमान माणसे तर्क खूप करतात. त्यामानाने मतिमंद माणसे सश्रद्ध असतात.

श्रद्धावॉंल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः।
संशयात्मा विनश्यति। असे भगवद्गीता सांगते.

परमार्थ केवळ बुद्धीने करून चालत नाही. त्यात भावनेचा ओलावा असावा लागतो. श्रद्धा हवी. समर्पणाची शक्ती हवी.

तुटो हे शरीर। फुटो हे मस्तक।
देवाचा विसर। पडो नेदी।

असे तुकाराम महाराज म्हणतात. बुद्धिमान माणूस बऱ्याचदा शास्त्रात अडकतो. गोंदवलेकर महाराज म्हणतात -
मला बुद्धिमान माणसाबद्दल आदर आहे. पण सामान्य माणसाबद्दल प्रेम आहे. मतिमंद माणूस दोष दाखवून दिल्यास मान्य करतो. बुद्धिमान मनुष्य मात्र वाद घालत बसतो.

© www.madhaveeraghuveer.com